

माझी यरुशलेमची यात्रा

खिस्तजन्म दिन
१९३८

अ. ल. जाधव

3/29

अनुक्रमणिका

शास्त्र सूची

पुस्तक	पान
२ शमुवेल	
८:३	१६
८:५, ६	१२९
२४:१८-२५	८९
१ राजे	
१:५-५३	९७
५:८	१२८
१०:१०, २२	२०
१६:२४ (७:२४ ऐवजी)	६५
१४:१-५	८९
१८:२१-४०	६५
१८:४०	१२४
१८ संपूर्ण अध्याय	१२५
२ राजे	
२:१९-२२	८९
५:१०-१५	५१
९:९-२८ (११-२ ऐवजी)	६५
१४:२५	६१
१९:१६	२०
१९:२२	८९
२४ व २५ (२ राजे ४:३२-३५ ऐवजी)	६४
२५:८-११	९९
२५ संपूर्ण अध्याय	२०
१ इतिहास	
१८:३– (ह्यांत पान १६ व १ हा आंकडा छापण्याचा राहिला आहे.)	१६

पुस्तक	पान
२ इतिहास	
३:९ (मुळांत २ इतिहास	९९
२७:३	९५
एज्रा	
३:८ ११	१००
स्तोत्र	
२८:१ ५	४६
८९:१२	१२४
१३३:३	१२४
यशाया	
३७:३७	२०
६१:१-३	६३
६५:१०	१२४
यिर्मया	
१९:१-१५	९५
२३:७, ८	१८
आमोस	
९:७	११
मत्तय	
२:१४-१५	११७
४:१३	५४
५:३९	१५
५-संपूर्ण अध्याय	५७
८:२८-३४	५७
९:३७	६८
१६:२१	५९
२१:१८-२२	९८


चित्र सूची

मुद्रकाची प्रस्तावना

आपलें म्हणणें वाचकांपुढें मांडण्याची संधी मला वाटतें ' एरंडाच्या गुऱ्हाळांतील ' चिंतामणराव जोशांचा मानसपुत्र ' पर्वतकार ' ह्याच्या ' कंपामिस्टरा ' खेरीज मराठी भाषेंत तरी आजपर्यंत माझ्यावांचून दुसऱ्या कोणत्याहि मुद्रकाला मिळाली नसेल. एऱ्हवी त्या मुद्रकला वाटेल त्या शिव्या लेखकानें दिल्या तरी तो त्या अक्षरशः खालीं मान घालून मुकाट्यानें जुळवून टाकतो. स्वतःच्या नालस्तीची जुळवणी हूं का चूं न करतां त्याला स्वतःलाच करावी लागतें. तो कधीं आपलें म्हणणें वाचकांपुढें मांडण्याच्या भानगडींत पडत नसला तरी त्यालाहि जोशांनीं उत्पन्न केलेला 'कम्पामिस्टर' अपवाद आहे. छापखान्यांतील भुतानें टाईप गडप केल्याचा मजकूर जुळविण्याचें भयंकर दिव्य त्याला करावें लागलें होतें. पण त्यानें त्याच मजकुराखालीं आपली अब्रू साफ करणारी खालील टीप गुपचूप जुळवून टाकली. ' वाचक मेहेरबान ! आमच्या छापखान्यांत भूत बीत कांहीं नाहीं. आम्हीं कॉपीबरहुकूम छापलें होतें. आमची चूक नाहीं. मजुरी थकल्यामुळें आम्हीं किती बी उपाशीं असलों तरी शब्द खाऊन पोट भरणार नाहीं. कळावें आपला नम्र गोडाजी कंपामिस्टर '

माझी भूमिका 'गोडाजी कंपामिस्टर ' पेक्षां वेगळी आहे. मी जरी 'कंपामिस्टर' असलों तरी डॉक्टर जाधव हे माझ्या माथ्यावर दोषाचें खापर फोडणारे 'पर्वतकार' नाहींत. डॉ. जाधव हे माझे मित्र आहेत. व छापखाना काढण्याचें माझ्या डोक्यांत घोळत होतें तेव्हां पासूनच त्यांनीं त्यांत छापण्यासाठीं ह्या पुस्तकाचें मॅटर पाठविण्याचा सपाटा सुरूं केला होता. अशा रितीनें मला माझ्या छापखान्यांतलें पहिलें पुस्तक एका मित्राचें काढण्याचा सुप्रसंग त्यांनीं दिला. पण— आणि ह्या पणांत मी खरोखर हरलों. डॉ. जाधवांना पुस्तक नाताळाला तयार पाहिजे होतें. व मी मनांतल्या मनांत ठरवून टेवलें होतें कीं नाताळच्या आधींच तें गुपचूप त्यांच्या

छापखान्याच्या दारांत



मुद्रक लेखक

मध्यरात्रींची वेळ–मी व माझे कामगार छापखान्यांत यरुशलमेचा प्रवास करीत होतों इतक्यांत डॉ. जाधव छापखान्याच्या दारांत येऊन उभे राहिले. तेरा तारखेचे बारा वाजले होते–चौदा तारीख उगवत होती–मीं ही प्रस्तावना नुकतीच लिहून संपविली होती व दुसऱ्या दिवशीं पहांटेच डॉक्टरांना ती वाचून दाखविल्यावर ते पोट धरून हसत असतां त्यांना व मला पकडण्यांत आलें तें हें असें !

हातांत ठेऊन त्यांना चकीत करून सोडायाचें. इतक्या दिवसांत इतकें काम तर नाताळापर्यंत किती काम ह्याचें त्रैराशिक मांडून मी त्याचें उत्तर काढून ठेवले होतें. पण हें त्रैराशिक व्यस्त होतें हें मात्र ताळा करून मी पड-ताळून पाहिलें नव्हतें. कामाच्या नवीनपणामुळें व अनुभवाच्या अभावा-मुळे नुसता सुई दोरा हवा असला कीं बाजरांत धावावें लागे. एक टाईप कमी पडला कीं मीं कामगारांच्या तोंडाकडे पहावें व कामगारांनीं माझ्या तोंडाकडे पहावें ह्याच्या पलिकडे आम्हांला कांहीं करतां येत नव्हतें. पहिलीं ४८ पानें धडाक्यानें कंपोज करून ८ पानें छापून ' फर्मा ' समोर आल्यावर माझ्या ध्यानांत आलें कीं टाईप बरोबर उठत नाहीं ! आमची ऑर्डर सुटली कीं तो सगळा ' कंपोज कॅन्सल ' करून तीं आठ पानें कचऱ्याच्या कुंडांत रवाना करून दुसरा टाईप घ्या. दुसरा टाईप घेतला. पुन्हां आपलें तेंच. छापखान्यांतील आमचे कामगार अगदीं कोऱ्या करकरीत चेहऱ्यांनीं माझ्या तोंडाकडे पहात व मीं केलेल्या प्रत्येक तर्काला 'हो'कार देत. टाईप तुटला ह्या मतावर त्यांचेंहि तेंच मत पडलें. पुढें शाई बरोबर नाहीं हेंहि माझें म्हणणें त्यांना अक्षरशः पटलें. नवीन शाई आणून पाहिली तरी तेंच. शेवटीं एकानें सुचविलें कीं रूळ नवीन ओतावयाला पाहिजेत. हें आधींच कळलें असतें तर ? तर मित्राच्या चांगुलपणाचा अन्त कसा पाहतां आला असता !

आतां पानें चांगलीं छापूं लागलीं. पण हाय हाय. पुन्हां एक नवीन संकट येऊन उभें राहिलें. हिवाळा सूरूं झाला ! उन्हाळ्या पावसाळयाचा छापखान्याशीं कांहीं संबंध असेल असें उभ्या जन्मांत मला वाटलें नव्हतें. पण हिवाळ्यानें आमची खात्री केली. नाशकास द्राक्षांच्या झाडांभोंवती शेकोट्या पाहून मला हसूं यायचें. पण आतां माझ्या छापखान्याभोंवतीं शेकोट्या पाहून मळेवाल्यांनीं बेलाशक येऊन हसावें. इतका अगदीं बारीक सारीक गोष्टींत अनुभवाच्या अभावी गमती गमतीचा त्रास व्हायचा कीं कांहीं विचारायची सोय नाहीं. तुमच्या हातांतील हें पुस्तक जरा उलटें पालटें करून पहा. कव्हर वरील तांबडी ' रिबन ' जी छापली आहे तिची


बरोबर जुळणी करतां करतां आमच्या नाकीं नऊ आले होते.

उशीर झाला, डॉ. जाधवांची निराशा झाली व मला दुःख झालें. पण एक गोष्ट मात्र झाली कीं ह्या एका पुस्तकांच्या छपाईनें छापखान्यांतील सर्व तऱ्हेच्या अडचणींचा अनुभव मला मिळाला. त्रैराशिक मांडतांना कसे कसे भाग द्यावयाचे हें मीं शिकलों. मला वाटतें हें पुस्तक एका मित्राचें नसतें तर हा अनुभव मला आणखी दहा वर्षें सुद्धां आला नसता.

डॉ. जाधवांनाहि पुस्तकाचा अनुभव पहिलाच. एकीकडे पुस्तक लौकर होऊं द्या म्हणून म्हणायाचें व दुसरीकडे नवीन नवीन मॅटर व नवीन नवीन चित्रें पाठवावयाचीं! अगदीं अजूनहि म्हणजे [११-१-३९] एक चित्र पाठविण्याचा धाक मला घातला आहे. तें चित्र येणार यांतहि शंका नांहीं कारण तें ब्लाक मेकरकडे गेलेलें आहे! आणि तें घालूं कोठें ? चित्र येई पर्यंत आतां कंपोजिंग येथेंच थांबविलें पाहिजे!

आणि ह्या दुसऱ्या आग्रहाच्या विनंतींचें काय करायाचें! हें कार्ड १३ ज्यानेवारीचें आहे! " I am really ashamed to bother you with frequent additions in my book, I am sure you wou't have real rest till the book is out [आणि खऱ्या मित्रावांचून कोणता लेखक आपल्या मुद्रकाला इतक्या सहानुभूतींनें लिहील ? असो पुढें वाचा] I shall be thankful if you can please add "—— आणि जो मजकूर घालायाचा तो पान ८ वर!! आज पानें छापून झालीं आहेत १०८!!! पण लेखक आहेत मुद्रकाचे मित्र तेव्हां मींहि त्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण करणार आहें. अर्थात् नाताळाच्या आधीं पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या इच्छेसह—कारण हें पुस्तक १९३९ च्या नाताळाच्या आंतच प्रसिद्ध होत आहे!

मी ह्या प्रस्तावनेचा ' होल्ड ऑल ' बनवून त्यांत मागाहून आलेला मजकूर, मागाहून आलेले चित्रांचे ब्लाक वगैरे सारें ठेऊन देणार आहें त्या; होल्ड ऑल मध्यें. तीन चित्रें! ही व्हरेला आगबोट. चित्र जरा पानापेक्षां अधिक रुंद झाल्यानें सोबतच्या पानांवर उभें बसवावें लागत आहे.


BRITISH INDIA COMPANY'S Ss. VARELA 4.700 TONS
One of 3 sister ships of the Bombay-Persian Gulf Mail and Passenger Service.

पाहतांना मात्र पुस्तक निराळ्या पातळींत धरून तें चित्र पहा. नाहीं तर डॉ. जाधवांचा बोटीवरील अनुभव स्वतःलाच येऊन बोट फिरते कीं काय असें वाटावयाचें. तो अनुभव पान २३–२४ वाचाल तेव्हां येईल कदाचित्. हें चित्र डॉक्टर साहेबांना ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या कृपेनें मिळालें. त्याच्या पुढच चित्र खाल्याचें ऊर गांवाचें आहे. ह्याचा संबंध पान ११ वर येतो. खाल्याच्या ऊर गांवाच्या मजकुराचीं प्रुफें वाचीत असतां वाटे ह्या ऊर गांवाचें चित्रच कां नाहीं दिलें कोणास ठाऊक. पण तें आलें. (पुढील पान वर पहा) दुसरें एक वाटें कीं पालेस्ताईनाचा नकाशा जर छापला असता तर किती बहार झाला असती. असें वाटतां वाटतां पुष्कळ अवधीं लोटला होता. आम्हीं छापीत छापीत कितीतरी पुढें गेलों होतों पण तेंहि एक बरेंच झालें कारण डॉ. जाधव आपल्या प्रवासाला निघाले कसे व तेथून परतले कसे हें पुस्तकाचें वाचन सुरूं करायच्या आधींच जर वाचकांच्या पुढें असलें तर किती छान होईल. आणि प्रस्तावनेच्या आधीं दुसरें कोऱ्या पानाशिवाय काय असतें. तेव्हां तोहि ब्लाक येथेंच प्रस्तावनेंत घालणें श्रेयस्कर वाटतें व म्हणून तो येथें छापला आहे.



हिंदुस्तान व पालेस्ताईन



Panoramic View, Ur of the Chaldees 26

आतां डॉ. जाधव ह्यांच्या पुस्तकासंबंधीं प्रत्यक्ष कांहीं लिहिण्याला सुरवात करण्याचे आधीं त्यांचें राहिलेलें एक काम उरकून घेतों. तें काम सभेचा समारोप करणाऱ्याच्या भाषणासारखें गोड आहे. बेळगांवचे वकील रा. शंकरराव दत्तात्रय जोशी नेरलीकर ह्यांनीं पुस्तक लेखनाच्या कामीं डॉ. जाधवांना केलेल्या मदतीबद्दल त्यांच्या वतीनें आभार मानणें हें तें गोड काम व तें मी मोठ्या आनंदानें करतों.

शुद्धिपत्र देऊन पुस्तकांस शोभा आणणें किंवा पुस्तकाची शोभा करणें हें लेखकांना आवडत असलें तरी मुद्रकास मुळींच आवडत नाहीं. मी येथें एक गुपीत सांगूं इच्छितों कीं तसा भयंकर प्रसंग मजवरूनहि थोडक्यांत टळला आहे. कारण आयत्या वेळीं डॉक्टर साहेबांनीं दोन सूचित्रकें जोडून पुस्तक आणखी १०-१२ पानांनीं वाढविण्याचें ठरविल्यानें चुका ज्या झाल्या आहेत त्या त्या सूचित्रकांतच सुधारून घेतलेल्या वाचकांना आढळतील.

पान ५ व ६ वर लेखकानें आपण पुस्तक लिहिलें कसें ह्यांचें वर्णन केलें आहे. स्मृतिचित्रें लिहितांना आईला मीं सांगितलें होतें कीं जें मनांत येईल तें कांहींहि आड पडदा न ठेवतां लिही —आणि तिनेंहि तसें केलें. डॉ- जाधवांनाहि ते यरूशलेमला जाण्यास निघाले तेव्हां मीं असाच निरोप पाठविला होता. त्यांनी त्या सल्ल्याचा उपयोग अक्षरशः केल्याचें दिसून येतें. ते म्हणतात

' तशांत मराठी भाषेचा एखादा कोश अगर एखादा बोलका पंडित- हि बोटींत नव्हता. तेव्हां भाऊसाहेब टिळकांचीं ज्ञानोदयाला लिहित जा- ण्याची आज्ञा मानावी, व ' केल्यानें होत आहे रे ' या सुभाषिताची प्रचीति घ्यावी ह्या इच्छेनें मी प्रार्थनापूर्वक कामाला लागलों. येतील तसे विचार वहीवर मांडावयाचे व मग अनवश्यक शब्द रबरानें पुशीत जावयाचें असा क्रम मीं सुरू केला. "

सात वर्षांपूर्वीं डॉ. जाधव ह्यांच्या आमंत्रणावरून निपाणीस मराठी

ख्रिस्ती साहित्य संमेलन भरलें होतें त्यावेळीं ह्या लिखाणाच्या प्रश्नाचा ऊहापोह अध्यक्षीय भाषणांत खालीलप्रमाणें झाला होता.

" एकदां आपल्याला लिहितां येतें असा आत्मविश्वास उत्पन्न झाला म्हणजे लेखनकलेला सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इमरसननें ह्या बाबतींत म्हटलें आहे कीं एका आत्मविश्वासांत सर्व थोर गुणांचा अंतर्भाव होतो. आत्मविश्वासापाठोपाठ मोठमोठे गुण आपोआप येतात. तुमच्या मनांत सहज स्फूर्तीनें जे विचार येतात ते खरे व जगास आवश्यक आहेत असा विश्वास मात्र धरा. आपल्या विचारांची वास्तविक किंमत माहित असणें यालाच मोठेपणा म्हणतात. आत्मविश्वासाच्या अभावीं आपण पुष्कळ वेळां आपल्या मनांत आलेला एखादा सुंदर विचार तो वेडेपणाचा असेल अशा भीतीनें टाकून देतों. पण कांहीं दिवसांनीं तोच विचार दुसऱ्या कोणत्या तरी प्रसिद्ध ग्रंथकाराच्या नव्या पुस्तकांत आलेला पाहून आपणांस किती तरी लाज वाटते ! आपणांस सुचलेला विचार आपण न आव्हेरतां आपल्या जवळ ठेवला असतां व त्याचा योग्य रीतीनें पुरस्कार केला असता तर किती सुंदर गोष्ट झाली असती ! "

पंधराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. वामन मल्हार जोशी ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हटलें होतें कीं आपणांस जे सत्य प्रतित झालें असेल किंवा प्रमाणभूत वाटत असेल त्या सत्याची प्रल्हादाप्रमाणें आपण भक्ति केली पाहिजे." आपल्याला पटलेल्या सत्याची तळमळ असली म्हणजे ती दाखविण्यास शब्द आपोआप अहमहमिकेनें आपल्या लेखणींतून धावूं लागतात. आणि अशा रीतीनें लिहिलेलें लिखाण कोणालाहि आवडतें व लाभदायकहि होतें.

डॉ. जाधव हे कसलेले लेखक नाहींत पण लेखक बनण्याला हा अगदीं जवळचा व खात्रीचा मार्ग त्यांनीं आवलंबिल्यानें त्यांचें लिखाण इतकें उत्तम झालें आहे. त्यांना त्या लिखाणाला त्याच्या सहज सौंदर्यामुळें व सुदृढतेमुळें बाह्यालंकारांची जरूरच पडली नाहीं. कसलेली लेखणी

त्यांच्या जवळ नसली तरी त्यांची लेखणी दणगट आहे व ती कसलेल्या लेखणीलाहि हार जात नसते.

आपल्या मनाला ज्या ज्या गोष्टींनीं आल्हाद दिला त्या त्या गोष्टी त्यांनीं तशा तशाच उतरून ठेवल्या. त्यांची स्मरणशक्ति व निरीक्षणशक्ति ह्या थोड्याशा काळांत किती उच्च स्थितीप्रत पोंचल्या आहत हें त्यांनीं केलेल्या छोट्या छोट्या वर्णनांवरून दिसून येईल. पान ३० वरील समुद्र लागण्याचें वर्णन, पान १८ वरील धार्मिकवाद, पान ३६ वरील बगदादी सायकल स्वार, पान ३७ वरील बगदादच्या लोकांचें वर्णन, ४६ वरील दमास्कसच्या बाजारांचें वर्णन व श्री. संबायाची मोटारशीं टक्कर, पान ५९ वरील 'बकशीस' मागणाऱ्या मुलींचें वर्णन, पान ७२ वरील दावीद रस्त्याचें वर्णन, पान ७९ वरील शोक करणाऱ्या यहुद्यांचें वर्णन—मला वाटतें अर्ध्या पुस्तकातील हीं वर्णनें मी दाखवून दिलीं तेवढींच पुरें. वाचकांना जागोंजाग अशीं किती तरी ठिकाणें सांपडतील, कीं तो मजकूर वाचतांना आपण प्रत्यक्षच ते ते प्रसंग तेथें हजर राहून आनुभवीत आहों असें वाटल्या खेरीज राहणार नाहीं.

डॉक्टर साहेबांच्या ह्या पुस्तकांत आणखी एक फार महत्वाचा गुण ठिकठिकाणीं आढळून येतो. तो त्यांचा सूक्ष्म विनोद. गुदगुल्या करून हसविणारा विनोद करणें फारसें अवघड नसतें. पण वाचतां वाचतां किंचित स्मित करण्यास लावणारा निरूपद्रवी विनोद फार थोड्यांना साधतो. अशा विनोदापैकीं कांहीं वाक्यें केवळ उदाहरणादाखल खालीं देतों.

"मी तुमच्या चप्पलला टांका मारून आणतों, मोचीला तीन आणे द्या व मला तीन आणे द्या." परदेशांत कराव्या लागणाऱ्या उधळपट्टीचा हा प्रारंभ आहे हें मीं ओळखलें."

"संध्याकाळीं आम्हीं आमच्या बोटीवरील मुख्य आचाऱ्याच्या मागें

लागून आइसक्रीम मिळविलें आणि त्यावर व कराचीच्या हलव्यावर राज्यारोहण साजरें केलें."

"त्यांच्या विथरत चाललेल्या मनोवृत्तीवरून, केव्हां तरी त्या वादाचें पर्यवसान मारामारींत होतें कीं काय असें मला वाटलें. वादे वादे जायते मुष्ठि लाभः !"

"संग्रहालयांत माणसासारख्या दिसणाऱ्या एका माकडाची पाहणी करण्यांत आम्ही काळे लोक गुंतलों असतां तिकडच्या प्रेक्षक लोकांचें आमचें निरीक्षण करण्यांत भान हरपले होते !"

"आमच्या मोटारींमध्यें स्पेनहून आलेले बरेच स्त्री पुरुष होते, त्यांनीं श्री. तोबींत ह्यांच्या हिंदी गाण्यांना तोडीला तोड म्हणून आपलीं स्पॅनिश गाणीं म्हणून दाखविलीं."

"अस्मादिकांना एक शुभ्र गर्दभ मिळालें होतें! आमच्या गर्दभारूढ स्वाऱ्या पाहून यरुशलेमकरांना मोठी मौज वाटली. कोणी आमची हबशी व इंडियन या नांवानें संभावना केली, तर कोणी गांधी नेहरू आणि शौकत अली या नांवानें ओरडून आमचा सन्मान केला."

सूक्ष्म विनोद, वर्णन शैली ह्या शिवाय भाषेला मधून मधून त्यांनीं अलंकारहि मोठे सुंदर चढविले आहेत. हीं दोन वाक्यें पहा तेथें "सार व सिदोन यांच्या मधल्या सारपथ गांवाजवळ लेबानन पर्वत उशाला व भूमध्य समुद्र पायथ्याला घेऊन आम्ही झोंपीं गेलों," किंवा "लेबानन पर्वताच्या धुक्यांत धूर मिसळींत बेरूटची आगगाडीहि आमच्या मोटारीची स्पर्धा करीत होती."

डॉक्टर साहेबांच्या लेखनांत वरील गुण असून सर्वांचे लेखन इतकें

माहिती पूर्ण आहे कीं त्यांनीं पॅलेस्ताईनचा इतका सुंदर व संपूर्ण अभ्यास केला केव्हां ह्याचें आश्चर्य वाटतें त्यांच्या लिखाणांत अगदीं सहजगत्या दिसून येणारा देशाभिमानहि वाचतां वाचतां चटकन येऊन जातो व तेव्हां रोमांच उभे राहतात. यरुशलेमच्या प्रवासांत—मिसेस सआदे ह्यांना—" बहु असोत सुंदर संपन्न कीं, महा-प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा " हें श्रीपाद कृष्णांचें महाराष्ट्रगीत त्यांनीं म्हणून दाखविलें!

पॅलेस्ताईनचा प्रवास डॉ. जाधवांनीं करण्याचें ठरविलें तें ख्रिस्ती धर्मावरील आत्यंतिक प्रेमामुळें व ती धार्मिकवृत्ति ओळी ओळींतच नव्हे तर त्या लिखाणाच्या शब्दाशब्दांत दिसून येतें, आणि हें पुस्तक, मनांत धर्मभाव इतका पूर्णपणें जागृत ठेवून लिहिलें गेलें आहे कीं तें वाचीत असतांना आपणहि त्यांच्या यरुशलमेंत प्रवास करीत आहों असेंच केवळ वाटून रहात नाहीं तर आपण त्यांच्याबरोबर तो धार्मिक अनुभवहि घेत आहों असें वाटल्यावांचून रहावत नाहीं.

डॉ. जाधवांनीं हें पुस्तक छापण्याची मला संधि दिली व प्रस्तावनेच्या रूपानें त्या सुंदर पुस्तकाबद्दल माझें प्रांजल मत सांगण्याची संधी मला दिली म्हणून उपकार मानून, वाचकांस आतां डॉ. जाधवांच्या वाङ्मय प्रासादाच्या दाराशीं आणून सोडतों.

१३-१-३९

शान्तिसदन नाशीक

दे. ना. टिळक

ता. क.:–२४ तारखेला डॉक्टर पुन्हा " लिहितात—आपल्या होल्ड ऑलमध्यें खालील मजकूर टाकण्याची कृपा करावी." ठीक आहे.

" आयत्या वेळेला रे. जयवंतराव मसोजी यांनीं जॉर्ज टी. डेव्हिसचें ' रिबिल्डिंग पॅलेस्टाईन ' हें पुस्तक व रे. एम्. स्ट्रेलर व मिस्. ई. मोरलंड यांनीं कांहीं महत्वाचीं चित्रें पाठवून लेखकाला मोठी मदत केली आहे. लेखक त्याबद्दल त्यांचा फार आभारी आहे. "

अर्पण पत्रिका

माझे पितृतुल्य व मातृतुल्य, देवदत्त प्रतिपालक–गार्डियन डॉ. व मिसेस जे. एम्. अर्विन यांनीं सांगलीच्या मिशन शाळेंत, ख्रिस्ताब्द १९०३ पासून मला पवित्र शास्त्राचें–बायबलचें–दिव्य शिक्षण उद्बोधिलें.



प. वा. डॉ. जे एम. अर्विन

पुढें ईश्वर कृपेनें हेच माझे गार्डियन, कोल्हापुरचे सध्याचे छत्रपती राजाराम महाराज हे युवराज असतांना त्यांचेहि टयूटर व गार्डियन झाले. आणि तेव्हांपासून अर्थातच राजाला जें शिक्षण मिळालें तेंच मलाहि मिळालें.

शिवाय डॉ. मिसेस अर्विन यांनीं आपल्या युरोपच्या सफरींत मलाहि आपल्या बरोबर यरूशलेमेला न्यावयाचें ठरविलें होतें.

परंतु १९०८सालीं दार्जीपुरात डॉ. अर्विन यांचें अकालीं निधन झाल्यामुळें तसें घडून आलें नाहीं.

तरीहि त्यांच्या पश्चात, मातृवत् मिसेस अर्विन यांनीं १९३२ सालीं



प. वा. मिसेस जे. ए. अर्विन.

अमेरिकेच्या लोस अँधेलेझ शहरांत आपला देह ठेवी पावेतों, मला जें उच्च शिक्षण दिलें व माझ्यांत प्रवास करण्याबद्दल जें प्रेम उत्पन्न केलें, त्यामुळें मला आतां ही यरूशलेमची यात्रा करणें शक्य झालें.

तेव्हां माझ्या ह्या जनक-जननी समान ख्रिस्तवासी अर्विन महात्म्यांस माझें हें लहानसे पुस्तक मी नम्रतापूर्वक अर्पण करीत आहें. माझी लहानशी पहिला वहिली कृति त्यांच्या स्मृतीशिवाय मला अपूर्णच वाटेल. त्यांनीं मला हातीं धरलें नसतें तर ह्या पुस्तकाचें पान राहो पण एखादें अक्षरहि लिहिलें गेलें नसतें.

अ. ल. जाधव



आत्मनिवेदन व आभारप्रदर्शन



डॉ. अ. ल. जाधव

बाळपणीं पवित्र शास्त्रां-संबंधीं चित्रें पाहण्यांत किती म्हणून मौज वाटते!

विद्यार्थी दशेंत माझ्या शिक्षक शिक्षकिणींनीं मला हिमालय, सह्याद्रिसारख्या उंच पर्वतांवर नेऊन, आणि शिक्षण घेण्या-चे हेतूनें महाबळेश्वर व दिल्ली, आग्रा, बनारस, सा-रखीं, गंगा यमुना कांठचीं प्रचंड व मनोहर शहरें दाखवून मला हिंदुस्थान-च्या भुगोलाचें प्रत्यक्षच शिक्षण दिलें. त्यामुळें अलाहाबादच्या जमना ख्रिश्चन महाविद्यालयांत मी प्राचिन इतिहासाचें परिशीलन करीत असतां खाल्दी यहुदी, बाबलोनी, मिसरी, ग्रीक, आणि रोमन यांचे पवित्र शास्त्रांतील प्रदे-शहि मला पहावयास मिळतील तर बरें असें तेव्हांपासूनच मला वाटूं लागलें होतें.

तशांत सुमारें तीस एक वर्षें, अदित्यवारी शास्त्र शिकविणाऱ्या शब्बाथ शाळांमधून मला पुष्कळ ठिकाणीं शिक्षकाचें व पुढाऱ्याचेंहि काम करावें लागल्यामुळें, पवित्र शास्त्रांतील गोष्टी ज्या पालेस्ताईन देशांत घडल्या त्या पवित्र भूमीचें भौगोलिक व ऐतिहासिक वातावरण प्रथम माझ्या मनांत चित्रीत करून, नंतर तें शास्त्राभ्यास करणाऱ्या लहानथोरांच्या मनांत बिंबित करण्याचें मला वरचेवर अगत्य भासूं लागलें.

१९२७ सालच्या सप्टेंबर महिन्यांत आमच्या निपाणीच्या ख्रिस्ती मंडळीनें मला निलगिरी पर्वतावरील ' कुनुर ' या ठिकाणीं भारतीय शब्बाथ शाळेतर्फे चालणाऱ्या पवित्र शास्त्रविषयक विद्यापीठाला पाठविलें.

या विद्यापिठाचे अध्वर्यू मि. व मिसेस ॲनेट हें पालेस्ताईन देशासंबंधीं बोलूं लागले म्हणजे आम्हां ऐकणारांचे मनावर असा कांहीं परिणाम होई कीं, पवित्र शास्त्रांत वर्णिलेल्या विभूतींच्या पावलांवर पाऊल टाकीत आम्ही चाललों आहों असें आम्हांला वाटे.

बेथेलहेम येथील गुहेंतील गोठ्यांत जन्म पावणाऱ्या जगदुध्दारक येशू बालकांचें आम्हाला साक्षात् दर्शन घडत आहे असें वाटे.

ज्या गलील सरोवरावरून ईश्वर नियोजित ख्रिस्तप्रभूनें जगाला देवाचें प्रेम व त्याचें तारण उदबोधिलें तें पूनीत सरोवर व त्याचें आसमन्त आम्हाला जनसेवेचें नवें शिक्षण देवो.

दुर्जनांच्या उध्दाराकरितां यरुशेलमेंतल्या वधस्तंभावर आत्मबलिदान करणाऱ्या ख्रिस्त देवाचा आभिषिक्त मशिहा आम्हांला स्वार्थत्यागाचे परमोच्च मार्ग दाखवो.

अशा तऱ्हेनें आम्हांला बायबलचें व त्यामध्यें निर्दिष्ट झालेल्या पवित्र स्थळांचें चित्ताकर्ष व स्फुर्तिदायक शिक्षण मिळत गेल्यानें तो पवित्र पालेस्ताईन किंवा कनान देश प्रत्यक्ष जाऊन पाहण्याची माझ्या मनामध्यें अनावर उत्कंठा उत्पन्न झाली.

आणि १९३७ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झाल्याप्रमाणें ' ख्रिस्ती भारत विद्यार्थी संघाच्या ' वतीनें निघालेल्या यरुशलेमेच्या यात्रेत आप्तेष्टांचा विचार घेऊन सामील होण्याचें मी ठरविलें.

मार्च व एप्रिल हे दोन महिने पासपोर्ट मिळविण्यांत, प्लेग, कॉलरा, व देवी प्रतिबंधक लस टोंचून घेण्यांत आणि वाटखर्चाची जमवाजमव करण्यांत भरकन निघून गेले.

या सुमारास आमचे मिशनरी बंधू डॉ० डेविड बी. अपडिग्राफ यांनीं मला मॉर्टनचें 'इन् दि स्टेप्स ऑफ दि मास्टर' व फॉस्डिकचें 'पिलग्रिमेज टू पॅलेस्टिन' हीं पश्चिम गोलार्धापासून यरुशलेमेच्या यात्रेचें वर्णन करणारीं दोन जगप्रसिद्ध पुस्तकें पाठवून मला मोठें प्रोत्साहन दिलें.

पवित्र भूमीला नुकत्याच जाऊन आलेल्या रेव्हरेंड मिस् ई. मोरलॅंड या विदुषीनें मला भेट देऊन त्या देशाच्या हवापाण्याची माहिती दिली.

मी यरूशलेमेला निघालों हें ऐकून आमचे विद्वान बंधु श्री. देवदत्त नारायण उर्फ भाऊसाहेब टिळक यांनीं मला तांतडीनें पत्र लिहून महिन्यांतून एकदांतरी मीं आपल्या साप्ताहिक ज्ञानोदयाला यात्रेची माहिती पाठवावी असें कळविलें.

पवित्र भूमीची यात्रा करून आल्यावर मीं व्याख्यानें देत फिरावें असें मला कोल्हापुरचे मंडळीनें सांगितलें.

बॉम्बे ब्रिटिश ॲन्ड फॉरेन बायबल सोसायटीचे सेक्रेटरी रे. जी. एस्. कॉक्स व श्री० प्रेमसुखराव करमरकर यांनीं मला मीं आपलें प्रवासवर्णन पुस्तक रूपानें प्रसिध्द करावें असें सुचविलें.

मी तर पडलों अनभिज्ञ! तरीहि कराचीला पोंहचल्यावर दोन आण्याचें एक नोटबुक व रबराचा एक तुकडा विकत घेऊन पाण्यावर सतत हेलकावे खात पुढें जाणाऱ्या बोटींत डेकवरच्या कॉटवर लिहावयास बसलों. माझी प्रतिभा मात्र कांहीं केल्या प्रसन्न होईना.

यरुशलेम कीं जरुशलेम ! यांतल्या 'य' ला मात्रा लागते कीं, 'श' ला काना लागतो हें कांहींच कळेना, तशांत मराठी भाषेचा एखादा कोश

अगर एखादा बोलका पंडितहि बोटींत नव्हता.

तेव्हां भाऊसाहेब टिळकांची ज्ञानोदयाला लिहित जाण्याची आज्ञा मानावी, व ' केल्यानें होत आहे रे ' या सुभाषिताची प्रचीति घ्यावी या इच्छेनें मी प्रार्थनापूर्वक कामाला लागलों. येतील तसे विचार वहीवर मांडावयाचे व मग अनवश्यक शद्ब रबरानें पुशीत जावयाचे असा क्रम मीं सुरूं केला.

आतां सुरवात कशी करावी ? कोठें करावी ? हा पडला मोठा प्रश्न. शेवटीं ' जसें घडलें तसें लिही ' ही प्रेरणा झाल्यावर, दैनंदिनीच्या स्वरूपांत लिखाण सुरूं झालें. न्हस्व दीर्घांची, कान्यामात्रांची, आणि तर्कवितर्कांचीं ब्याद भाऊसाहेबांवर सोंपवून मी जें पाहिलें, जें ऐकलें, व जें वाचलें तेंच लिहित गेलों. त्याचेंच तयार झालेलें हें पुस्तक !

बसऱ्याला पोहोंचल्यावर अरबी समुद्राचें व इराणच्या आखाताचें जल-प्रवासवर्णन मी विमानानें नाशिकाला टिळक यांचेकडे पाठवून दिलें.

यरूशलेमेहून मी परत मुंबईला आल्यावर माझें हें प्रवासवर्णन ज्ञानोदयांत जसेंच्यातसें छापलेलें पाहून व माझे विद्वान मित्र श्री. ग. ब. घाटगे बी. ए., बी. टी. हे तें वाचण्यांत गुंग झालेले पाहून मला मोठी धन्यता वाटली.

या नंतर मीं सुमारें दहा बारा ख्रिस्ती प्रार्थना मंदिरें, कोल्हापूरचें अर्विन हायस्कूल. संकेश्वर येथील महारोग्यांचे आश्रम, वॉनलेस्वाडीचें क्षयरोग निवारण भुवन, व ख्रिस्ती महाराष्ट्र यत्न करणाऱ्यांचीं संमेलनें, यांमध्यें केलेल्या माझ्या भाषणांचें, लोकांनीं विचारलेल्या प्रश्नांचें व माझ्या बोलण्याचा श्रोत्यांचे मनावर झालेल्या परिणामांचें मी यथामति शब्दचित्र रेखाटित गेलों, त्याचेंच तयार झालेलें हें आत्मनिवेदन.

मी व्याख्यानें देत फिरत असतांना मला कांहीं विलक्षण आणि मनोरंजक अनुभव आले.

इहलोकचें यरुशलेम याच भूतलावर आहे, याची कांहीं भाविक लोकांना जाणीव सुद्धां नसल्यानें, माझें बोलणें संपल्यावर, ते लोक मला म्हणत, ' काय हो! यरुशलेम खरोखरीच आहे? तुम्हीं स्वर्गीय यरुशलेमेहून आल्यासारखे दिसतां. '

कांहीं वयोवृद्ध लोकांनीं ज्ञानोदयांतील माझ्या लेखांचे कात्रण संग्रहिलें असून तें वाचून त्यांना आपण स्वतः यरुशलेमेची यात्रा केल्यासारखें वाटलें.

' तुम्ही जसें बोलतां, तसें लिहितां! ' असेंहि कांहीं युवक युवतींनीं म्हटलें.

कांहीं ठिकाणीं हजारों खिस्ती आणि खिस्तेतर लोकांनीं यार्देन नदीचें आणि मृतसमुद्राचें पाणी तीर्थाप्रमाणें कुतुहलपूर्ण चाखून पाहिलें.

कांहीं प्रश्नांनीं तर माझी त्रेधाच उडाली. ' परमेश्वरानें उत्पन्न केलेली एदेन नांवाचा बाग कोठें आहे?' ' संदेह स्वर्गाला जाण्याकरितां बांधलेला बाबेलचा मनोरा तुम्हीं पाहिला काय?' ' लोटाची बायको मिठाचा खांब झाली. (उत्पत्ति १९:२६) त्या खांबाचें मिठाचे खडे तुम्हीं आणिले आहेत काय?'

' देवाचे आवडते म्हणवून घेणारे यहुदी लोक ते कसे आहेत! ते येशू खिस्ताला मानतात काय?'

' यहुदी व अरब यांच्या भांडणाचें काय होईल?'

' तुम्हीं मृत समुद्रांत बुडालां कसें नाहीं?' इत्यादि

१९३७ च्या ऑगस्ट महिन्यांत श्री. टिळकांनीं ज्ञानोदयाच्या संपादकत्वाचा राजिनामा दिला. तेव्हां आपल्या इंग्रजी भाषेप्रमाणेंच आमच्या मराठी भाषेवरहि प्रेम असलेले, व महाराष्ट्र पत्र पंडितांनीं वाखाणिलेले, प्रथितयश संपादक रे. जे. एफ्. एडवर्डस् यांनीं माझे कांहीं लेख ज्ञानोदयांत ठळक शीर्षकाखालीं प्रसिद्ध केले.

आपल्या अस्खलित वाणीनें व विद्वत्तापूर्ण लेखणीनें अमेरिका व हिंदुस्थान या दोन देशांत नांव लौकिकास चढलेले आमचे हल्लींचे विद्वान संपादक रे. डॉ. भास्करराव हिवाळे हें माझे यरुशलेमेंतील वास्तव्याचें वर्णन ज्ञानोदयांतून प्रसिद्ध करीत आहेत.

माझे इंग्रजी भाषेंतील कांहीं संक्षिप्त लेख यंदाच्या ' संडे स्कूल जरनल ' मधून प्रसिद्ध होत आहेत.

माझें हें लिखाण पुस्तक रूपानें छापण्याबद्दल मला कांहीं मित्रांची व ज्ञानोदयाच्या वाचकांचीं उत्तेजनपर पत्रें व संदेश येत आहेत.

या कामीं अच्याचे माझे व्यवसायबंधु डॉ. शाहूराव गोडे यांनीं सक्रीय सहानभूति दाखविली म्हणून प्रथमतः मी एथेंच त्यांचे आभार मानतों.

रा. टिळकांचे चिरंजीव नारायण देवदत्त टिळक ह्यांनीं सर्व हस्तलिखितें वाचून मी पाठविलेल्या अनेक चित्रांतून योग्य चित्रें निवडून काढून तीं कोठें कोठें द्यावयाचीं हें ठरविण्यास मला जें सहाय्य केलें त्या बद्दल मी त्यांचा फार अभारी आहें-

तसेंच अहमदनगरचे वकील रा. अमृतराव त्रिभुवन ह्यांचेहि मी त्यांच्या उत्तेजनाबद्दल आभार मानतों.

माझ्या यरुशलेमच्या यात्रेच्या सुरवातीसून तों थेट या ग्रंथ निर्मितीपर्यंत मला अमोल सहाय्य लाभलें तें माझे शेजारी सद्बंधु श्री. शंकरराव नेसरीकर व डॉ. मधुकर डी. भिंगे यांचें. मला त्यांचे केवळ शब्दांनी आभार व्यक्त करतां येत नाहींत. पालेस्ताईन देशासंबंधीं उपलब्ध असलेल्या बहुतेक सर्व इंग्रजी व मराठी ग्रंथाचें श्री. नेसरीकर यांनीं मजबरोबर व स्वतंत्र रीतीनेंहि परिशीलन करून या पुस्तकांतील प्रत्येक ऐतिहासिक संबध ताडून पाहिलेला आहे.

तसेंच या पुस्तकांत दिलेल्या फोटोबद्दल, कराचीचे मि. कॉडन; अलाहाबादचें मि. ई. संबाया, रंगूनचे रे. जी. चार्लस्, यांचाहि आभारपूर्वक उल्लेख करणें जरूर आहे.

निपाणी येथील म्युनिसिपल हायस्कूलचे ड्रॉइंग मास्तर मि. सुलेमान तौकल साहेब नबाब एस्. टी. सी. ह्यांनीं मला पालेस्ताईनचा व माझ्या प्रवासाचा नकाशा काढून दिला म्हणून मी त्यांचा आभारी आहें.

शेवटीं कोल्हापूरचे गुरुवर्य तीर्थ स्वरूप श्री. कृष्णाजी गोविंद सोहनी यांनीं आपल्या वयाच्या ७९ व्या वर्षी मला माझें यरुशलेमीय वाङ्मय, आपल्या कुटुंबांतील व मित्रमंडळींतील विद्वानांपुढें वाचून दाखविण्याची संधी देऊन अनेकवार मला कळकळीच्या व उपयुक्त सूचना केल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

सर्वांनीं सतत उद्योग करून ज्ञान मंदिराचें अंतःपुर गांठावें, अशी श्री. सोहनींची मनीषा असते. त्यांच्यासारखीं सर्व माणसें आम्हाला लाभल्यास, देशाची झपाट्यानें उन्नति कां होणार नाहीं ?

सुमारें २८ वर्षांमागें कोल्हापुरच्या सिस्टर पॅलेसमध्यें, रत्नागिरीच्या एका हिंदुधर्माभिमान्याशीं खिरस्ती धर्माबद्दल वाद करण्याचा मला एकदां प्रसंग आला होता. त्यावेळीं गुरुवर्य सोहनींनीं माझें म्हणणें त्या गृहस्थाचे मनावर उत्तम रितीनें ठसविलें. यावरून गुरुवर्यांसारख्या कर्मठ ब्राम्हणांनीं अंतःचक्षूंनीं खिरस्त सत्य जाणलें आहे हें माझ्या लक्षांत आलें

अंतःकरणपूर्वक खिरस्त स्वीकार न करतां केवळ त्याच्या सत्कृत्यांचें अनुकरण करण्यांत खिरस्ती जगाल हि खालीं पहावयास लावणारे कांहीं खिरस्तीतर सेवक व सेवकसंस्था हिंदुस्थानांत आहेत हें ओळखण्याची दृष्टी आम्हाला आली पाहिजे.

स्वभाव. पूर्वसंस्कृती, पुरातन वाङ्मय, अनुवांशिक संस्कार व रुढी

योनांच धर्म मानणाऱ्या कांहीं व्यक्तिनीं, आपल्या ख्रिस्ती देशबांधवांचा छळ चालविला आहे. तरी ' छळ तेथें फळ ' या न्यायानें याच पिढींतून साधु सुंदरसिंग, टिळक, चैंग कै शेक व कागावा यासारखे ख्रिस्ती भक्त निर्माण होत आहेत.

ख्रिस्ती महामंडळाचे सभासद होऊन माझ्या परमपवित्र भारतभूमीच्या सत्वगुणी व आध्यात्मिक वृत्तीच्या बंधुभगिनींनीं सर्व जग येशूमय करावें ही माझी यरूशलेमची यात्रा करण्याचा मुख्य उद्देश ख्रिस्त प्रभु सफल करो.

श्री. भाऊसाहेब टिळकांनीं आपुलकीच्या भावनेनें आपला अमूल्य वेळ खर्च करून माझ्या ह्या मोडक्यातोडक्या लेखनावर आपला हात फिरविला याबद्दल पुन्हां एकदां त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून हें लांबलेलें आत्मनिवेदन आटपतें घेतों.

अ. ल. जाधव



प्रस्तावना

सर्व जगभर पांगलेल्या यहुद्यांची संख्या दीड कोट आहे. ही संख्या आपल्या हिंदुस्थानांतील ख्रिस्ती लोकसंख्येच्या दुप्पट आहे.

या जगाचे पाठीवर आशिया, आफ्रिका व युरोप या तिन्ही खंडांना जोडणारा, वाळवंटामधला अतिशय लहान पण कल्पनातीत सुपीक असा हा प्रदेश आहे. त्याची दक्षिणोत्तर लांबी १७५ मैल व पूर्वपश्चिम रुंदी ७५ मैल आहे.

अशा या चिमुकल्या प्रदेशांत ख्रिस्ताब्द ४००० वर्षांपूर्वी आशिया खंडांतून युरोप खंडाकडे चाललेले कांहीं धाडसी लोक वस्ती करून राहिले होते. त्यांतील कनानी लोकांच्या नांवावरून त्या देशाला कनान हें नांव [1]पडलें.

त्याच प्रमाणें, युरोपांतून आशियाकडे येणारे पलिष्टी नांवाचे नावाडी लोक कनान देशांत येऊन प्रबल झाले. त्यांच्या पलिष्टी या नांवावरून त्यांच्या देशाला पॅलेस्टीन हें नांव [2]पडलें.

ख्रिस्ताब्द तिसऱ्या सहस्त्रकाच्या शेवटीं २१ व्या शतकांत आपल्या शरीरांत ईश्वर आहे असें मानणारे आपले आर्य-हिंदुपूर्वज आरारूट पर्वतापासून हिंदुस्थानाकडे येऊं लागले होते, त्या सुमारास [3]फरात म्हणजे युफ्रातीस, व दिजला म्हणजे तैग्रिस या दोन नद्यांमधील दोआब अथवा मेसोपोटेमिया त्या प्रदेशांत खाल्दी नांवाचें त्या वेळेच्या काळांत सुधारणेच्या शिखराला पोंचलेलें एक राज्य होऊन गेलें होतें. त्यांतील ऊर नांवाच्या राजधानींत ऊरनामू व त्याचा पुत्र डुंगी हे सुमेरियन संस्कृतीचे दोन प्रख्यात राजे होऊन गेले, सुमेरियन लोक मूर्तिपूजक होते. ते चंद्राची पूजा करीत! अशा प्रकारच्या या खाल्दी लोकांच्या मूर्तिपरायण ऊर गांवांत अब्राहाम नांवाचा एक आर्य हिब्रू निस्सीम एकेश्वरी देवभक्त होऊन [4]गेला.

या अब्राहामाला ईश्वरी साक्षात्कार झाल्यामुळें त्यानें आपलें मुळचें

---

[1]उत्पत्ती १२:५ [2]अमोस ९:७ [3]उत्पत्ती २:१४ [4]उत्पत्ती ११:२८

मूर्तिपूजक ऊरगांव आणि गणगोत सोडून, बाप, भाऊ व पुतण्या यांसह वायव्येस ५०० मैल दूर असलेल्या युफ्रातीस नदी कांठच्या हारान गांवीं तो जाऊन [1]राहिला. या हारान गांवाचा सध्यां मागमूस लागत नाहीं. परंतु निनवे–मोसूल–दमास्कस या दोन शहरांच्या दरम्यान असलेल्या जुन्या व्यापारी मार्गावर तें कोठें तरी होतें. पुढें हेंहि गांव सोडून अब्राहाम आपल्या लोट नांवाच्या पुतण्यासह कनान देशांत जाऊन तेथें त्यानें वस्ती केली. परंतु त्याचा धाकटा भाऊ नाहोर मात्र हारानांतच मागें राहिला.

या कुलपती अब्राहामाचा हिब्रू वंशवृक्ष पालेस्ताईन देशांत वाढत जाऊन त्यानें अब्राहामाचा देव हा आपला राजा व पालेस्ताईन हें आपलें राष्ट्र असें ठरविलें; आणि याप्रमाणें काया वाचा मनें करून एका ईश्वराची आराधना करणारें पृथ्वीमध्यें हें एकटेंच हिब्रू राष्ट्र निर्माण झालें.

अब्राहाम हा हिबरु म्हणजे हिब्रू भाषा बोलत असे. अजूनहि यहुदी लोकांची हीच मातृभाषा आहे.

येरुशलेमेंत आतां हिब्रू विश्वविद्यालय स्थापन झालें आहे. त्यामुळें पॅलेस्टाईन मधील यहुदीतर लोकांनाहि हिब्रू भाषा शिकावी लागत आहे.

यहुदी लोकांना इस्रायल हें सर्व साधारण नांव असून शोमरोनी या नांवाचा त्यांचा एक पोट भाग आहे.

या यहुदी लोकांचा आणि त्यांच्या बायबलचा इतिहास अतिशय रम्य आणि फारच गुंतागुंतीचा असा आहे.

" प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी हीं उत्पन्न केली [2]" नंतर देवानें आदाम आणि हव्वा ही नरनारी उत्पन्न करून त्यांना एदेन बागेंत ठेविलें. हा एदेन बाग ' पूर्वेस ' ' सोनें सांपडतें ' त्या देशांत होता असें बायबलांत

[1] उत्पत्ती २४:१०-१५; २७:४३ [2] उत्पत्ती १:१

म्हटलें आहे.[१] पूर्वी हिंदुस्थानाला सुवर्णभूमि म्हणत असत.

त्यावरून एदेन बाग हिंदुस्थानांत होता असा तर्क आहे!

अलिकडे सिंधु नदीकांठीं मोहान—जो दारो या नांवाचे ठिकाणी ख्रिस्तापूर्वी चवथ्या सहस्रकांत जळप्रलयानें नाहींशा झालेल्या पुरातन गांवाचे अवशेष सांपडत आहेत. त्या गांवची रचना व तेथें सांपडणाऱ्या वस्तुवरून दिसणारी आर्य्री नांवाची संस्कृती ही इराकमध्यें युफ्रातीस नदी तटाकी होऊन गेलेल्या सुमेरी आणि हामुरामी नांवाच्या संस्कृतीपेक्षां जास्त जुनी आहे.

या वरून उत्पत्ति २:१० मध्यें म्हटल्याप्रमाणें उंच हिमालयांतून वाहत जाणाऱ्या एखाद्या नदी तटाकीं हिंदुस्थानांत देवानें आपला एदेन बाग रचून त्यांत मानव जात निर्माण केली होती असें विद्वानांचें म्हणणे आहे. एदेन बागेंत जन्मलेल्या आपल्या मूळ मातापितरांनीं देवाची आज्ञा मोडल्यामुळें पतन पावलेल्या त्यांचा व त्यांच्या संततीचा उद्धार करण्याकरीतां देवानें योजलेला संकल्प पुढें ख्रिस्तावतारांत परिणत पावला.

ख्रिस्ताब्दापूर्वी सुमारें १६५० तें १२५० वर्षे पर्यंत म्हणजे अजमासें ४०० वर्षांच्या काळांत हल्लींच्या यहुद्यांचे पूर्वज मिसरी लोकांच्या गुलामगिरींत[२] होते. त्यानंतर ते फिरून पालेस्ताईन मध्यें आले आणि त्यांनीं आपल्या यहोवा देवाच्या आज्ञेप्रमाणें यहोशवा, शमुवेल, गिदोन वगैरे सारखे शास्ते अगर सर्वाधिकारी नेमून राज्यकारभार चालविला.

पुढें कांहीं शतकें पर्यंत जगाच्या ऐश्वर्याला भुलून त्यांनीं आपल्या करतां शौल, दावीद, शलमोन वगैरे राजे लोकांचें जूं आपणावर घेतलें होतें.

कांहीं राजांच्या काळांत यहूदी लोकांमध्यें मूर्तिपूजा शिरली, त्यामुळें ख्रिस्ताब्दापूर्वी सहाव्या शतकांत त्यांच्या यहोवा देवानें त्यांना, फिरून सत्तर वर्षे पावेतों बाबलोनी लोकांच्या गुलामगिरींत पाठविलें होतें. या नंतर मात्र यहुदी लोकांतील मूर्तिपूजा समूळ नाहींशी झाली! पुढें मध्य आशियां-

---

[१] उत्पत्ती २:८, ११ [२] उत्पत्ती १५:१३; प्रे. कृ ७:६

तील राज्य मोडकळीस आल्यवर युरोपांतील उदयोन्मुख राष्ट्रांनीं यहुदी लोकांवर स्वारी करण्यास सुरवात केली.

ख्रिस्ताब्दापूर्वी ३३२ सालीं ग्रीक मॅसडेनियाच्या अलेकझांडरनें यरूशलेम सर केलें.

६५ व्या वर्षी इटालीच्या पॉम्पे नांवाच्या सेनापतीनें पॉलेस्ताईन जिंकून तो रोमन साम्राज्याला जोडला. याच रोमन लोकांच्या कारकीर्दींत यहुद्यांच्या कुळांत येशू रिव्स्त जन्मला. परंतु 'संदेष्टा आपल्या देशांत सन्मान पावत नाहीं.' अगर 'पिकतें तेथें विकत नाहीं.' या न्यायानें यहुद्यांनीं येशूला मानलें नाहीं.

येशूच्या वेळेला धार्मिक वृत्तीच्या यहुद्यांत परोशी आणि सदोकी असे दोन पंथ होते. परोशी लोक वाडवडीलांचा धर्म पाळून आपला बोज राखीत. सदोकी लोक यरुशलेमेंतील परमेश्वराच्या मंदिराची व्यवस्था पाहत.

येशूनें वाडवडीलांचा धर्म त्यांच्या मताप्रमाणें न मानतां देव प्रेम आहे, हें तत्व चोखाळलेलें पाहून परोशांना राग आला. परमेश्वराच्या मंदिरांत घुसलेली मलीनता काढून, तें येशूनें साफ केलेलें पाहून सदोकी लोक आणि या दोघांनीं मिळून संगनमत करून येशूला वधस्तंभीं दिलें. परंतु येशू मेलेल्यामधून तिसऱ्या दिवशीं पुन्हां उठला[१].

येशू शकाच्या, म्हणजे येशूवी अथवा इसवी सनाच्या पहिल्या तीन शतकांत यहुद्यांच्या छळामुळें प्रेषित पौलासारखें कांहीं ख्रिस्तानुयायी यहूदी लोक जगभर पसरले आणि त्यांनीं त्या वेळचें सर्व रोमन साम्राज्य ख्रिस्तमय केलें. या वेळेसच कांहीं ख्रिस्तशिष्य आपल्या हिंदुस्तानांत आले. आणि त्यांनीं त्रावणकोर प्रांतांत ख्रिस्ती मंडळी स्थापन केली.

---

[१]लूक २४:६

येशू शकाच्या ४ थ्या व ५ व्या शतकांत ख्रिस्ती झालेल्या इटलीच्या रोमन राजांनीं ‘ जो तुझ्या एका गालावर मारतो त्याजपुढें दुसराहि कर[१] ’ ही ख्रिस्त शिकवण विसरून आपल्या खिस्ती साम्राज्यांला सेटेशाहींचें रूप दिलें आणि ख्रिस्त स्वीकार न करणाऱ्या यहुद्यांचा छळ करून त्यांना पालेस्ताईनच्या बाहेर हाकलून दिलें. ख्रिस्ती शकाच्या ६ व्या शतकांत रोमन साम्राज्य मोडकळीस आलें. ६१५ मध्यें पारशी लोकांच्या खुशरू राजानें यरुशलेम लुटून ख्रिस्ती लोकांना छळलें आणि यहुद्यांना जवळ केलें. इ० स० ६३७ सालीं अरबस्तानाच्या मुसलमान लोकांनीं पालेस्ताईन देश जिंकला. आणि आधींच देशोधडीला लागलेल्या यहुदी आणि ख्रिस्ती लोकांच्या पवित्र देवळांच्या मशिदी बनविल्या.

या काळांतील मुसलमान मोहिमेच्या मुसंडींपुढें यहुदी, ख्रिस्ती आणि पारशी हे सर्व जग भर आपला जीव मुठींत घेऊन सैरा वैरा पळत सुटले. त्याच तडाख्यांत हिंदुस्तानांत पळून आलेले पारशी बंधु आतां आपल्या चांगल्या परिचयाचे झाले आहेत.

इ०स० ६३७ पासून ते १९१७ सालच्या महायुध्द समाप्तिपर्यंत, सुमारें १३०० वर्षें पालेस्ताईन देश मुसलमानांच्या ताब्यांत होता. इतक्या अवधींत, अरबी, मिसरी, आणि तुर्की या तीन मुसलमानी संस्कृतींच्या लोकांनीं पालेस्ताइनवर राज्य केलें. मध्यंतरीं १०९६ पासून १२९२ पर्यंत सुमारें २०० वर्षें युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांनीं क्रूसेड म्हणजे धर्मयुध्द पुकारून पवित्र भूमींतून मुसलमान लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पण सलादिन या दमास्कसच्या मुसलमान योध्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

अखेरीला महायुद्धानंतर राष्ट्रसंघानें पालेस्ताईन हा यहुद्यांचा राष्ट्रदेश आहे असें ठरवून तो देश इंग्रजाच्या स्वाधीन केला. आणि जगभर पसरलेल्या यहुद्यांना आपल्या मायभूमींत सुरक्षितपणें जाऊन राहतां येईल अशी व्यवस्था केली.

---

[१]मत्तय ५:३९

आतांपर्यंत पवित्र भूमिकडे येणाऱ्या यहुद्यांनीं जेवढी डोंगराळ, दलदलीची पडात आणि नापीक जागा सरकारापासून अगर अरब रहिवाशांपासून मिळेल तेवढी संपादन करून तिचें नंदनवन बनविण्याचा जोरदार प्रयत्न चालविला आहे. यावरून पालेस्ताइन मध्यें हल्ली यहुद्यांनी चालविलेली ही एक प्रकारची आर्थिक लढाईच आहे असें म्हणावें लागेल !

ज्या जागा आणि जीं पवित्र स्थळें अजून मुसलमानांच्या ताब्यांत आहेत तीं रडून ओरडून व प्रसंगोपात आत्मयज्ञाहे करून परत मिळविण्याचा, हजारों वर्षांपासून यहुद्यांचा सात्विक सत्याग्रह, सारखा सुरू आहे! ग्रामोद्धाराच्या, शेती आणि समाज सुधारणेच्या आणि सार्वजनिक बलसंवर्धनाच्या सर्व चळवळी सुरू करून त्यांचा फायदा यहुदी लोक पालेस्ताईनमधील ख्रिस्ती आणि मुसलमान रहिवाशांना सारखाच देत आहेत.

त्याचप्रमाणें नदीनाले आणि समुद्र यांचें पाट बंधारे करून आणि जमिनींत खोल विहिरी पोखारून त्यांच्या योगानें पालेस्ताईन व त्याचे आसपासचे इजिप्त पासून इराकपर्यंतचे सर्व रुक्ष प्रदेश सुपींक करण्याचें भाग्य यहुद्यांना लाभेल असें बायबलचें भविष्य [१]आहे. दाविद आणि शलमोन या राजांचे वेळेस यहुद्यांचें राज्य या प्रदेशावर कांहीं कालपर्यंत पसरलें [२] होतेंच.

आतां जगांतील सर्वाधिकारी-डिक्टेटरी कितीहि ओरडले तरी आपण जगण्याकरतां दुसऱ्यांचा नाश करणें या हिंसात्मक तत्वांचा शहाण्या जगाला वीट येत चालला आहे. आणि परमत सहिष्णु यहुदी लोकें या घातुक तत्वांचा अवलंब करणार नाहींत.

आतांपर्यंत यहुद्यांनीं देवाच्या दहा आज्ञा म्हणजे व्यवहारनीति जगाला दिली आहे. येशू ख्रिस्त म्हणजे देवाचा अवतार दिला आहे. आणि यानंतर पुढें आपल्या येशू ख्रिस्ताप्रमाणें दुसऱ्याकरतां मरून मानवां-

[१]उत्पत्ती १५:१८; [२]२ शमुवेल ८:३; इतिहास १८:३

च्या अंतःकरणांत देवाचें राज्य वाढविण्याला आणि बिघडलेल्या स्वार्थी जगाला ताळ्यावर आणावयाला ख्रिस्ती मंडळी बरोबर, यहुदी लोकहि कारणीभूत होतील अशी आशा करावयाला शास्त्राधार आहे.[१]

मुसलमान अरबांना आपण बराच काल पावेतों पालेस्ताईनचे राजे होतों या जाणीवेनें पछाडलें असलें तरी ते लोक आलीया भोगाशीं असावें सादर या तत्वानें वागणारे आहेत.

आणि पालेस्ताईन ही आपली मायभूमी आहे या विचारानें यहुदी भडकून जात असले तरी ते लोक अतिशय सोशिक आहेत.

तेव्हां कालांतरानें, हळू हळू पालेस्ताईन मधील थोरले बंधू यहुदी, मधले बंधु ख्रिस्ती आणि धाकटे बंधु मुसलमान हे गुण्यागोविंदानें राहतील असे वाटतें.

या सद्विचारांच्या उलट कधीं कधीं कांहीं कडवे हेडलहप्पी यहुदी आणि अरब लोक पवित्र भूमींतून एकमेकांचा नायनाट करण्याची असुरी भाषा वापरतात, बंदूकी, भाला, बरची, बांबगोळे वगैरेंचा आमनुषपणें उपयोग करतात! यामुळें चार दोन दिवसांनीं पालेस्ताईनचें दंग्यांत रुपांतर होतें. अशा दंगलींत कांहीं अरब मरण पावले, तर कांहीं यहुदी आणि इंग्रज ठार झाले, असें ऐकून आपलें मन उद्विग्न होतें.

हल्लीं पालेस्ताईनची लोक संख्या सुमारें १२॥ लक्ष असून त्यांत ३ ०० म्हणजे शेंकडा २७ लोक यहुदी आहेत. ही संख्या शेंकडा ५० करण्याची यहुद्यांची खटपट सुरू आहे.

यामुळें सगळें मुसलमान जग खवळलें असून त्यांनीं यहुद्यांच्या संख्यावाढीला सारखा विरोध चालविलेला आहे.

---

[१] लूक २१:३१

१९२२ च्या खानेसुमारींत संबंध पालेस्ताईनमध्यें फक्त ८३००० यहुदी होते. १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें त्यांची संख्या १७५००० झाली! जगाचा अंत होण्यापूर्वी, सर्व यहुदी लोक पवित्र भूमीकडे धावतील असें भविष्य आहे[१], या भविष्याला अनुसरून, जगभर चाललेला यहुद्यांचा छळ हा पालेस्ताईन मधील यहुद्यांच्या बेसुमार संख्यावाढीला कारण होत आहे.

यहुद्यांच्या या संख्यावाढीला, पालेस्ताईन मधील ख्रिस्ती लोकांचा आणि यच्च्यावत मुसलमान जगाचा सारखा विरोध आहे.

यहुदी लोक नेहमींच मोठमोठ्या शहरांत राहातात. एकट्या यरूशलेम शहराची लोक संख्या ११०००० असून, त्यांत निव्वळ ७०००० लोक यहुदी आहेत! बाकीच्या ४०००० त निम्मे ख्रिस्ती व निम्मे मुसलमान आहेत.

यहुद्यांची उपजिविका मुख्यत्वें करून सावकारी, शेती, बागाईत कारखाने आणि दुकानदारी यांवर चालते.

खेड्यांतील ख्रिस्ती आणि मुसलमान लोक लहानशा शेतीवर अगदीं हलाखीचे दिवस काढीत आहेत. शहरांतील ख्रिस्ती लोक व्यापार उदीम आणि लोहारकाम करून खाणावळी, पथिकाश्रम, आणि धार्मिक संस्था चालवितात. बरेच तरुण सरकारी लायसेन्स मिळवून यात्रेकरूंचे वाटाडी बनतात.

पालेस्ताईन मधील यहुदी आणि अरब या लोकांच्या राजकीय हक्कसंबंधानें गेल्या वीस वर्षापासून चालत आलेला झगडा मिटविण्याकरितां एक चौकशी मंडळ नेमिलें होतें.

ह्या मंडळांत यहुदी ख्रिस्ती आणि मुसलमान यांचे पुढारी होते.

या चौकशी मंडळानें दोन वर्षे विचार करून १९३७ सालच्या जुलै महिन्यांत असा निकाल दिला कीं–

[१] यिर्मया २३:७,८

पालेस्ताईनमध्यें यहुद्यांचे आणि अरबांचे असे दोन वेगवेगळे प्रदेश असावेत. ही फाळणीची कल्पना तेथील ख्रिस्ती आणि मुसलमान लोकांना पसंत नाहीं परंतु या शिफारशीस अनुसरून यहुदी लोकांनीं आपल्या प्रदेशाभोंवतीं कुंपण घालण्यास सुरवात केली आहे. अरब लोक ह्या कुंपणाचा वारंवार विध्वंस करतात. त्यामुळें आणि वर निर्दिष्ट केलेल्या इतर कांहीं कारणांमुळें या दोन जातींत रणें माजून राहिलीं आहेत.

मध्यंतरीं फेर चौकशी करणाऱ्या कामिटीनें बेथलहेम व यरुशलेम यांतील पवित्र स्थळांकरतां राखीव जागा ठेवून पालेस्ताईनला लोकमतानुवर्ति पद्धतीचें स्वराज्य द्यावें असें सुचविलें आहे.

या पैकीं कोणती पद्धत पालेस्ताईनला लागूं करावी याचा अखेर निर्णय जाहीर केलेला नाहीं. परंतु वस्तुस्थितीचें निरीक्षण करून कलोनियल सेक्रेटरी मॅक्डोनाल्ड साहेब गेल्या सप्टेंबरांत विमानानें पालेस्ताईनला भेट देऊन गेले. आतां नुकत्याच नोव्हेंबर १९३८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या वुडहेड कमिशनच्या रिपोर्टानें फाळणीलाच दुजोरा दिला आहे. परंतु ही कल्पना अमलांत आणण्यापासून होणारे राजकीय, सांपत्तीक आणि राज्यकारभारविषयक घोटाळे लक्षांत घेतां सहाव्या जॉर्ज बादशहांच्या सरकारनें नोव्हेंबर ता. ९ रोजीं हीं पालेस्ताईन फाळणीची योजना अव्यवहार्य ठरवून यहुदी व अरब ह्यांची एक गोलमेज परिषद बोलविण्याचें योजिलें आहे. तेव्हां पालेस्ताईनच्या हिताकरितां राष्ट्रसंघाच्या विचारानें आपणाला जें बरें वाटतें तें केल्याशिवाय इंग्रज लोक राहणार नाहींत आणि तोंपर्यंत यहुदी आणि अरब यांचें भांडण मिटणार नाहीं हें मात्र उघड आहे.

आपण ख्रिस्ती म्हणून आपलें लक्ष्य पालेस्ताईन देशाकडे ओढलें जाणें अगदीं साहजिक आहे. पण आपल्या ख्रिस्तीतर देशबांधवांचें सुद्धां लक्ष्य पालेस्ताईन व तेथील मूळचे रहिवाशी यहुदी ह्यांच्याकडें वेधायाला पाहिजे. पान १३ व १४ वर ह्यासंबंधीं उल्लेख आलाच आहे. ह्या शिवाय

शलमोन राजाच्या नौका, तीन तीन वर्षांनीं तार्शीशला जाऊन परत येत असत, या पुराव्यावरून व कपि-वानर व दंतम्-हस्तिदंत हे आमचे दोन संस्कृत शब्द हिब्रू भाषेंत रूढ झालेले आहेत यावरून, आपल्या प्राचीन आर्यावर्ताचें दळण वळण समुद्र मार्गें पालेस्ताईन देशाशीं होतें असें दिसतें.[१]

निनवे म्हणजे अश्शूरचे सन्हेरीब बाबेलोनचे नबुखदनेसर व रोमचे हेड्रियन या राजांनीं चालविलेल्या धर्म छळामुळें, व्यापार मार्गें पळून आलेले यहुदी लोक कोचीन प्रांतांत स्थायीक झालेले आहेत.[२]

चातुर्वर्णाश्रमांत त्यांचा समावेश न झाल्यामुळें, त्यांची पांचवी ज्ञात समजून, त्यांना, त्या प्रांतांत महापिले ही संज्ञा मिळालेली आहे ; आणि या बद्दल, यहुदी शकाच्या ४२५० वे वर्षी झामोरीन राजानें यहूद्यांना दिलेला ताम्रपट कोचीन मधील यहूद्यांच्या सिनेगॉग देवळांत पहावयास मिळतो. हल्लीं, येथें, या यहूद्यांच्या वंशजांची संख्या दोन ते तीन हजार असून जर्मनीच्या पोग्रम-छळानें गांजलेले यहूदी त्यांना येऊन मिळण्याची खटपट करीत आहेत.

कांहीं झालें तरी, ज्या शांतीच्या ख्रिस्त प्रभूनें इंग्रज लोकांना समेटाचे पुत्र, शांतीचे दूत बनविले त्या ख्रिस्त प्रभूचे स्वाधीन झाल्याशिवाय आमच्या यहुदी आणि अरब भावांना खरी शांती मिळणार नाहीं.

---

१ राजे १०:१८,२२. [२] २ राजे १९:१६ ; यशाया ३७:३७ ; व २ राजे २५: १-९.

प्रयाण

ख्रिस्ती भारत युवक संघाचे चिटणीस, अलाहाबादचे रे. ए. रल्लाराम यांनीं युवक संघातर्फे पालस्ताईनची यात्रा सुरू होणार असल्याचें, १९३७ सालच्या फेब्रुआरी महिन्यांत वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केलें होतें. त्याचप्रमाणें त्यांनीं प्रत्येक यात्रेकरूंपासून ३५० रुपये आगाऊ घेऊन येरुशलेमेला जाऊन परत येण्याचा प्रवास, भोजन व वाढाडे इत्यादि इत्यादि खर्चाची सर्व सोय केली होती.

हिंदुस्थानांतून परदेशाला जातांना लागणारे हिंदुस्थान सरकारचे परवाने-पासपोर्ट वगैरे ज्याचे त्यानें मिळवावयाचे होते.

शेवटीं ठरल्याप्रमाणें गुरुवार ता. ६ माहे मे १९३७ रोजीं सायंकाळीं, ६ वाजतां श्रीयुत संबाया आणि सौ. पद्मांबाई संबाया, अलाहाबाद; मिसेस् व मिस् फ्रॉस्ट, बालासुर; रे, जी. पी. चार्लस्, रंगून; कु. रिबेका आईप, अहमदनगर; श्री. ओ. एस्. तोबीत, आग्रा; डॉ. एल्. जी. मुकर्जी, बंगलोर, डॉ. एच्. गिनेस, मद्रास; आणि मी अशा दहा जणांनीं बी. आय्. एस्. एन्. कंपनीच्या व्हेरेला नामक मेल बोटीवर प्रवेश केला. या बोटींत सुमारें ३०० उतारूंची सोय असून त्यांत, पहिला वर्ग, दुसरा वर्ग, व तिसरा वर्ग म्हणजे डेक् पॅसेंजर्स, असे निरनिराळे विभाग आहेत.

सायंकाळीं, बरोबर साडेसहाला आमच्या बोटीचा भोंगा वाजून तिनें मुंबईचा धक्का सोडला. त्या वेळेस धक्क्यावरून, उतारूंचा प्रवास सुखाचा होवो असा कण्ठांतून कोणीतरीं मोठा ध्वनी केला.

धक्क्यावर शेंकडों लोक उभे होते. त्यांत माझी पत्नी गिरिजा, आठ वर्षांचा मुलगा जयसिंग व सहा वर्षांची मुलगी उषाराणी आणि

आमचे मुंबईचे बंधु श्री. धोंडीराम शेळके व सौ. फुलवंतीबाई शेळके व मुलें तशाच मिस् एम्. डेसर या सर्वांनीं आम्हांला प्रेमाचा निरोप दिला.

धक्क्यावरून बोट हळूंहळूं दूर जाऊं लागली तशीं आमचीं मुलें रडूं लागलीं. मी त्यांना रुमालानें टटा, बाय् बाय्, करीत होतों, तर इकडे आमची बोट पाणी कापीत समुद्रांत पुढेंपुढें जात होती.

थोड्याच वेळांत कोणी कोणाला दिसेनासें झालें. तरीहि धक्क्या-वरील आणि बोटींतील आप्तेष्टांचें, हातानें रुमाल हालवून शुभसंदेश देण्याघेण्याचें काम चाललेंच होतें. इतक्यांत अंधार पडला व बोटी-वरील दिवे लागले !

विलायतेहून येणाऱ्या मेलबोटींतील उतारू व टपाल, यांची वाट पाहण्याकरितां आमच्या बोटीनें भर समुद्रांत पुनः नांगर टाकला. ती मेलबोट जवळजवळ मध्यरात्रीनंतर आली. तोंपर्यंत आम्हीं आमची व्यवस्था लावण्यांत आणि बोटींतून दिसणाऱ्या अफाट मुंबई नगरीची शोभा पाहण्यांत, वेळ घालविला. त्यावेळीं मुंबईनगरी जणूं चमचमणाऱ्या रत्नराणी प्रमाणेंच नटली आहे असा भास होत होता.

आम्हीं डेकचें म्हणजे तिसऱ्या वर्गाचें तिकीट काढलें होतें, तरी दुसऱ्या वर्गांत आमच्या जेवणाची, आणि केबिन्‌वजा हॉस्पिटल बंक मध्यें, आम्हां सर्व यात्रेकरूंच्या निजण्याची सोय केली होती.

रात्रौ सुमारें दोन वाजतां आमच्या बोटीची घरघर पुनः सुरू होऊन आम्हीं कांहीं बसल्या बसल्या तर कांहीं निजल्या निजल्या वाट चालूं लागलों.

अरबी समुद्र थोडासा खवळलेला होता. तशांत आमची व्हेरेला

स्टीमर मुंबईहून उशीरा सुटल्यामुळें, वेळ भरून काढण्याकरतां जोरानें धांवत होती, त्यामुळें आमच्यापैकीं पुष्कळ उतारूंना बोट लागली, उलट्या झाल्या, फिरलें व जीव नकोसे झाले. अशा रीतीनें शुक्रवारचा दिवस उगवला.

मला त्या रात्रीं झोंप लागली नाहीं. मागें एकदां मीं, गोव्याहून मुंबईचा, किनाऱ्या किनाऱ्यानें जाणाऱ्या 'वेगावती' बोटीनें प्रवास केला होता. त्यावेळेस मला बोट लागली नाहीं तेव्हां ती आतांहि लागणार नाहीं अशा तऱ्हेच्या माझ्या मनाला मी सूचना करीत होतों.

परंतु आतां केबिन्‌च्या–पोर्टहोल–भोंकांतून बाहेर पाहिलें तों समुद्र आभाळाला टेंकलेला दिसूं लागला! त्याच्या लाटांचे तुषार त्या गवाक्षांतून आंत येऊन माझ्या नाकातोंडांत घुसूं लागले व वासानें माझें डोकें उठलें.

कांहीं वर्षांमागें मी एकदां उत्तर हिंदुस्थानांतून परत येत असतां आग-गाडींत एका युरोपियन गृहस्थाला मुंबईच्या अलीकडील वसईच्या खाडीचा ओशट वास घेऊन आनंदानें मिटक्या मारतांना पाहिलें होतें, तें आठवण झाली पण मिटक्या मात्र मारणें मला शक्य नव्हतें!

आणि मला समुद्र लागणार नाहीं असें जें मी माझ्या मनाला बजावीत होतों, त्या स्वयंसूचनेचीहि मात्रा चालली नाहीं. मला उलटी झालीच! हात पाय गळल्यासारखे होऊं लागले. हृदयाची आग होऊं लागली. मन चल-बिचल झालें. उठलें तर चक्कर येऊं लागली, निजलें तर अंग दुखूं लागलें, फिरावें म्हटलें तर बोटीबरोबर मीहि हेलकावयास लागलों

दिवसां केव्हांतरी आठवण झाल्यावर मी खिशांतील आयोडीनची बाटली मोठ्या कष्टानें बाहेर काढली, आणि त्यांतलें थाडेसें आयोडिन चाटलें.

पण त्यानें कांहींच गूण आला नाहीं. नतर मला कोणीं कमलेंसें जिंजर

पाणी पाजलें, त्यानें फारच उलटी सुरू झाली अन्न कांहीं जाईना ! या-नतरचा प्रत्येक क्षण मला युगाएवढा मोटा वाटूं लागला. आतां मला पुढचा प्रवास झेपेल कीं नाही याची भिती वाटूं लागलीं. परंतु ज्या प्रभूनें मला भर समुद्रांत आणून सोडलें होतें, तो प्रभू माझा सर्व मार्ग सुखकर करील अशी बळकट आशा वाटत होती. आणि आमचे प्रवास सुखाचे होणेबद्दल पुष्कळ मंडळी प्रार्थना करीत आहेत, हा विचार मनाला धीर देत होता.

शिवाय ख्रिस्तप्रेम कळविण्याकरितां आप्तेष्ट सोडून महिनेच्या महिने बोटीचे हाल सोशीत, कष्ट करीत, दिगंताप्रत जाणाऱ्या मिशनेरी बंधुभगिनींचें उदाहरण मला सर्वतोपरी सांवरून धरीत होतें.

बोट लागणें व त्याचे निरसन होणें या विषयावर माझ्या सुप्त व अर्ध-निद्रिस्त मनानें पुष्कळ गोष्टी श्रवण केल्या. कोणी म्हणत बोट लागण्याचा जन्मांतून एखादा तरी अनुभव यावा. कोणी म्हणत कांहीं उपाय नाहीं. तर कोणी म्हणत उपोषण करावें, थोडें खावें, निजून रहावें. तर याच्या उलट चापून खावें, इकडे तिकडे फिरावें असेहि कांहीजण म्हणत.

पण प्रसंगीं कांहींच साधत नाहीं. संवय करून निबरधट्ट बनणें हाच एक उत्तम मार्ग !

एकदां एका लहान मुलीला बोट लागली होती ती आपल्या बापाला म्हणे बाबा, मला समुद्रांत उचलून कां हो टाकीत नाहीं.

अशा तऱ्हेच्या विचित्र वातावरणांत शनिवारीं संध्याकाळीं आम्हीं कराची बंदर गांठलें.

कराचीला डॉ. गोविंदराव व सौ. अँजेलिनबाई हिवाळे हीं आम्हाला भेटावयाला आलीं होतीं डॉ. हिवाळे हे कराची, ख्रिस्ती भारत संघाचे अध्यक्ष असल्यामुळें त्यांच्या बरोबर कराचीचीं पुष्कळ ख्रिस्ती बंधु भगिनी आलीं होतीं.

त्यांत मेजर जमालउद्दीन हे आपल्या पत्नी समवेत हजर होते. त्यांच्या पत्नी, ह्या रे. रल्लाराम यांच्या भगिनी होत.

कराचीला, उत्तर हिंदुस्तानकडील मिस पर्सिस स्टीफन्स बरेली, कुमारी एन व्ही. सिंग मथुरा, श्री. एम. डी. पतियाल अलमोडा, श्री. के. गोलकनाथ जालंदर व कराचीचे मि० डब्ल्यु. डी. कॉडन असे आणखी पांच यात्रेकरू आम्हांला येऊन मिळाले. आतां आम्हीं १५ यात्रेकरू झालों.

आदित्यवारीं सकाळींच खलाशी लोकांनीं बोट धुतली होती, त्यांत भिजलेल्या लांकडी फळ्यांवरून चालत असतां माझी एक चप्पल भिजून तिचा पट्टा निसटला. तो शिवून आणण्याकरितां मी जवळच असलेल्या किमारी बंदरावर गेलों. मोच्यांचीं दुकानें अजून उघडलीं नव्हतीं.

तेथें मला एक खलाशी भेटला, तो म्हणाला ' मी तुमच्या चप्पलला टांका मारून आणतों, मोचीला तीन आणे द्या व मला तीन आणे द्या. ' परदेशांत कराव्या लागणाऱ्या उधळपट्टीचा हा प्रारंभ आहे हें मीं ओळखलें.

सकाळीं आठ वाजतां पासपोर्ट अधिकाऱ्यांनीं आमच्या प्रकृती तपासून व देवी, कॉलरा आणि प्लेग प्रतिबंधक लस वगैरे टोंचून घेतल्याचीं सर्टी-फिकिटें पाहून आमच्या मनगटांवर रबरी शिक्याचे ठसे उमटविले !

कराचीचे बाजूनें इराक, इराण, वगैरे देशाला जाणाऱ्या प्रवाशांची अशा तऱ्हेनें कसून परिक्षा होते.

कराची बंदरांत आतां आम्हांला विश्रांतीमुळें तेथील बंधुभगिनींना केलेल्या मनःपूर्वक स्वागतामुळें बरीच हुषारी आली होती. त्यांनीं आमचीं छायाचित्रें घेतलीं ; आणि वाटेंत लिंबुपाणी करण्याकरितां लिंबाच्या थैल्या व सहा महिन्यापेक्षांहि अधिक दिवस टिकणाऱ्या कराचीच्या प्रसिद्ध सोंड हलव्याचे डबे आम्हांला दिले. या हलव्याची सर्व जगभर निर्यात होते.

आतां समुद्र थोडा शांत दिसत होता. व आम्हलाहि त्याची थोडी संवय होत चालली होती.

शिवाय आम्हीं ती खालची केबिनची कोंदट खोली सोडून वरच्या डेकवर खुल्या जागेंत आलों होतों. तेथें आम्हीं सर्वांनीं पालेस्ताईन देशा-संबंधीं माहिती देणारीं पुस्तकें, प्रवास वर्णनें आणि नकाशे वगैरे मांडून ठेविले होते.

उपरिनिर्दिष्ट पुस्तकें वाचण्यांत आणि मिस स्टीफन्सचीं इंग्रजी व हिंदी गाणीं ऐकण्यांत दिवसभर निघून गेला. रात्रीं आंतर विश्वविद्यालय संघाचे डॉ. गिनेस यांनीं लूक ९:१–१० वाचून उपासना चालविली.

सोमवार ता. १० हा पांचवा दिवस उजाडतांच आणखी आम्हाला बोट लागूं लागली. तेव्हां डॉ. गिनेस यांनीं बोट लागणाऱ्या सर्वांना Bisodol हें औषध पाजलें. मला त्या औषधानें बरें वाटलें.

मी दाढी करून, आतांपर्यंत वापरलेले सर्व कपडे धुऊन काढले आणि नळाखालीं बसून समुद्राच्या खारट पाण्यानें आंघोळ केली. तसेंच बोटीवर इकडून तिकडे फिरणें झाल्यावर, आतांपर्यंत झालेल्या प्रवासाचें टिपण लिहून काढलें. त्यावेळीं समुद्र कांचेच्या एका भल्या माठ्या तुकड्यासारखा दिसत होता.

मंगळवार सकाळ आम्हांला मंगलदायी वाटली. आतां बोट ताशीं १५ मैलांच्या वेगानें चालली होती.

या ठिकाणीं, कोठेंकोठें, पाण्याच्या पृष्ठभागावर आलेली समुद्रांतील पर्व-तांची शिखरें आम्हाला कागदावर ठेवलेल्या दगडी कोळशासारखीं दिसूं लागलीं.

११ वाजतां बोटीनें एकाएकीं भयप्रद भोंगा वाजविला. सर्व खलाशी आणि कामगार गळ्याभोंवतीं प्राणरक्षक गोल रबरी फुगे Life buoy अड-कवून सैरावैरा धाऊं लागले.

कित्येक खलाशांनीं प्राणरक्षक नाव गडबडीनें डेकवरून खालीं समुद्रांत सोडली. बोटीला अपघात झाल्यास उतारूंना प्राणरक्षक साधनांची माहिती असावी या हेतूनें अशा तऱ्हेनें लुटुपुटीचें प्रदर्शन कव्हां केव्हां बोटीवर दाखविण्यांत येतें.

अशा तऱ्हेनें मे. ता. १२ बुधवार रोजीं सकाळीं इराणच्या आखाताच्या मध्यभागीं असलेल्या अरबस्थानांतील बहराईन बेटाला आम्ही जाऊन पोहोंचलों.

आमची बोट दूर समुद्रांत उभी राहिली होती; तिच्याभोंवतीं मालाची ने आण करणाऱ्या लहान सहान पडावांनीं वेढा घातला होता.

कित्येक मचव्यामधून गोरे अरब व काळे शिद्दी भाताचे गोळे तोंडांत टाकीत होते. त्यांच्यांतलि कित्येक विनोदी भाजनभैरव ओठांनीं आणि बोटांनीं आम्हांला वेडावीत होते.

बहराईनच्या मिशन दवाखान्यांत काम करीत असलेले आमचे मिरजेचे बंधु डॉ. दौलतराव सत्राळकर यांना भेटण्याची आम्हाला फार इच्छा होती. परंतु कराचींत, आम्ही निघालेल्या दिवशीं, कोठेंतरी प्लेगची एक केस झाल्यामुळें, आमच्या बोटीनें करंटाइनचें पिवळें निशाण धारण केलें होतें. त्यामुळें आम्हांला बहराइनच्या बेटावर उतरूं दिलें नाहीं.

आज सहावे जॉर्ज बादशहा यांच्या राज्यारोहणाचा मंगलदिन असल्यामुळें बहराईन बेट पताकांनीं सजविलें होतें.

बहराईनचे राजे शेखसाहेब हे सुंदर रितीनें सजविलेल्या आपल्या लॉंचमध्यें बसून आमच्या बोटीजवळून जातांना आम्हांला दिसले.

संध्याकाळीं आम्हीं आमच्या बोटीवरील मुख्य आचाऱ्याच्या (स्टयूअर्डच्या) मागें लागून आइस्क्रिम मिळविलें; आणि त्यावर व कराचीच्या हलव्यावर आम्हीं राज्यारोहण साजरें केलें.

बहराईन—बगदाद

दुपारीं एक वाजतां आम्हीं बहराईन सोडलें, तों आणखी सर्वत्र पाणीच पाणी दिसूं लागलें.

इराकमधील करबालाच्या जायरत यात्रेस निघालेल्या मुसलमान लोकांचा भरणा बोटीवर फार होता. त्यांच्या पैकीं बऱ्याच स्त्रिया कुराणवाचन करीत होत्या. एकानें करबालांत पुरण्याकरितां आपल्या बापाचें प्रेत बोटींतून आणलें होतें.

एक रुबाबदार मौलवी १०–१५ मुसलमानांना नमाज पढवीत असे. पुढें त्याला लागली बोट! तरी नेमलेवेळीं तो स्वतः नमाज पढायला उठे, आणि प्रत्येक वेळीं चक्कर येऊन खालीं पडे. त्याच्या नमाज पढण्याचें तें दृश्य अजूनहि माझ्या डोळ्यांपुढें सारखें उभें आहे.

आमच्या यात्रेकरूंपैकीं सर्वांत वयोवृद्ध श्री. के. गोलकनाथ यांचा, एका तडफदार पंजाबी मुसलमान गृहस्थाबरोबर कडाक्याचा वाद चालत असे.

'वधस्तंभावर खिळिलें जाण्याच्या आदले रात्रीं येशू ख्रिस्तानें प्रार्थनेंत वेळ घालविला, यावरून येशूचा या संकटापासून पळून जाण्याचा बेत होता,' हा त्या मुसलमानी गृहस्थाच्या वादाचा मुख्य मुद्दा गोलखनाथजी खोडून काढीत होते.

पैगंबराचे अवतार अजूनहि होत आहेत असें मानणाऱ्या पंजाबच्या अहमदीयानीं सुरू केलेल्या कादियिया पंथाचा तो एक मुसलमान पुरस्कर्ता असून जवळ जवळ सर्व नवा करार त्याला मुखोद्गत होता.

त्यांच्या विथरत चाललेल्या मनोवृत्तींवरून, केव्हांतरी त्या वादाचें पर्यवसान मारामारींत होतें कीं काय असें मला वाटत असे. वादे वादे जायते 'मुष्टि लाभः'!

पुढें त्या मुसलमान गृहस्थाची मीं ओळख करून घेतली आणि त्यानें येशू ख्रिस्ताला आत्मसमर्पण करावें अशी मीं त्याला नम्रतेची विनंती केली.

ता. १३ रोजीं संध्याकाळीं, सुरवातीपासून सुमारें १५०० मैलांचा प्रवास करून आम्ही युफ्रातीस नदीच्या मुखाजवळ आलों.


या ठिकाणीं युफ्रातीस नदीचें पात्र मैलचेंमैल दूरवर पसरलें असून समुद्र आणि नदी यांचा संगम गंगा यमुनेच्या संगमाप्रमाणें भासतो.

नदीचें गढूळ पाणी समुद्राच्या निळसर पाण्याला येऊन मिळतें. शिवाय संगमाच्या तळाला नदींतून वाहून येणारे वाळूचे थर एकावर एक सारखे चढत जात असल्यामुळें, या ठिकाणी पाण्याची खोली केवळ ९ वांव भरली. भरती येऊन समुद्राचें पाणी वर चढेपर्यंत आमची बोट इथेंच राहिली.

या ठिकाणाहून ४० मैलांवर, उत्तरेला युफ्रातीस व तैग्रिस या दोन नद्यांचा संगम आहे. त्या संगमावर बसरा शहर वसलेलें आहे.

बसऱ्याकडे जातांना, नदीच्या उजव्या बाजूला इराण व डाव्या बाजूला इराक हे देश आहेत.

नदीच्या दोन्ही तीरांवर खजूरांच्या, कोट्यावधि झाडांच्या, बागा लागतात.



खजुरीच्या बागा

इराणांत, म्हामरा नांवाच्या बंदराजवळ, पेट्रोलच्या खाणी आहेत. त्या खाणींतून, प्रथम वर उसळणारे अशुद्ध वायु coal-gas नळींतून लांबवर नेऊन, पेटवून देतात. बोटीमधून त्याचा जाळ ज्वालामुखी पर्वताप्रमाणें दिसतो, आणि पेट्रोलचा वास येतो.

शुक्रवार ता. १४ मे १९३७ रोजीं, नववें दिवशीं, पहांटेस आम्ही बसऱ्याला पोहोंचलों.

तेथें. येरुशलेमेहून, आम्हाला तिकडे न्यावयास आलेले आमचे अरब ख्रिस्ती वाटाडे बंधु, फरांद सालमन्, हे हजर होते. त्यांना पाहून आम्हा सर्वांना फार आनंद झाला.

बोटींतून उतरण्यापूर्वी इराकी डॉक्टरांनीं सर्व उतारूंची वैद्यकीय तपासणी केली. ज्यांच्या सर्टिफिकेटावर सरकारी डॉक्टरांची सही नव्हती, त्यांना फिरून टोंचून घ्यावें लागलें !

त्यावेळेस एका स्त्रीला प्रसूतिवेदना लागल्या होत्या.

आमच्या टोळींपैकीं, श्री. ऑस्कार तोबीत यांचा परवाना–पासपोर्ट– मुंबईला बोटीवर चढण्यापूर्वी हातीं आला नव्हता. तो पाठीमागून विमानानें येत असल्याची, थॉमस्कुक कंपनीची तार आली होती. परंतु इराकी अधिकारी त्यांना बोटांतून खालीं उतरूं देईनात ! शेवटीं इराक रेल्वेमधील श्री. रायराव सुबाराव नांवांच्या एका हिंदी अधिकाऱ्यानें श्री. तोबीत यांची हमी घेतल्यावर पासपोर्ट परवाना येईपर्यंत बसरा बंदरांवर त्यांना उतरण्याची परवानगी मिळाली.

पालेस्ताईन देशांत जाण्याबद्दल जरी आम्हांला पासपोर्ट मिळाले होते, तरी वाटेंत अरब लोकांचा देश, इराक व फ्रेंच सत्तेखालीं असलेला सिरीया, या देशांतून जावें लागत असल्यामुळें त्या त्या देशाच्या कौन्सलचे–

परराष्ट्रीय वकीलाचे (व्हिजे-Vise म्हणजे) सही शिक्के मिळवावे-लागले.

बसरा बंदरावर आमचे रुपये घेऊन, आपलीं आणेलीसारखीं लहान इराकी नाणीं बदलून देणारे सराफ—सावकार आमच्या सभोंवतीं जमले. इराकी लोकांच्या नाण्यांत आमच्या रुपयाची किंमत '७५ फिल्स' होते. परंतु व्यवहारांत बटाव म्हणून ते लोक १—२ फिल्स कमी देतात.

तसेंच इराकी लोक हिंदुस्थानांत आले तर त्यांचे ७५ फिल्स घेऊन आमचे लोक रुपयाऐवजीं त्यांना फक्त १४...१५ आणेच देतात.

परकीय नाण्यांची अदलाबदल करण्याची – money-exchange- ही सर्व संमत रीत आहे.

दहा, शंभर, हजार, अशा दशक गणतीच्या तत्त्वावर इराकचीं नाणीं पाडलेलीं आहेत.

इराक देशांत रस्त्याच्या उजव्या बाजूनें वाहनें हांकण्याची वहिवाट आहे. आपल्या इकडे ज्याप्रमाणें पुण्याला उतारूंच्या भोंवती टांगेवाल्यांचा गराडा पडतो त्याचप्रमाणें बसऱ्याला मोटार हाके उतारूंच्या भोंवती जमून एकच गोंगाट करतात.

बसरा गांवामध्यें, अमेरिकन मिशनचे डॉ. व्हॅनेस, यांनीं आमचें प्रेमानें स्वागत करून, आम्हांला आपल्या सुंदर होड्यांमधून युफ्रातीस नदी तटाकीं फिरविलें.

या नदीचे अनंत फाटे मैलचेमैल पसरले असून, त्यांमधील प्रदेश सुंदर घरांनीं, खजुरांच्या बागांनीं, व द्राक्षमळ्यांनीं सुशोभित झालेले आहेत.

एका घरांतून, नदीपलीकडील दुसऱ्या घरांत, अथवा एका बागेंतून

दुसऱ्या बागेंत जावयाचें झालें तर नावेंतून, अगर कालव्यावर बांधलेल्या पुलावरून जावें लागतें. यामुळें ' बसऱ्याला ' पौर्वात्य ' व्हेनिस ' हें नांव पडलें आहे.

दुतर्फा खजुरांच्या झाडांनीं बहरलेल्या कालव्यांतून पाणीं म्हणत, आम्हीं आपली नौका वल्हवीत असतां, भोंवतालचा तो नयनमनोहर प्रदेश पाहून, आम्ही नंदनवनांत विहार करीत आहों असेंच आम्हांस वाटलें.

मानवीं जात युफ्रातीस व तैग्रिस या दोन नद्यांच्या दुवाबांत Mesopot निर्माण झाली आणि एथेंच देवाचा एदन बाग होता, असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

ख्रिस्ताब्दापूर्व २००० वर्षें याच सुपीक व नयनमनोहर प्रदेशासाठीं निरनिराळ्या मानवी जातींमध्यें, शतकानुशतक रणें माजून राहिलीं होतीं.

कालांतरानें, भुगर्भांतील मीठ-क्षार-वगैरे चढत जाऊन, एके काळीं सुपीक असलेला हा प्रदेश आतां कित्येक ठिकाणीं मैलोनमैल ओसाड पडला आहे.

शुक्रवारीं रात्रीं श्री. तौबीत यांना मागें ठेऊन आगगाडीनें आम्हीं बगदादकडे गेलों. सुमारें १२३ मैल गेल्यावर पहाटे ५ वाजून १० मिनिटां-वर आम्हांला अब्राहामाचें प्राचीन ऊर गांव लागलें.

हा ऊर गांव म्हणजे ख्रिस्ताब्दापूर्वी २४०० वर्षांपूर्वी वसलेल्या एका शहराचा अतिशय जुना अवशेष आहे. तो मोडक्या तोडक्या आणि कुजून गेलेल्या पडक्या घरांचा, एका टेंकडीएवढा कचऱ्याचा ढीग आहे. या ढिगांतून बाहेर येत असलेल्या-डांबरी चुन्यावरून-Bitumen-अरब लोकांनीं या जागेला मुगाय्यार हें नांव दिलें होतें.

ख्रिस्ताब्द १८५४ मध्यें बसऱ्याला असलेले इंग्रज वकील मि. टेलर यांनीं हा कचऱ्याचा ढीग उकरून पाहिला. त्यांत त्यांना मातीचे भाजून

पक्के तयार केलेले तीन नळ मिळाले. त्यावर पाचरासारख्या दिसणाऱ्या अक्षरांनीं कोरलेली–कनेइ फार्म–लिपी होती.

त्या लिपींत बाबेलोनच्या शेवटच्या नबोनिदस राजानें राजपुत्र बेलशस्सर याच्या नांवानें चंद्राला अर्पण केलेली प्रार्थना आहे. या बेलशस्सर राजाचा परिचय, दानिएलाच्या पुस्तकावरून आपणां सर्वांना विदित आहे.

आतांपर्यंत सांपडलेल्या पुराव्यावरून व हीबरू अथवा हिब्रू ह्या कनेईफार्म लिपींतील शब्दप्रयोगावरून, मुगय्यार हें अब्राहामाचें ऊर गांव होतें, असें आतां नि.संशय सिद्ध झालें आहे.

अगदीं अलीकडें म्हणजे १९२२ सालीं सर सी. वुली यांनीं ऊर गांवांत, जमिनींत खोल विहिरी खोदून प्रलय काळापूर्वीचे जमिनीचे थर शोधून काढले आहेत.

पवित्र शास्त्रांत वर्णिलेल्या अब्राहामाच्या स्फूर्तिप्रद आणि विश्वास-पूर्ण जिण्याला या ऊर गांवापासूनच प्रारंभ होतो. तेव्हां देवानें आम्हांला या स्थळाप्रत सुखरूप पोहंचविलें याबद्दल त्याचें स्तवन करून आम्हीं उत्पत्ती ग्रंथाच्या ११ व्या अध्यायांतील २७–३१ ओव्या वाचून पाहिल्या.

दुपारीं ११ वाजतां आम्हीं हिल्लाह नामक स्टेशनावर पोहंचलों तेथें एक बंगाली गृहस्थ स्टेशन मास्तर आहेत.

या स्टेशनपासून ३ मैलांवर खाल्दी लोकांच्या पुरातन बाबेलोन शहराचे अवशेष आहेत. तिकडे आम्हीं घोड्याच्या गाडींतून गेलों.

या ठिकाणीं उष्णतामापक यंत्र १२०° वर जातें. यावरून एथील उष्णता किती उग्र स्वरूपाची असावी याची वाचकांनींच कल्पना करावी. आमच्या यात्रेकरूंपैकीं मिसेस फ्रॉस्ट यांनीं गाडींतून खालीं न उतरतां आल्या मार्गानें स्टेशनचा रस्ता सुधारला. त्यांना ही उष्णता सहन झाली नाहीं.

बाबेलोन शहर वसून आज सुमारें ६००० वर्षे झालीं. अब्राहामा-च्या वेळेस त्या ठिकाणीं हामूराबी नांवाचा राजा राज्य करीत होता. या राजानें दगडांच्या खांबावर कोरलेलें कायदे हल्लीं सांपडले आहेत. यावरून त्यावेळच्या लोकांत हल्लीं प्रमाणेंच गुन्हा करण्याची प्रवृत्ती होती असें दिसतें.

सदेह स्वर्गाला जाण्याच्या इरायानें बांधलेला बाबेलोन बुरूज एथेंच होता. (उत्पत्ति ११: १–१०)

बाबेलोन शहराच्या उत्तरेस २५० मैलांवर म्हणजे हल्लींच्या मौसल गांवाजवळ, निनवें नांवाचे एक अस्सिरी लोकांचें बळाढ्य साम्राज्य होतें. तेथील सन्हेरीब नांवाच्या राजानें ख्रिस्ताब्दापूर्वी ६८९ या वर्षी, खाल्दी लोकांच्या बाबेलोन शहरावर स्वारी करून ते पादाक्रांत केलें. (२ राजे १८ : १३)

या सन्हेरीब राजाचा वारस नबूखदनेझर यानें बाबेलोन शहर पुनः बांधलें. त्यानें पुनरज्जिवित केलेल्या या बाबेलोन शहराचा तट, चार घो-ड्यांचा रथ सहज जाईल इतका रुंद होता.


याच नबुखदनेझर राजानें ख्रि. पू. ६०० मध्यें मिसर देशापर्यंतचा मुलुख काबीज करून, यहुदी लोकांना गुलाम करून बाबेलोनला नेलें (२ राजे २४ व २५ अध्याय)

पुढें ख्रि. पूर्वी ५३९ नंतर बेलशस्सर राजाच्या कारकीर्दींत, इराण-मधील पारशी लोकांच्या कोरेश नांवांच्या राजानें बाबेलोन शहर जिंकून यहुदी लोकांना मुक्त केलें. (एज्रा १ : १–४)

पुढें २०० वर्षांनीं मासेडोनियाच्या महान शिकंदर बादशहानें पारशी लोकांचा मोड करून, हिंदुस्थानपर्यंतचे देश काबीज केले. आणि ख्रि. पू. ३२३ वें वर्षी तो बाबेलोनमध्यें तापानें मरण पावला.

शिकंदराच्या काळानंतर बाबेलोन शहर अधोगतीला गेलें. तशांत यूफ्रातीस नदीचें पात्र बाबेलोन शहरापासून शेंकडों मैल पूर्वेकडे घटत गेल्यानें, बाबेलोन शहर आणि त्याच्या आसमंतांतील प्रदेश ओसाड पडून इर्मयाच्या संदिष्ट वाणीप्रमाणें तें नामशेष झालें.

आतां संशोधकांनीं जमिनीखालीं गडप झालेले नबुखदनेझर राजाचे राजवाडे उकरून काढून खुले केले आहेत. तेथें आम्ही बेलशस्सर राजाचा मेजवानी महाल, सिंहाची गुहा, व ज्या भिंतीवर "मने मने तकेल उफार्सिन" हें दानिएल ५:२५ मधील शब्द अद्भुत रितीनें लि--हिले गेले होते, ती भिंत वगैरे पुष्कळ गोष्टी पाहिल्या



बाबेलोनच्या सिंहाजवळ : लेखक

उन्हाचा तडाका भयंकर असल्यामुळें या ठिकाणीं आम्ही इर्मयाचा ५१ वा अध्याय व दानिएलाचें पुस्तक, यांचें जलद रीतीनें वाचन केलें

खास्द्यांचे ऊर व बाबेलोन या गांवासंबंधीं जितकें लिहावें तितकें थोडेंच !

अलीकडे या दोन जागांच्या दर्शनाकरतां यहूदी लोक सारखे येथें लोटत असतात

आम्ही बाबेलोनपासून स्टेशनवर परतलों तेव्हां आम्हाला यहूदी स्त्री-

पुरुष मुलें वगैरेंची एक टोळी भेटली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं तैग्रिस नदीच्या कांठावर वसलेल्या प्रसिध्द बगदाद शहराला आम्हीं पोंचलों. बगदाद स्टेशनवरील अरब हमालांना इंग्रजीं बोलतां येतें !

आम्हां हिंदी लोकांना पाहून एका बगदादी मुलाला स्फुरण चढलें. सायकलवर बसून तो आमच्या पुढें जाई व गरकन फिरून झपाट्यानें परत येई. रस्त्यावर पाणी शिंपडलेलें होतें त्यामुळें एका गिरकींत तो पोरगा धाडकन खालीं पडला. पण जणूं कांहीं लागलेंच नाहीं असें भासवून तो साय-कलवरून पसार झाला.

नदीकांठच्या ' दिजला ' हॉटेलमध्यें बसून आम्ही बगदादची शोभा पाहिली. नवीन वसाहतीमधील रुंद रस्ते सिमेंटचे बांधलेले असून, त्यांच्या दोन्ही बाजूला कण्हेरीच्या झडांप्रमाणें दिसणारीं ओलियांडर नांवाचीं झाडें फुलांनीं बहरलेलीं होती.



बाबेलोनचे अवशेषः वेस

कित्येक ओलियांडरचीं फुलें तांबडीं, कित्येकांचीं पिवळीं, तर कित्येकांचीं पांढरीं शुभ्र होती. या रंगीबेरंगीं झाडांमधून कांहीं ठिकाणीं युकेलिप्टसचीं आणि जरदाळूंचीं झाडें आहेत तर कांहीं ठिकाणीं झुपकेदार सेडार सुरुंची आणि उंच सरळ पॉपलरचीं झाडें आहेत. त्यामुळें रस्त्यांना घरांना, आणि बागांना अवर्णनीय शोभा येते.

बगदादचे लोक गौरवर्णाचे असून, स्त्रीपुरुष सर्व युरोपियन पोषाख घालतात. चहूंकडे कॉफीगृहांत बसून, शेंकडों लोक हुक्का गुडगुडी ओढतात, कॉफी पितात, ध्वनिक्षेपक यंत्र – रेडिओ – ऐकतात, आणि बुद्धिबळें खेळतात. यांच्याकडे पाहून एक देश, दिल, आणि बंधुप्रेम म्हणजे काय याची कल्पना होते.

ता. १६ मे रोजीं आदित्यवार असल्यानें आम्ही बगदादच्या, हिंदी ख्रिस्ती प्रार्थना मंदिराला गेलों. श्री. संबाया यांनीं उपासना चालविली. या ठिकाणीं विमानखात्यांत काम करणारे पुष्कळ हिंदी लोक आणि त्यांचीं कुटुंब लेकरें आम्हांला भेटलीं.

त्यानंतर आम्ही बगदादचें, इराकी सरकारचें पुराण वस्तु संग्रहालय –म्युझियम्– पाहिलें. संग्रहालयाच्या मुख्याध्यापकांनीं स्वतः हजर राहून आम्हांला माहिती पुरविली.

ख्रिस्ती शकाच्या सुमारें ५००० वर्षांपूर्वी मनुष्याला अक्षर ओळख नसल्यानें लिहितां वाचतां येत नव्हतें. त्या काळाला इतिहास पूर्वकाळ म्हणण्याचा वहिवाट आहे. या इतिहासपूर्व काळांत मनुष्याला सोनें, रुपें, तांबें, पितळ, वगैरे धातूंचें ज्ञान नव्हतें. त्या काळचीं दगडी नाणीं, हत्यारें, चाकू, करवती, ताइतांच्या पेट्या, नकाशे, भांडीं वगैरे सर्व वस्तू या ठिकाणीं संग्रह करून ठेविल्या आहेत.

पुढें मानवांना थोडीशी कला अवगत झाल्यावर त्यांनीं तिचा उपयोग

मातीचीं भांडीं, दिवे, खुजे, वगैरे तयार करण्याकडे केला. आणि त्यानंतर त्यांना सोनें, रुपें, तांबें, पितळ, लोखंड वगैरे धातूंचेहि ज्ञान प्राप्त झाल्यावर त्यांच्या आधिभौतिक ज्ञानांत भर पडून त्यांनीं जवळ जवळ त्या काळचा सुधारणेचा कळस गांठला होता.



बाबेलोन शहरा जवळ आम्हीं यात्रेकरू.

ख्रिस्त पूर्व काळ ज्याला म्हणतात त्याच्याहि कित्येक शतकें आधीच्या गोष्टी आहेत.

पालेस्ताईनमध्यें उत्खननांत फारसें लेखी कांहीं सांपडत नसलें तरी त्या उत्खननांत सांपडलेल्या भांड्यांवरून किंवा दिव्यावरून पुष्कळ गोष्टी कळतात. अमूक प्रकारचें भांडें किंवा अमूक प्रकारचा दिवा एखाद्या ठिकाणीं खणतां खणतां सांपडला तर अमूक काळचा ठेवा आपणास सांपडत आहे हें त्यावरून कळतें. क्रीट किंवा मिसर देशाच्या वस्तु अमूक खोलीवर खणतां खणतां सांपडल्या कीं तेवढ्यावरून क्रीट किंवा मिसर देशचा व्यापार त्या काळीं येथें चालू होता असें म्हणतां येतें.

अब्राहामाच्या वेळेला ऊर गांवांत, मृत राजा अगर राणी यांच्या प्रेताबरोबर त्यांच्या नोकर वर्गाला मारून अगर जिवंतपणी पुरण्याची चाल होती हें हल्लीं सांपडत असलेल्या वस्तुस्थितीवरून सिद्ध होत आहे.


जमिनीच्या खालीं चेपून दामटी झालेलीं राजा – राणीचीं दोन प्रेतें ऊर गांवांत अगदीं अलीकडे सांपडलीं तीं आतां बगदादच्या म्युझियममध्यें आगून

ठेविलीं आहेत. त्यांच्या मस्तकांवर, मनगटांवर, आणि गळ्यांत असलेले सोन्याचे आणि हिऱ्यामाणकाचे दागिने अगदीं मूळ स्थितींत पहायला सांपडतात

काल परवांपर्यंत ऊरच्या उत्खननांत खि. पू. २३ व्या शतकांत होऊन गेलेल्या एका धर्माधिकाऱ्याची पाचूच्या खड्याची कंठी सांपडली आहे. इराकी लोकांना तिचें मोल ब्रिटिश म्युझियमच्या किमतीहून अधिक वाटतें.

ज्यांना सुमेरी, बाबेलोनी, आणि अस्सिरी वगैरे लोकांच्या इतिहासाची यथार्थ कल्पना करून घ्यावयाची असेल त्यांनीं आयुष्यांत एकदां तरी बगदादचें म्युझियम अवश्य जाऊन पहावें.

बायबलमध्यें वर्णिलेल्या कांहीं ऐतिहासिक गोष्टी हल्लीं इराकमध्यें सांपडत असलेल्या पुराव्यावरून सिद्ध होत आहेत.



बगदाद ते दमास्कस

सोमवार ता. १७-५-३७ या दिवशीं सकाळीं ५ वाजतां आम्हीं बग-दाद सोडलें.

इकडे इराकमध्यें वालुकामय प्रदेशांत प्रवाशाची ने आण करणाऱ्या मोटारी मुंबईमधील बस प्रमाणें लांब, रुंद, उंच आणि भक्कम अशा असतात



बगदादची मोटार

या मोटारीच्या दोन्ही बाजूला खुर्च्यांच्या दोन दोन रांगा असून त्यांच्या मध्यभागीं जण्यायेण्याकरितां रस्ता असतो. रात्रीं स्प्रिंगच्या सहाय्यानें खुर्ची मागें झुकती करून त्यावर प्रवाशाला झोंपतां येतें. खुर्चीचें वरचे अंगास दोन्ही बाजूला हलकें सामान ठेवण्याकरितां जाळीचें कप्पे असून मोटारींत मागें व पुढें बर्फाच्या गार पाण्याच्या चाव्या असतात.

मोटारीच्या टपावर पेट्रोल व बर्फ ठेवण्याकरतां स्वतंत्र टांक्या असून त्यावर जड सामान रचतां येतें.

आम्ही नॅशनल मोटार सर्व्हिसनें प्रवास केला. नेअर्न ट्रान्सपोर्ट कंप-नीच्या मोटारी जगप्रसिद्ध आहेत. त्यांच्या मोटारीला एंजिनची स्वतंत्र

मोटार असून त्यांना मागें प्रवाशी बसण्याकरितां बॉडी जोडलेली असते. हल्लीं हा प्रवास विमानानें चार सहा तासांत करतां येतो.

दमास्कसला जाणाऱ्या मोटारी आठवड्यांतून बहुतकरून, दोनदांच म्हणजे मंगळवारीं व गुरुवारीं सुटतात. मोटारचें माणशीं भाडें २ पौंडा-पासून ५ पौंडापर्यंत पडतें. हल्लीं १ पौंडाचा भाव १३ रु. ८ आणे आहे.

बगदाद सोडल्यावर आसपास कांहीं मैलपर्यंत लागवडीची जमीन लागते. तींत गहूं, कापूस, भाजी व लूसर्न घास वगैरे पिकें होतात. क्वचित प्रसंगीं आम्हाला हरेल सारखे हिरवे पक्षी दिसले. कोठें कोठें टोळधाटोळयांनीं फिर-णाऱ्या बिदूइन नांवाच्या अरब लोकांच्या जातीं, आपल्या काळया घोंग-ड्यांनीं आच्छादलेल्या पालांत राहतांना दिसल्या. या पालांभोंवतीं घोडीं, गाढवें, उंट, शेरडें, मेंढरें, आणि कुत्रीं यांचाहि घोळका दिसे.

यानंतर पुढें वाळूचे मैदान लागलें. त्यांत पांच पांच किलोमिटर, म्हणजे सुमारें तीन साडेतीन मैलांवर, पुरुषभर उंच खांबाला, रस्ता दाख-विणाऱ्या पाट्या लावलेल्या आहेत.

१४० किलोमिटरवर फलुजा नांवाचें गांव लागतें. तेथें युफ्रातिस नदी दक्षिणवाहिनी असून तिच्यावर लोखंडी पूल बांधला आहे. या गांवाच्या लगत इंग्रजांचें वैमानिक ठाणें आहे.

येथून पुढें युफ्रातीस नदीकांठचा रस्ता वायव्य दिशेनें वर उत्तरेकडे चढत जातो.

कुलपति अब्राहाम आपलें मूर्तिपूजक ऊर गांव सोडून, परिवारासह देवानें त्याला देऊं केलेल्या भूमीकडे याच रस्त्यानें गेला होता. तोच रस्ता आतां आम्ही आक्रमित होतों.

आदले दिवशीं पाऊस पडून युफ्रातिस नदीला पूर आला होता. तिचें पात्र समुद्रासारखें क्षितिजाला जाऊन भिडलें होतें.

१५० किलोमिटरवर रमादि नांवाचें गांव लागतें. मोटारींच्या वाहतुकी-मुळें या गांवाला स्टेशनचें स्वरूप प्राप्त झालें आहे. येथें बाबेलोन नांवाचें एक हॉटेल आहे.

या गावांत रस्त्याच्या दोन्ही बाजूला किरमिजी, गुलाबी आणि पांढऱ्या हॅलिफॅक्स फुलांचे ताटवे असून त्यांच्यामधून युकॅलिप्टिसची झाडें लाविलीं असल्यामुळें रुक्ष प्रदेशांत असूनहि हें गांव रमणीय दिसतें.

या ठिकाणीं आम्हीं दुपारचा फराळ आटोपून रिकाम्या टोपल्या फेंकून दिल्या. त्यांवर आम्हाला पहावयास आलेल्या पोरांनीं झडप घातली. जवळ बसलेल्या एका गरीब बाईला बिचारीला त्यांतलें कांहींच मिळालें नाहीं.

अधिकाऱ्यांनीं आमचे पासपोर्ट तपासल्यावर, अरबी वाळवंटातील आमच्या खडतर प्रवासाला सुरवात झाली.

देवदयेनें त्याहि दिवशीं, इकडे थोडा पाऊस पडून गेल्यामुळें अंगाला फोड आणणाऱ्या वाळवंटी उष्णतेचा आम्हाला प्रसाद मिळाला नाहीं, अगर बारीक रेतीचीं वादळें उठून त्यांच्या धुराळ्यानें आम्हीं गुदमरून गेलों नाहीं.

या वाळवंटांत कांहीं ठिकाणीं अस्फाल्ट म्हणजे नैसर्गिक डांबराच्या खाणीं आहेत. त्यांतून उन्हाच्या वेळेस निघणाऱ्या डांबराच्या धुराचे लोट एकाएकीं जमीनीवर पसरून सैरावैरा धावूं लागले म्हणजे ते अरेबियन नाइटस मध्यें वर्णन केलेल्या धूम्र राक्षसाप्रमाणें दिसतात.

कित्येक ठिकाणीं उन्हाच्या झळीमुळें उत्पन्न झालेल्या मृगजळाला पाणी असें समजून आम्ही फसलो.

या अथांग आणि रुक्ष वाळवंटांत चिटपांखरूं देखील दिसलें नाहीं. हो ! नाहीं म्हणावयास तीन कावळ्यांनीं मात्र आम्हास भेट दिली ! बिचारे काय खात असतील नी काय पीत असतील कोण जाणें !

कित्येक ठिकाणीं ४०-५० उंट घेऊन दोन दोन माणसें प्रवास करतांना दिसलीं. कांहीं उंटांच्या पाठीवर पाण्याच्या पखाली होत्या. या उंटांच्या तांड्यांत घोडीं, गाढवें, कुत्रीं, बकरीं वगैरेहि असायाचीं.

रात्रीं सुमारें ८ वाजतां बगदाद व दमास्कस यांच्या मध्यावर असलेलें रूतबा नांवाचें हिरवें गार शाद्वल स्थल – Oasis – लागलें. या ठिकाणीं गोड्या पाण्याच्या विहिरी असून थोडीशी लोकवस्तीहि आहे. या ठिकाणीं मोटारीच्या व विमानाच्या सोयीकरितां उंच खांबावर विजेचे दिवे लावलेले आहेत. तेथील एका हॉटेलमध्यें कॉफीच्या एका लहान कपाला आम्हांला २५ फिल्स म्हणजे सुमारें पांच आणे द्यावे लागले इतकी येथें स्वस्ताई आहे!

बायबलांत वर्णन केलेल्या अशूर, काले, आणि निनवे [१] या ऐतिहासिक स्थळांचे अवशेष रूतबाच्या उत्तरेस ३०० मैलांवर असलेल्या मोसूल नांवाच्या प्रांतात आहेत. या मोसूल प्रांतात हल्लीं पेट्रोल सांपडतें. तेथून पेट्रोलचा एक मोठा नळ रूतबाला येतो. तेथें त्याचे दोन फाटे फुटतात. एक फाटा सिरिया-कडे जातो व दुसरा फाटा ३०० मैलांवर असलेल्या पालेस्ताईन मधील हैफा बंदराकडे जातो. रात्रीं ९ वाजतां आम्ही हे वालुकामय प्रदेशांतलें रूतबा गांव सोडून पुढें निघालों.

हिंदुस्थानांत रात्रीं उत्तरेकडे तोंड करून, उभें राहिलें म्हणजे उत्तर ध्रुवाचा तारा सहज समोर दिसतो. पण इकडे तो किंचित मान वर करून पहावा लागतो. शिवाय त्या ताऱ्याभोंवतीं फिरणारें सप्तर्षि इकडे केव्हांहि मावळत नाहींत !

---

[१] उत्पत्ती १०:११.

६३० किलोमिटरवर इराक व सिरिया यांची सरहद्द दाखविणारे दोन पांढरे मनोरे लागतात. मोटारीच्या उजेडांत, दुरून पाहाणाऱ्याला ते मनोरे म्हणजे दोन माणसेंच उभीं आहेत असे वाटतात.

रात्रभर हा मोटारीचा वालुकामय प्रवास करून पहांटेस आम्ही सिरिया-दमास्कसचे हद्दींत प्रवेश केला, तेथून पुढें प्रत्येक किलोमिटरवर रस्ता दाखविणाऱ्या पाट्या लावल्या आहेत. दमास्कस पासून अलिकडे ६५ किलोमिटरवर सिरियाचें जकात-कस्टम् नाकें लागतें. तेथें आमचे पासपोर्ट आणि इतर सामान तपासलें. स्त्रियांच्या पेट्यां तपासतांना त्यांचीं रेशमी लुगडीं व पातळें हे विक्रीचें जिन्नस आहेत असें समजून त्यावर जकात बसविण्याकरितां अधिकारी लोक तीं घेऊन गेलें. परंतु हिंदी स्त्रियांचा हा नेहमींचा पोशाख आहे अशीं वरीष्ट अधिकाऱ्यांची खात्री करून देतांच त्यांनीं जकात न घेतां तीं परत केलीं !

या ठिकाणीं आम्ही पासपोर्ट अधिकाऱ्यांना आमचें सामान दाखविण्यांत गुंतलों असतां एका सिरियन मुलानें आमच्या टोपलींतील रोट्या आपल्या विजारींत भरल्या !

आमच्या पैकीं पोलीस प्रमाणें दिसणारे श्री. पतियाल यांनीं त्या मुलाला इमारतीच्या एका कोपऱ्यांत गांठून त्याच्या विजारीला हात घालतांच त्या सर्व रोट्या एका मागून एक बाहेर गडगडूं लागल्या !

हें पासपोर्ट नाकें सोडून आम्हीं पुढें गेल्यावर, तपकिरी रंगाच्या ढिगावर आडवे तिडवे सोनेरी पट्टे ओढावे त्याप्रमाणें दिसणारा बर्फाच्छादित हर्मोन पर्वत आम्हांला दिसूं लागला ! आणि त्यानंतर लहान सहान झुडप, एकादा, दुसरा उंट आणि इतर प्राणी दिसूं लागले ! थोडे पुढें गेल्यावर द्राक्षवेलांचे मळे, आक्रोडांचीं झाडें आणि जैतुनाच्या बागा लागल्या. शेवटीं नानातऱ्हेच्या पुष्प फलांच्या वृक्षांनीं आणि आबाना नदीच्या कालव्यानीं गजबजलेलें

निसर्ग सुंदर दमास्कस [१]शहर पाहून आमचा सर्व श्रमपरिहार झाला! फार दिवसांनीं वाळवंटांतून बाहेर पडलेल्या प्राण्याला दमास्कस हें सर्वांत मोठें शाद्वल स्थळ नंदनवनाप्रमाणें वाटावें, यांत नवल तें काय!

दमास्कस हें एक अत्यंत प्राचीनांतलें प्राचीन शहर आहे! महमद पयगंबरानें या शहराला पाचूच्या कोंदणांत बसविलेला हिरा असें नांव दिलें आहे.

जादूची कांडी फिरावी त्याप्रमाणें दमास्कसांत अबाना–बराज–नदीचे असंख्य कालवे वाटेल तेथें शिरकाव करून, शेतांत, बागांत, घरांत आणि कारखान्यांत मुबलक पाणी पुरवितात एवढेंच केवळ नव्हे तर या नदीचे लहान लहान पाण्याचे पाट लोक आपल्या घरीं नेऊन त्यांत आपलें कपडे, आपलीं जनावरें इतकेंच काय पण मेंढारीं देखील धुतात.

आपल्या इकडे, लोक ज्याप्रमाणें पावसाळ्यांमध्यें परड्यांत दोडके, घडवळ, बांभीं वगैरे लावतात. त्याप्रमाणेंच दमास्कसचे लोक आपल्या घरां-भोंवतीं द्राक्षें, नारिंगें, जरदाळू वगैरे झाडांची लागवड करतात.

दमास्कचे हॉटेलवाले, तर संत्रां, सफरचंद, तुती, जरदाळू मनुके वगैरे ताज्या फळांनीं भरलेल्या लहान लहान टोपल्या जेवणाच्या मेजावर आणून ठेवतात. जेवणारांनीं त्यांतील वाटेल तीं आणि वाटेल तितकीं फळें खावीं!

दमास्कसांत आम्हीं ग्रँड व्हिक्टोरिया नांवाच्या हॉटेल मध्यें राहिलों. हॉटेलचा रोजचा आकार पांच शिलिंग म्हणजे ३ रुपये १२ आणे होता.

आबाना नदीच्या कांठावर बांधलेल्या या हॉटेल मध्यें, पलंगावर गुडघे टेंकून, देवानें आम्हांला येथपर्यंत सुखरुप आणल्याबद्दल, हिमाच्छादित हरमोन पर्वताकडे पहात, आम्हीं त्याची उपकार स्तुती केली.

---

[१] उत्पत्ती १४:१५

दमास्कस शहराची वाढती प्रगती लक्षांत घेतां तेथील रस्ते अगदीं अरुंद वाटतात. तेथील एका अरुंद रस्त्याच्या उजव्या बाजूनें आम्ही अबाना नदीची नीलवर्ण शोभा पहात पायीं चाललों असतांना मागून एक ट्राम गाडी आम्हांला अगदीं अपरिचित अशी धोक्याची घटा वाजवीत येऊन तिनें श्री. संबायांना धडक दिली ! त्या सरशीं ते खालीं पडले. या वेळेस आम्हां हिंदी प्रवाशांची काय मनःस्थती झाली असावी याची वाचकांनींच कल्पना करावी. श्री. सबाया हे आपणाला कांहीं एक झालें नाहीं असें म्हणत, हंसतच उभे राहिले. या वेळा मला प्रेषित पौलानें आपल्या हाताला लट-कलेला साप, सहज लिलेनें शेकोटात झटकला होता त्याची आठवण झाली.[1]

श्री. संबायांच्या पिंढरीला जखम होऊन त्यांतून रक्त येत होतें. त्याचें त्यांना कांहींच भान नव्हतें ! माझ्या खिशांत असलेल्या बाटलींतलें आ-यडीन काढून मीं त्यांच्या पायाला लावलें.

दमास्कसच्या बाजारांत आम्ही फिरत असतांना, श्री. संबायांचा रुबाब व गांधी पोषाख पाहून तिकडचे लोक त्यांना मलेक मलेक म्हणत पहावयाला येत ! ' नीट ' नांवाच्या रस्त्यावर आम्हीं गेलों तेव्हां ' अहो आमच्या दुकानांत या, अहो आमचा गालिचा घ्या ' असें ओरडून तेथील व्यापाऱ्यांनीं आमचीं पाठ पुरविली. याच नीट नांवाच्या रस्त्यावर राहणाऱ्या हनन्या नांवाच्या खिस्तशिष्यानें प्रभूचा प्रकाश पाहून अंधळा झालेल्या शौलाचे डोळे नीट केले होते.[2]

शेवटीं बाजारचे बाहेर जाऊन, आम्हीं जुन्या दमास्कसच्या तटाची एक मोडकी भिंत पाहिली. ती भिंत कोसळून पडूं नये म्हणून तिला आतां लाकडी तरफा लावल्या आहेत. शौलाला यहुद्यांच्या मरणोन्मुख मारापासून

---

[1] प्रे कृ. २८:१-५ [2] प्रे कृ. ९-३-२५


बचावाकरतां त्याच्या शिष्यांनीं रात्रीचे वेळीं या तटाच्या खिडकीवाटें टोपलींतून बाहेर सोडलें होतें.



शौलाच्या सुटकेची खिडकी

दमास्कसांत ओमरची मशीद फार प्रसिद्ध आहे. ही मशीद म्हणजे महान थिओडोसिअस बादशहानें खिस्ताब्द ३७५ त बांधलेलें सेंट जॉन कॅथेड्रल होय. या मशीदीचें आवार प्रशस्त असून इमारतीमध्यें नमाजाला बसण्याच्या जागेवर भारी किंमतीचे नानातऱ्हेचें गालिचे पसरले आहेत. या मशीदीच्या एका कोपऱ्यांत ७० पुरुष व ३० स्त्रिया एकत्र बसून कुराणाचें श्रवण भक्तिभावानें करीत होते. आम्हीं त्यांना जवळ जाऊन पाहिलें.

ह्या मशिदीची अशीहि एक कथा सांगतात. चर्चसाठीं घातलेल्या पायावर चर्चच्या भिंतीसह डागडूगी करून ही मशीद उभी राहिली असली, तरी तिचा चर्चच्या आधींचा इतिहासहि मनोरंजक आहे. चर्चची मशीद झाली तसेंच मूर्तिपूजकांच्या मूळ देवळाचें हें आधीं चर्च झालें. पांचव्या शतकांत रोमी बादशहा आर्केडियस ह्यानें तें देऊळ बदलून त्याची मशीद केली. आणि नंतर ७१० त खलीपा वालीद यानें ह्या चर्चची मशीद बनविली. ही मशीद पुढें १०६९ त जळाली. पुन्हां १४०१ त व १८९३ त ह्या इमारतीवर हाच प्रसंग आला. पण तेव्हांपासून आतां ती पुन्हां आपल्या पूर्वीच्या वैभवाचें प्रदर्शन यशस्वी रीतीनें करीत आहे.



उमाइयाची मशीद
(श्री. संवाया फोटो घेत आहेत.)

या मशीदीजवळ १२व्या शतकाच्या शेवटीं होऊन गेलेल्या शौर्यशाली सलादीन बादशाहाची कबर आहे. या शौर्यशाली सलादिनाच्या औदार्याच्या व भूतदयेच्या गोष्टी त्याच्या शत्रुमित्रांना सारख्याच आदरणीय वाटतात.

बगदाद प्रमाणेंच दमास्कसचे लोकहि युरोपियन पोषाख वापरतात. स्त्रिया बरीच तोंडावर बारीक काळा बुरखा घेतात सर्व साधारण लोक काळा गोंडा लावलेल्या तरबुश नांवाच्या लाल फेझ टोप्या वापरतात. जुन्या पद्धतीचे लोक गॅलरुमाल डोक्यावर ठेवून तो वाऱ्यानें उडून जाऊं नये म्हणून त्यावर काळ्या लोकरीचा जाड दोराचीं दोन आणि कधीं कधीं चार वेटाळीं ठेवतात. आणि अंगांत भला मोठा अघळ पघळ गलाबिया झगा घालतात. या चित्र विचित्र अरबी पोषाखाला भुलून आमच्या कित्येक यात्रेकरूनीं ते पोषाख विकत घेतले आणि ते अंगांत घालून गांवांत रपेट केली.

दमास्कसचें आइस्क्रीम फार घट्ट असतें कमरेएवढ्या लांकडी पिपांत आइस्क्रीम घालून त्याभोंवतीं बर्फांचे बरंग-तुळया रचल्या होत्या. एका पिपांतील आइस्क्रीमचें मध्यें नाकर लोक मुसळानें बदाम कुटीत होते!

दमास्कसचे लोक उभे राहूनच आपापलीं सर्व कामें करतात. डोक्या-एवढ्या उंच काठ्यांना कुदळ व खोरें अडकवून शेतकरी शेतांत काम करतात. सडकेवरचा कुली उभा राहूनच खडी फोडतो. आणि भट्टीत रोट्या भाज-णारा व बुटाला पॉलिश लावणारा पोऱ्या देखील उभा राहूनच अगर आपल्या चिमुकल्या बाजेवर बसून काम करतो.

इराक बसऱ्या मधून हिंदुस्थानाकडे जाणाऱ्या पत्रावर आम्हाला १५ फिलचें तिकीट लावावें लागलें होतें. तर सिरीयादमास मधून जाणाऱ्या पत्रावर १५ मिलचे तिकिट लावावें लागलें.

जगांतील अत्यंत जुन्या अशा ह्या शहरांत आतां-म्हणजे १९०७ पासून विजेच्या दिव्यांनीं आपलें ठाणें दिलें आहे. येथें विजेच्या ट्रॅम गाड्याहि आहेत. आम्हाला नव्या जुन्याचा हा गोड संगम ह्या ठिकाणीं पहाण्यास मिळाला.



दमास्कस ते गालील सरोवर

बुधवार ता. १९ मे १९३७ रोजीं, सकाळीं आम्ही दमास्कस शहर सोडून गालील सरोवराकडे जावयास निघालों. दमास्कसापासून गालील सरोवर १३६॥ किलोमिटर म्हणजे ८५ मैल दूर दक्षिणेकडे आहे.



गिराजिम पर्वतावर शोमरोनी लोक व आम्ही

दमास्कसच्या बाहेर, आम्ही चाललेल्या रस्त्याच्या डावे बाजूला, सुंदर बागबगींचे आणि जैतूनाचीं झाडें आहेत. रस्त्याच्या उजव्या बाजूला, करड्या, भुरक्या, आणि तांबूस रंगाचा हर्मोन पर्वत सुरू होतो. या पर्वताच्या छायेंत सीरियन शिपायांच्या कृत्रीम लढाया चालल्या होत्या.

समुद्र सपाटीपासून हर्मोन पर्वताची उंची ९१६६ फूट असून त्याच्या माथ्यावरचें बर्फ बोडक्या डोंगरावर चुन्याचे आडवे तिडवे पट्टे ओढावेत त्या प्रमाणें दिसतें.

हर्मोन पर्वताच्या दाट धुक्यावर तरंगणाऱ्या ढगाची सावली पर्वतावर कोठें तरी भलत्याच ठिकाणीं पडली म्हणजे सडकेवरून पहाणाराला ती एखाद्या गहेप्रमाणें दिसते.

हर्मोन पर्वताच्या दक्षिण बाजूला चार सुंदर खेडीं आहेत. रूपांतरानंतर,

येशू ख्रिस्तानें असल्याच एखाद्या खेड्यांत बहिऱ्या मुक्या मुलाला, प्रार्थनेनें बरें केलें होतें ![1]

या हर्मोन पर्वताच्या शांत वातावरणांत दमास्कसामधील ख्रिस्तीलोकांचा छळ करावयास चाललेल्या शौलाचा पालट होऊन तो प्रेषित पौल बनला![2]

हर्मोन पर्वताच्या बारीनें पुढें गेल्यावर, २५ व्या किलोमिटरवर आम्हांला खनसासा नांवाचें एक जुनें गांव लागलें. त्याच्या चौफेर चिरेबंदी तट असून, जवळच परपर नदीचें पात्र आहे. यार्देन नदींत अंघोळ करून बरा हो म्हणून अलिशा संदेष्ट्यानें सांगितलें असतांना दमास्कसाच्या नामान नावांच्या कोड लागलेल्या सरदारानें आपल्या ह्या अबना व परपर नद्यांचा गर्वानें उल्लेख केला होता.[3]

१०१ किलोमिटर पासून २०-२५ मैल समोर दक्षिणेकडे असलेला, यार्देन नदीच्या खोऱ्यांतील गालील सरोवराचा दिव्य देखावा दिसूं लागतो!

यार्देन नदीच्या खोलगट खोऱ्यांतील भुरकट रंगाचा सर्व प्रदेश लहान मोठ्या टेंकड्यांनीं व दऱ्या खोऱ्यांनीं व्यापला असून, त्याच्या मध्यभागीं असलेलें गालील सरोवर, चांदीच्या तबकडी प्रमाणें, सर्वांग सुंदर दिसते! हर्मोन पर्वताच्या बाजूनें दिसणाऱ्या या गालील सरोवराच्या देखाव्याला जगांत कोठेंहि तोड नाहीं असें पृथ्वी प्रदक्षिणा करणारे म्हणतात!

आमचे बरोबर असलेले आंतरविश्वविद्यालयीन शुभवृत्त प्रसारक डॉ. एच. गिन्नेस हे हा देखावा पाहून, what a scene! what wscene! असें उद्गारत, गाळील सरोवराच्या दर्शनानें झालेल्या आनंदांत, मोटारींतून उतरून पायीं चालूं लागले!

या वेळेस सकाळचे सुमारे १०-१०॥ वाजले होते. यार्देन नदीच्या

---

[1] मार्क ९:२-२९ [2] प्रे. कृ. ९:१-६ [3] २ राजे ५:१०-१५

खोऱ्यांत आमचा रस्ता नागमोडी वळणें घेत खालीं घुसत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अॅनेमनी, रोजमेरी, डेझी वगैरे सारखीं प्रभूच्या पायांना स्पर्श करणारीं भूकमलें इतस्ततः उमललीं होतीं. जवळच गव्हाचीं शेतें कापणीला आलीं होतीं. अशा एका शेताभोंवतीं असलेल्या दगडाचा गराडा चढून मी आंत गेलों, व गव्हाच्या ओंब्या तोडून त्यांचे दाणे खात परतलों.

मोटारींत नगरच्या कुमारी रिबेका आईप यांनीं आपला घरगुती बिस्कीटांचा डबा उघडा ठेवला होता तो आम्हीं सर्वांनीं रिकामा केला!

या नंतर आमच्या मोटारी यार्देन नदीच्या पात्रांत उतरल्या. नदीच्या अलिकडे सीरियन सरकारचें पासपोर्ट नाकें आहे. या वेळेस आमच्याजवळ पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या नसल्या तर जवळच उत्तरेकडे चमकणाऱ्या मेरोम तळ्याचें पाणी आम्ही जाऊन यथेच्छ प्यालों असतो! या तळ्यापासून यार्देन नदीचा उगम अवघ्या ११ मैलांवर, उत्तरेकडे आहे. तेथें हर्मोन पर्वताच्या पोटांतून यार्देन नदीचा मुसंडा एकदम बाहेर पडतो! या उगमाजवळ ख्रिस्तकालीन कैसरिया फिलिपै हें गांव होतें.[१]

सीरियन पास पोर्ट जवळचे यार्देन नदीचें पात्र २७ यार्ड रुंद असून तें भूमध्य समुद्राच्या सपाटीला जाऊन मिळतें. याचा अर्थ असा कीं, यार्देन नदीच्या या पात्रापासून पश्चिमेकडे २० मैलांवर असलेल्या भूमध्य समुद्रापर्यंत जर कोणी कालवा काढला तर त्या समुद्राचें पाणी या नदींत वहात येईल!

या ठिकाणीं, नदीवर एक पूल आहे. त्याचें नांव 'मिश्र बनात याकूब.' पूर्वी यार्देन नदीच्या या ठिकाणच्या उताराजवळ संत याकोब या नांवाचा एक मठ होता. त्या मठांत रहाणाऱ्या साध्वी कन्यांच्या नांवावरुन या पुलाला याकोब कन्यांचा पूल हें नांव पडलें!

हा पूल ओलांडून आम्ही पवित्र भूमींत पाय ठेवले तों इंग्रजांचें पास पोर्ट नाकें लागलें!

---

[१] मार्क ८:२७

पालेस्ताइन हा देश चुनखडी, आणि भुरकट रंगाच्या लहान लहान, दाट वाटोळ्या डोंगरी टेंकड्यांचा बनलेला आहे. किल्येक टेंकड्यांच्या पायथ्यापासून तों थेट त्यांच्या माथ्यापर्यंत लहान लहान खेडीं विखुरलीं असून, बहुतेक या सर्व उंच सखल प्रदेशांत, खालीवर कोठेंहि, गहूं, हरबरा, बारली, मका इत्यादि धान्य, व द्राक्षें नारिंगें, खजूर, अंजीर, जैतून, जरदाळू, पपई वगैरे फळें यांचें विपूल पीक दिसतें.

विमानांतून, विहंगम दृष्टीनें पहाणाऱ्याला पालेस्ताइन हा देश उंच सखल प्रदेशांत लहान मोठे दगड पसरावेत त्याप्रमाणें दिसतो, यहुदी लोक पालेस्ताइनला हरणाच्या शरीराची उपमा देतात.


आम्हांला पालेस्ताइनमध्यें पहिलेंच यहुदी गांव लागलें त्याचें नांव रास-पिना. लहान लहान लाल कौली बंगल्याचें गोलाकार पद्धतीनें वसविलेले रास-पिना गांव म्हणजे अधुनिक ग्रामजीवनाचा एक आदर्श नमुनाच म्हणावयाचा!

पालेस्ताइन मधील सर्व रस्ते ॲस्फाल्टचे–नैसर्गिक सिमेंटचे–बनविले असून ते अतिशय छान, स्वच्छ, आणि गुळगुळीत आहेत. रस्ता दाखविणाऱ्या पाट्यांवर, सरकारी आणि सार्वजनिक इमारतींवर, हिब्रू, अरबी, आणि इंग्रजी अक्षरें लिहिलेलीं आहेत!

महायुद्धानंतर, मित्र राष्ट्रांनीं सीरिया हा देश फ्रेंचांच्या ताब्यांत दिला व इराक व पालेस्ताइन हे देश इंग्रजांच्या ताब्यांत दिले. तेव्हांपासून या देशांची सुधारणा होत आहे.

रास पिना हें गांव मागें टाकून आम्ही गालील सरोवराकडे गेलों. वाटेंत आम्हांला बिदुइन लोकांचीं पालें लागलीं. रस्त्याच्या डावे बाजूनें यार्देन नदी ही आमच्या बरोबर आपल्या ओबडधोबड दगड खोऱ्यांतून वहात दक्षिणेकडे चालली होती.

ज्या ठिकाणी यार्देन नदी गालील सरोवराच्या रचनेला सुरुवात करते त्या ठिकाणीं तिचें पात्र अरुंद आणि खोल असून तें झाडाझुडपांनीं मच्च झांकून गेलेलें आहे. परक्या मनुष्याला तेथें नदी वहात असेल अशी कल्पना सुद्धां होत नाहीं!



कपर्णहूम येथील सभास्थानाचे अवशेष

या ठिकाणापासून ३-४ मैल पश्चिमेकडे, गालील सरोवराचे कांठीं, कपर्णहूम नांवाची पडकी जागा आहे.

तेथें येशूच्या शब्दावर विश्वास ठेवणाऱ्या, शंभर शिपायांवरच्या एका रोमन सेनापतीनें यहुद्यांना बांधून दिलेल्या प्रार्थना मंदिराचा पाया, भींतीं, कमानीं वगैरे अवशेषांचा आतांच्या रोमन मठाधिकाऱ्यांनीं जपून संग्रह करून ठेवला आहे.

आम्ही गेलों त्या वेळीं तेथें गौरकाय यहुदी मुलामुलींच्या दोन टोळ्या उभ्या होत्या. या देवळाच्या रचनेवरून आणि त्यांच्या दगडावर कोरलेल्या आकृतींवरून या मुलामुलींचे शिक्षक त्यांना आपल्या पूर्वकालीन यहुदी संस्कृतीबद्दल हिब्रू भाषेंतून शिक्षण देत होते.

या प्रार्थना मंदिराला येशूचें पाय लागले होते.[१]

तेव्हां त्या पवित्र पावलांची आठवण रहावी म्हणून आमच्यापैकीं कांहींनीं त्या इमारतीचे दगड फोडून त्यांचे तुकडे आपल्या खिशांत भरले!

या कपर्णहूम अवशेषांच्या पूर्वेस, नावेंत बसून, येशूनें किनाऱ्यावरील समुदायाला पेरणीच्या कल्पनेवरून मनुष्यांच्या अंतःकरणांत रुजणाऱ्या देवराज्याचें रहस्य विशद करून दाखविलें होतें.[२]

---

[१] मत्तय ४:१३ [२] मार्क ४:१-२०

कपर्णहूम अवशेषाच्या एक दोन मैल पश्चिमेस फिलीप, अंद्रिय, व पेत्र या प्रथम खिस्त शिष्यांचें बेथसैदा नांवचें गांव होते![1] या गांवाचे आसपास प्रभुनें ५ भाकरी व दोन मासे एवढ्या शिदोरीवर देवाच्या आशिर्वादानें, हजार लोकांना भोजन घातलें होतें;[2]

या चमत्काराच्या स्मरणार्थ प्राचीन ख्रिस्ती मंडळीनें तेथें बांधलेल्या मंदिराचा पाया आतां सांपडला असून पायाच्या एका दगडावर क्रुसाची खुण कोरलेली आहे. या मंदिराच्या इमारतीची जमिन रंगीबेरंगी दगडांचे लहान लहान चौकोनी तुकडें सिमेंटांत बसवून केलेली आहे. अशा तऱ्हेच्या तक्त-पोशीला मोझाइक पद्धति म्हणतात.

या जमिनीच्या मध्यभागीं मोझाइक पद्धतीनें भाकरीची टोपली व दोन मासे याचें चित्र काढलें आहे.

या मंदिराच्या जवळ समुद्र काठांवर जर्मन ख्रिस्ती लोकांनीं चालविलेला तबघा हॉस्पिस् नांवाचा पथिकाश्रम आहे. तिकडे आम्ही विश्रांती करितां गेलों. मठपति फादर तापर यांनीं आमचें प्रेमानें स्वागत करून दोघां मध्यें आम्हांला एकेक खोली वांटून दिली. प्रत्येक खोलीमध्यें मच्छरदाणीचे पलंग, विजेचे दिवे, टेबल खुर्च्या, साबण, टांवेल, वगैरे नित्योपयोगी सामान व्यवस्थित ठेविलें होतें. एक दोन जर्मन भगिनी आम्हां पाहुण्यांची सोय पहात होत्या.

या ठिकाणीं गालील सरोवराच्या प्रशांत वातावरणांत आपल्या आयुष्याचे एक दोन दिवस घालविण्याकरितां जगाच्या पाठीवरचे ख्रिस्तभक्त रोज धांव घेत असतात.

आम्ही गेलों त्यावेळीं तेथें अमेरिकेच्या पेन्सिलव्हेनिया संस्थानांमधील, पिटस्बर्ग गांवचे पाळक, रे० इ० ऑर हे आपल्या पत्नी समवेत आले होते.

---

[1] योहान्न १:४३, ४४. [2] लूक ९:१०-१७

दुपारी आमच्यापैकीं कांहीं जणांनीं गालील सरोवराच्या कांठावर अंघोळ केली, व कांहीं जण आंत जाऊन पोहले. नंतर आम्ही जेवलों. जेवणाच्या यादींत भाजी, बटाटे, आमलेट, जर्मन पॅन केक, सूप व मासे वगैरेंचा समावेश होता. आमच्या पैकीं जे शाकहारी होते त्यांना कधीं कधीं सूप, अंड्याचें आमलेट व मासेहि चालत !

तबघा आश्रमच्या सभोंवार सुंदर बाग आहे. त्यांत अंजीर, बोरु, लव्हाळा, जैतून वगैरे लहान मोठ्या पुष्प फलांचीं झाडें आहेत. फादर तापर बरोबर आम्ही या बागेंत फिरलों !

तबघाच्या पश्चिमेस अर्ध्या मैलावर सरोवर तटाकीं, 'खिब्बेत मिन्निया' नांवाचें ख्रिस्ताब्द ७ व्या शतकांतील एक अवशेष गांव सांपडलें आहे. त्या गांवाची संस्कृती पूर्व इस्लामी धर्माचीं असून त्याचें आतां पुराण वस्तुसंशोधन चाललें आहे.

आतांपर्यंत आम्ही ऊर व बाबेलोन हीं दोन उत्खनन केलेलीं गांवें पाहिलीं होतीं परंतु या ठिकाणी बर्लिनचे एक पदविधर डॉ. पत्रिक रिगनार्ड हे अरब मजुरांबरोबर उत्खननाचें काम करीत असतांना आम्हांला प्रत्यक्ष पहावयास मिळाले. त्यांना आम्हीं आपण इकडे कां आला हे काम करण्यांत आपले ध्येय काय वगैरे प्रश्न विचारले.

'जुन्या अवशेष गांवांचें उत्खनन करुन त्यांत सांपडणाऱ्या वस्तु वरुन मला प्राचीन संस्कृतीचें संशोधन करायाचें आहे तेव्हां गालील सरोवराच्या कांठावर पडक्या गांवाचा एक ढीग आहे असें कोणी सांगितल्यावरुन मी इकडे आलों' असें तें म्हणाले.

उत्खनन करुन काढलेल्या गांवाचा चौफेर पाया, मशिदींत दक्षिणेकडे तोंड करुन असलेली नमाजाची जागा, राजवाड्याच्या जमिनीवर केलेलें मोझाइकचें काम आणि तेथें सांपडलेल्या वस्तु व सोन्याचीं नाणीं वगैरे दाखवून

पुरातन वस्तु संशोधनाचें महत्व त्यांनीं आम्हांला पटवून दिलें.

या ठिकाणीं सांपडणाऱ्या वस्तुपैकीं निम्या ते बर्लिन विश्व विद्यालयाच्या मुस्लीम विभागांना व निम्या पालेस्ताइनच्या नव्या पदार्थ संग्रहलयाला पाठवून देतात.

शेवटीं स्वाक्षरांची देवघेव करून आम्ही या प्रेमळ संशोधकाचा निरोप घेतला.

तेथून तवघा आश्रमाकडे परत येत असतांना सूर्यास्ताच्या सुमारास आम्ही गालील सरोवराच्या कांठावर बसून इशस्तवन केलें, गाणीं म्हटलीं आणि धन्योद्गार गिरिवरून श्री ख्रिस्तानें उच्चारलेलीं दिव्य वाक्यें बोललों.[१]

रात्रीं भोजन झाल्यावर नावेंत बसून सरोवराच्या पश्चिमेस, विजेच्या दिव्यांनीं चकाकणाऱ्या तैबिरिअस गांवाकडे आम्ही गेलों.

पूर्व किनाऱ्यावर गरसेकरांचा खडकाळ प्रदेश चांदण्यांत चांगला उठून दिसत होता. गरसेकरच्या अंगांतून येशूनें काढलेले दुष्ट आत्मे डुकराच्या रूपानें गालील सरोवरांत नाश पावले होते.[२] या सरोवराच्या कांठीं ख्रिस्तानें केलेलीं सर्व कार्यें आम्ही एकमेकांना सांगत नावेंत बसून परत येत असतांना प्रभूचें वास्तव्य आम्हांला पदोंपदीं भासत होतें.

आमच्यापैकीं एकजण नांवेच्या वरामावर म्हणजे मागच्या टोंकावर निजला होता. आपला प्रभु असाच निजला होता.[३]

---

[१] मत्तय ५. [२] मतय ८:२८-३४. [३] मार्क ४:३८.

गालील सरोवर ते यरूशलेम

गुरूवार ता. २० माहे मे १९३७ रोजीं निजून उठल्यावर, आम्हांपैकीं कित्येकांना गालील सरोवराचें पवित्र वातावरण सोडवेना त्या ठिकाणीं आणखी कांहीं दिवस घालवावे अशी त्यांची इच्छा होती. परंतु यरुशलेम व त्याच्या आसपासचीं गांवें, इजिप्त देश, सोर व सिदोन यांचा प्रांत, आणि लेबानन पर्वत हीं नेमलेल्या वेळांत पाहून परत आपल्या कामावर रूजूं होण्याची दुसऱ्या शित्येकांना निकड असल्यामुळें आणखी येथें जास्त वेळ राहातां आलें नाहीं. शेवटीं, येशूला यरुशलेमकडे जावें लागलें,[१] या विचारावर ध्यान मनन आणि प्रार्थना झाल्यावर, आम्ही तबघा पथिकाश्रम सोडलें ! तेथून १८६ किलोमिटर म्हणजे ११६ मैलांवर दक्षिणेकडे यरुशलेम आहे.

वाटेंत आम्हांला मेरी मगदालियाचें गांव लागलें. तेथें आतां गरीब यहुद्यांची एक वसाहत होत आहे. या गांवाचे वायव्येस विस्तीर्ण गुहा असून, त्यांत इतिहासपूर्व पाषाणकालीं – अश्म युगांत – महाकाय धिप्पाड लोकांची वस्ती होती. अगदीं अलिकडे, म्हणजे १९२६ सालांत, त्या ठिकाणीं एक भली मोठी गालीली मनुष्याच्या डोक्याची कवटी सांपडली असून ती आतां यरुशलेमच्या पदार्थ संग्रहालयांत ठेवली आहे. 'नेयांडर थाळ' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या मानव जातीच्या सांगाड्याशीं या कवटीचें साम्य जुळतें.

तेथून पुढें सरोवराच्या कांठानें ७।८ मैल चक्कर घेत आम्ही तिबेरियस या गांवाला पोहोंचलों. सरोवराच्या कांठच्या ख्रिस्तकालीन गांवापैकीं हेंच काय तें एक गांव आतां शिल्लक राहिलें असून त्यांत यहुदी, अरब, व ख्रिस्ती मिळून १०००० लोक आहेत. येशूचे पाय या गांवाला लागल्याचें दिसत नाहीं.[२] आपल्याकडे ज्या प्रमाणें हिंदु मुसलमानांत दंगे होतात त्याच

---

[१] मत्तय १६:२१ [२] योहान ६:२३

प्रमाणें तिबेरियसांतहि अरब व यहुदी यांच्यांत, खून, मारामाऱ्या, दंगे, व गोळीबारहि होतात.

गांवात बंदोबस्ताकरितां ठेवलेल्या इंग्रज पलटणींची चाललेली कवाईत आम्हांला पाहण्यास मिळाली. समुद्रसपाटी खालीं ६८२ फूटावर हें गांव वसलें आहे. गालील सरोवराची समुद्रसपाटी ७०० फूट आहे.

तैबेरियाच्या दक्षिणेस १॥ मैलावर यार्देन नदी गालील सरोवरांतून बाहेर पडते. त्याचे थोडे खालीं ज्या ठिकाणीं यार्मक नदी यार्देन नदीला मिळते त्या ठिकाणीं नदीवर धरण बांधून सबंध पालेस्ताईन देशाच्या रोषनाईला, उद्योग धंद्याला. व पंपानें पाणी काढून शेताची लागवड करण्याला, पुरेल इतकी ४०,००० अश्वशक्तिची वीज तयार होत असते.

तिबेरियसाजवळ आम्ही ख्रिस्तकालीन मासे धरण्याचा प्रकार पाहिला. तेथील भोई लोकांचें जाळें दोन हात रुंद व शें दोनशें हात लांब असतें. जाळ्याच्या एका टोंकाला तरंगत डबा बांधून तें टोंक पाण्यांत सोडतात. व नांव वल्हवीत वल्हवीत पाण्यामध्यें भलामोठा चक्कर घेऊन मूळ डबा सोडलेल्या जागेकडे येतात. नंतर पाण्यांत सोडलेलें जाळें हातानें चाळून त्यांत सांपडलेले मासे नांवेंत टाकतात.[१]

हा मासे धरण्याचा पुरातन प्रकार पहात, आम्हीं कांठावर, उभें असतांना ८–१० वर्षें वयाचीं ५-६ मुलें सरोवरांत सुरकुंडी मारून खेळत होती ! हीं मुलें आम्हाला माशाप्रमाणेंच वाटली ?[२]

तर दुसरीकडे कांठावर, चारपांच मुलीं आमचेपुढें हात परून बकशीस बकशीस, हा मंत्र म्हणत होत्या. आणि त्यांची अरबी भाषा आम्हाला न समजल्यानें आम्हीहि त्यांच्यापुढें आपले हात पसरून तेच शब्द म्हणत त्यांना वेडावित होतों.

---

[१] मार्क १: १७ [२] मार्क १०: १४

तिबेरियस गांवाजवळ ऊन पाण्याचें झरे असून त्यांच्यावर स्नान गृहें बांधलीं आहेत. या पाण्यांत स्नान केल्यानें संधिवातासारखे रोग बरे होतात असें म्हणतात. डोंगरांतून ज्या ठिकाणीं हें पाणी बाहेर पडतें त्या ठिकाणीं पाण्याची ऊष्णता ६२° सेंटिग्रेड अथवा १४३ फॅरेन हैट असते. या पाण्यांत आम्हीं बोट घातलें तों चांगलाच चटका बसला !

गालील सरोवराची खोलगट सपाटी चढून वर गेल्यावर १७३॥ व्या किलोमिटरवर समुद्रसपाटी –Sea level–अशी पाटी लावली आहे. या पाटीपासून २० मैल पश्चिमेकडें असलेल्या कार्मेल पर्वताजवळील भूमध्य समुद्रापर्यंत कोणी कालवा काढल्यास समुद्राचें पाणी गालील सरोवरांत वहात येऊन तिबेरियस हा गांव पाण्यांत बुडून जाईल.

१५० कोलोमिटरवर फड्यांत वसलेलें गालीलांतील काना गांव लागलें. फडे खाण्याऱ्या कोचनिल किड्यांचें काम आतां जोरांत सुरूं असल्यानें तें फडे (पाण साबर) लवकरच नाहांसें होइल.

येशूनें पाण्याचा द्राक्षरस केलेल्या जागेवर किंवा मिल्टन कवीच्या शब्दांत सांगावयाचें झालें तर, ज्या जागेवर 'संज्ञावान् पाणी आपल्या प्रभूला पाहून सलज्ज झालें[१]' त्या जागेवर रोमन कॅथोलिक लोकांनीं एक मंदीर बांधलें असून त्यांत एक भला मोठा खुजाच्या आकाराचा घडा ठेविला आहे तो घडा येशूच्या वेळचा आहे असें म्हणतात.[२]

लग्न समारंभाचें जागेवर ग्रीक लोकांनीं दुसरें एक मंदिर उभारलें आहे. नथानेल हा प्रेषित काना गांवचा होता, अशी आख्यायिका आहे.[३] त्याचे घरावर आणि त्यानें खिस्त स्वीकार केल्याचें दिवस येशूनें त्याला अंतःचक्षूनें पाहिलेल्या अंजिर वृक्षाच्या जागेवर स्मारक मंदिरें उभारलीं आहेत.

---

[१] The conscious water saw its God and blushed.

[२] योहान २:१–११; [३] योहान १:४५–४८

या काना, किंवा कफेर केना गांवांतील ख्रिस्ती बाया आपल्या इकडच्या



गालीलांतील काना गांव

गांवानी बायांप्रमाणें दिसतात, आणि त्यांना इंग्रजी बोलतां येतें. काना गांवची आठवण म्हणून, या बायांनीं बनविलेले मातीचे लहान लहान घडे आम्हीं विकत घेतलें.

काना गांवांत पिठाच्या गिरणीची घरघर चालली होती, तर गांवावरून एक विमानहि घरघर आवाज करीत पश्चिमेला कार्मेल पर्वताकडे जात होतें. काना गांवची लोक संख्या १२०० असून त्यापैकीं निम्मे ख्रिस्ती व निम्मे मुसलमान आहे. या गांवांचे जरा पुढें नबी युनीस ही योना संदेष्ट्याची जन्मभूमि लागते[१]

१४३ व्या किलोमिटरवर नाजरेथ गांव लागतें, या गांवाची रचना पायऱ्या पायऱ्यांनीं डोंगरांत खालीवर बसलेल्या एखाद्या अर्वाचीन धर्तीच्या निसर्ग सुंदर शहराप्रमाणें आहे. त्यांत ४८८५ ख्रिस्ती २४८६ मुसलमान व ५३ यहुदी अशी एकूण ७४२४ लोकवस्ती आहे.


येशू ख्रिस्ताचे अर्ईबाप याच गांवचे होते. व एथेंच येशू ख्रिस्त हा जगाचा तारणारा लहानाचा मोठा झाला. नाजरेथ नगर पालिकेनें येशूची आई मरीया ही ज्या घरांत राहात होती त्या घरांतील झऱ्यापासून एक नळ काढून तो हमरस्त्यावर आणून सोडला आहे. त्याला 'मेरीचा नळ' असं म्हणतात. या नळाचा उगम धौम महाबळेश्वरांतील कृष्णा नदीच्या उगमा प्रमाणें आहे.

---

[१] २ राजे १४:१५

पालेस्ताइन मध्यें पहाडांत वसलेल्या घराची रचना कांहीं विलक्षण आहे. हिमालयांत गंगोत्रीच्या वाटेवर, ज्याप्रमाणें ऋषिजनांच्या नैसर्गिक किंवा कृत्रिम गुहा आहेत त्याचप्रमाणें पवित्र भूमींतहि घराखालील दुधी रंगाचे मऊ दगड पोखरुन, त्यांत निरनिराळ्या खोल्या करण्याची वहिवाट आहे. या गुहावजा खोल्यांत धन धान्य आणि इतर सामान ठेवतां येतें. कित्येक प्रसंगीं असल्या भुयाराप्रमाणें लांबवर पोखरुन केलेल्या तळघरांत प्रेतेहि ठेवतां येतात.

नाजरेथ मध्यें, मरीयेला गाब्रियल दूतानें भेट दिलेली " दर्शन गुहा " व जेथें येशू योसेफाबरोबर सुतार काम करीत असें, ती " कामगार गुहा "यावर राजवाड्यासारखीं भव्य मंदिरें व रमणीय बागबगीचे उठविलेले आहेत. या सर्व गुहांमधून विजेच्या दिव्याचा लखलखाट केलेला आहे. गांवात जुन्या यहुदी पद्धतीचें सिनॅगॉग–प्राथना मंदीर आहे. त्यांत येशूनें यहूदी धर्मगुरूंबरोबर अनेकदा वादविवाद केला होता. " दीनांस सुवार्ता सांगण्यास व ठेंचलेल्यांस मोकळे करण्यास देवानें मला पाठविलें आहे" असें येशूनें एकदां या प्रार्थना मंदिरांत प्रतिपादिलें त्यामुळें तेथें जमलेल्या लोकांस त्याचा मोठा अभिमान वाटला.



दर्शन गुहेवरील मंदिर नाझरेथ

परंतु. " देव आमचा व आम्हीच काय ते देवाचे " असें मानणारे ते नाजरेथकर व सर्व साधारण यहूदी राष्ट्र हें देवाच्या सांगिप्रमाणें वागत नाहीं व संदेष्ट्यांचें ऐकत नाहीं म्हणून देवाच्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्य यहूदेतर राष्टांनाच देव प्रसन्न होत आला आहे. येशूनें हें सोदाहरण, सिद्ध करून दाखवितांच, ते कडवे नाजरेथकर यहूदी संतापून उठले, व जवळच्या कड्यावरून येशूचा कडेलोट करण्याकरितां त्याला जोरानें फरफटत ओढींत घेऊन गेले. या सभास्थानांत बसून आम्हीं हिंदी यात्रेकरूनीं येशूनें या देवळांत उपदेशिलेला शास्त्र भाग वाचला.[१] व नाजरेथ गांवांतून येशू ख्रिस्ताकरवीं देवानें जगाच्या कल्याणाची गोष्ट निर्माण केली याबद्दल उपकार स्मरण केलें.

नाथेरेज गांवीं आमच्या भोंवतीं जमलेल्या बालगोपालांना आम्ही कुलपी मलाई चारली ! नंतर नाजरेथ सोडलें.

दक्षिणेकडच्या रस्त्यानें आम्हीं इज्रलच्या खोऱ्यांत उतरलों. या खोऱ्याला एसद्रायलोनचें खोरें आणि मगिदोचें मैदान अशींहि नांवें आहेत.

या मैदानाचें पूर्वेस यार्देन नदी व गिलादचे पर्वत, दक्षिणेस शमरोनाचे डोंगर, पश्चिमेस कार्मेल पर्वत व भूमध्य समुद्र आणि उत्तरेस सोर, सिदोन आणि गालील प्रांताचे उंच डोंगर हे प्रदेश आहेत.

येशूच्या वेळेस, रोमन साम्राज्यामध्यें या मैदानाला विश्व व्यापार पेठेचें स्वरूप प्राप्त झालें होतें.

आतां पर्यंत या मैदानावर युध्यमान राष्ट्रांनीं व योध्यांनीं ३६ लढाया केल्या असून १९१८ सालीं जनरल अलेन्बीच्या स्वारींत १०५ व ११० मराठा लाईट इन्फंट्रांचे शूर हिंदी वीरहि या मैदानावर लढले आहेत. जगाचा अंत करणारी हर्म-गिदोनची लढाई देखील याच मैदानावर होणार

---

[१] यशया ६१: १-३; लूक ४: १६-३०

असें दिसतें.[1] हें मैदान औरस चौरस सुमारें २० मैल पसरलें असून, त्याच्या सभोंवार असलेल्या डोंगर टेंकड्यावर बसून प्रेक्षकांना या मैदानावर चाललेल्या सामन्यांचें सहज अवलोकन करतां येईल. या मैदानाला, यहुदी लोक ' एमेक ' म्हणतात. त्याच्या मध्यभागीं बालफोरीया नांवाची लाल कौली लहान बंगल्यांची वसाहत वसवून यहुद्यांनीं येथील नापीक जमीन सुपीक केली आहे.

इराकहून हैफा बंदराकडे जाणारी रेल्वे याच मैदानांतून येणार असें म्हणतात. तसें झाल्यास हिंदी यात्रेकरूंचें येरूशलेमला जाणें येणें सोपें होईल. या मैदानांतून इस्रेल नदी पूर्वेकडे वहात जाऊन यार्देन नदीला मिळते. व किशोन नदी कार्मेल पर्वताचे बाजूनें भूमध्य समुद्राला जाऊन मिळते इस्रेलचें खोरें हें साधारणतः खंडाळें घाटांतून मुंबईला जातांना आठव्या बोगद्यांतून बाहेर पडल्यावर डावे बाजूस लागणाऱ्या डोंगर तळवटी प्रमाणें दिसतें.

या अखिल दुनियेच्या कुरुक्षेत्रांत अनेक गांवें वसलीं असून त्यांत नाना तऱ्हेच्या आश्चर्य कारक गोष्टीं घडल्या आहेत, त्यांच्यापैकीं कांहींचा नुसता नामनिर्देश करीत आम्ही पुढें जातों.

डावे बाजूला ताबोर आणि छोटा हर्मोन या दोन डोंगराच्या गोल टेंकड्या आहेत. ताबोर डोंगरावर बांधलेलें ' रूपांतर मंदिर ' आभाळाला टेंकल्या प्रमाणें दिसतें.

या टेंकड्यांच्या दरम्यान असलेल्या नाईन गांवांत येशूनें विधवेच्या मृत मुलास शब्दमात्रें करून जिवंत केलें होतें [2]

शूनेम नांवाच्या गांवांत अलीशानें दुसऱ्या एका मयत मुलास बरें केलें होतें.[3]

---

[1]प्रगटीकरण १६:१६; [2]लूक ७:११-१८; [3]राजे ४:३२-३५

एंदोर नांवाच्या गांवांत शौल राजानें देवाला सोडून चेटकीचा सल्ला विचारला होता.[१]

छोटा हरमोन व गिलबोआ या दोन टेंकड्यांमधील इज्रेल नदीच्या खोऱ्यांत गिदोनाच्या ३०० निवडक वीरांनीं देवाच्या सहायानें असंख्य मिद्यानी लोकांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडलें होतें.[२] पलिष्टी लोकांनीं गिलबोआ टेंकडीच्या पसरट पायथ्याला शौलाचा शिरच्छेद करून त्याचें शीर बेथशान गांवाच्या वेशीवर टांगलें होतें.[३]

पुढें १०० किलोमिटरवर, रस्त्याचे डावे बाजूला, दोथान जवळ, पूर्वापार पद्धतीनें प्रवास करीत असलेले, व योसेफाच्या हार्दिक चरित्राची आठवण करून देणारे उंटांचे एक दोन काफिले दिसले.[४] दोथानच्या पुढें उंच टेंकडीवर शोमरोन शहर होतें. या शहराच्या अवशेषावर रोमन राजवटींत बांधलेलें सेबास्तें हृ गांव आतां शिल्लक राहिलें आहे.[५] रस्त्याच्या उजव्या बाजूला मगिदो व तानख हीं पुरातन ऐतिहासिक स्थळें असून त्यांच्या आसपास दबोरा या स्त्री–सेनापतीनें व येहू या महारथी धनुर्धारीनें पुष्कळ पराक्रम गाजविले होते.[६]

पश्चिमेकडे, कार्मेल पर्वतावर, एक चिमुकलें मंदिर दिसतें. त्या मंदिराच्या पायथ्याला 'देव खरा कीं मूर्ती खऱ्या,' या वादाचा निर्णय लावण्याकरतां थरारून सोडणारे अग्नि–यज्ञ–कुंड मांडलें होतें.[७] या देखाव्याच्या जवळच शोमरोनाच्या सीमेवर, येशूनें १० महारोग्यांना बरें केल होतें.[८]

अशा प्रकारें विश्वाच्या मध्यभागीं मांडलेल्या या नैसर्गिक आखाड्यांतून मोटारीचा जलद प्रवास करीत आम्ही ८४ व ८३ किलोमिटर मधील उंचीवर पोहंचलों असतांना, शारोनच्या खोऱ्या पलीकडे असलेल्या प्राचीन कैसरिया बंदराजवळच्या निळसर भूमध्य समुद्रानें आम्हांला ओझरतें दर्शन दिलें.

---

[१] १ शमुवेल २८; [२] शास्ते ७;१ [३] १ शमुवेल ३१ [४] उत्पत्ति ३७:१५ ३६ [५] १ राजे ६:२४ २ [६] शास्ते ३ व ४; २ राजे ९:११-२ [७] १ राजे १८:२१-४०. [८] लूक १७:११-१९

या नंतर डावीकडे, एबाल व उजवीकडे गिरिजमि हे उंच डोंगर लाग-तात. याच दोन डोंगरावर उभे राहून इस्त्राएल लोकांनीं यहोशवानें वाचलेले शाप व आशिर्वाद श्रवण केले होते.[१] याच दोन डोंगराच्या खिंडींत शखेम हें गांव होतें.[२] या गांवाला आतां नाबलूस म्हणतात. या नाबलूस-शखेमाची लोकसंख्या सुमारें १६००० असून त्यांत अरब मुसलमानांची संख्या अधिक आहे. साबण बनाविणें हा ह्या गांवचा मुख्य धंदा आहे.



गिरिजीम पर्वतावर आम्ही व शोमरोनी लोक


या गांवाच्या एका कोंपऱ्यांत, गिरिजीम पर्वताच्या पायथ्याला १५० शमरोनी लोक मोठ्या हलाखीचे दिवस कंठित आहेत.

अरब लोकांच्या 'होटेल पालेस्टीन' मध्यें, माणशीं तीन शिलींग देऊन तेथें आम्हीं दुपारचे जेवण आटोपल्यावर शोमरोनी लोक आम्हाला आपल्या मंदिराकडे घेऊन गेले. शोमरोनी लोक उंच, सडपातळ, आणि सुस्वरूप असून मोशाचे नियम ते अगदीं कडकडीत रितिनें पाळतात. अहरोनाच्या नातवांनीं कीं पणतवांनीं लिहिलेल्या नियमशास्त्राच्या त्यांच्या हिब्रू गुंडाळ्या आम्हीं हातांत घेऊन पाहिल्या. आपला येशू अजून येणार आहे असें या मूठभर शोमरोन्यांचें म्हणणें आहे. हल्लीं त्यांना यहुद्यांचा देखील बेटी व्यवहार खपत नाहीं. त्यामुळें फार जवळच्या रक्ताशीं त्यांचा संबंध जडत गेल्यानें त्यांचीं प्रजोत्पत्ति घटली आहे. हीच स्थिति कायम राहिल्यास कांहीं दिवसांनीं शोमरोनीं लोक पहावयालासुद्धां मिळणार नाहीं.

---

[१] यहोशवा ८: ३३-३४ [२] उत्पत्ति १२:६

शखेमच्या दक्षिणेस रस्त्याच्या डावे बाजूला याकोबाची विहिर आहे.



याकोबाच्या विहिरीवर सौ. पद्मा संबाया

तिचा आकार पेवा सारखा अगर झाकलेल्या विहिरी सारखा आहे. विहिरीच्या तोंडावर एक चौकोनी कट्टा असून पाणी शेंदून काढण्याकरितां या कट्ट्याचें मध्यभागीं हातभर रुंदीचें एक भोंक आहे. या कट्टयावर बसून येशूनें एका पतित शोमरोनी स्त्रीला ' देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनीं त्याची उपासना आत्म्यानें व खरेंपणानें केली पाहिजे हें सर्व धर्माचें सार सांगितलें होते.[1] ज्या कट्ट्यावर येशू बसला होता त्यांच कट्ट्यावर आम्हींहि बसून त्या विहिरीचें पाणी प्यालों. ही विहीरं चार हजार वर्षांची जुनी असून तिच्यावर आतां रशियन चर्चनें मठ बांधला आहे.

मठवासी सेविका मेणबत्तीचा उजेड खालीं सोडून यात्रेकरूंना विहिरींतील पाणी दाखवितात. आणि लगेच फिरकीवरून दोरीनें तें पाणी शेंदून यात्रेकरूंना मोठ्या अदबीनें प्यावयाला देतात. हें दृश्य पहात असतांना, काशीमध्यें, मेणबत्तीच्या उजेडांत, पाण्यावर तरंगत्या शंकर पार्वतीच्या मूर्ती दाखविणाऱ्या पंड्यांची आम्हांला आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं !

विहिरीच्या उत्तरेला, डोंगरावर योसेफाची कबर असून जवळच शोमरो-

[1]योहान ४:२४

नीं स्त्रीचें सुखार गांव होतें. विहिरींच्या दक्षिणेकडील खोऱ्यांत कुसुंबा, कांदा मका, गहूं, हरभरा वगैरेंचीं पिकें दिसलीं. अशाच पिकांकडे पाहून येशूनें 'पीक फार पण कामकरी थोडे, हें वाक्य उच्चारलें होतें.[१]

४७ व्या किलो मिटरवर आज्ञापटाचा कोश ठेवलेलें शिलो नगर होतें. या ठिकाणीं बालपणांत, शमुवेलाला देवाची वाणी ऐकूं आली होती.[२] १७० व्या किलोमिटरवर बेथेल होतें. तेथें याकोबानें निकराची प्रार्थना केली होती. प्रार्थना करणें म्हणजे देवाशीं सहवास ठेवण्याचा एक-शिडी सारखा-सोपान मार्ग आहे, या तत्वाचा या ठिकाणीं याकोबाला प्रत्यय आल्यामुळें, त्यानें आपल्या उत्पन्नाचा दशांश, देवाला देण्याची प्रथा सुरू केली.[३] बेथेलच्या जवळ आखानाच्या अनावर पापामुळें त्याला व त्याच्या घराण्याला देहांत शिक्षा झाल्याची आठवण करून देणारें आय नगर होतें.[४]

यरूशलमेच्या अलीकडे उत्तरेला १६ व्या किलोमिटरवर म्हणजे १० व्या मैला-वर अलबिरे नांवाचें गांव लागतें. या ठिकाणीं पोहोंचल्यावर आपला बारा वर्षीं चा बालक येशू हा आपल्या बरोबर नाहीं हें योसेफ व मार्या यांना समजलें.[५]

या गांवापासून यरूशलेमचें प्रथम दर्शन घडतें. त्या दर्शनाच्या आनंदांत अलबिरेच्या कॅफेमध्यें बसून आम्ही अरब कॉफि प्यालों. आणि यरूशलेमच्या वैभवाचीं गाणीं म्हणत पुढें चाललों.

अलबिरेच्या उजवे बाजूस रामल्ला नांवाचें ६०० ख्रिस्ती लोकांचें एक गांव आहे.

तेथें नमुनेदार ख्रिस्ती ग्रामोद्धारक संस्था आहेत. १३ व्या किलेमिटर-

[१]मत्तय ९:३७; [२]शमुवेल ३:४; [३]उत्पत्ती २८:१०-२२;
[४]यहोशवा ७ अध्याय [५]लूक २:४४

वर " एथपर्यंत देवानें आम्हाला मदत केली, " या अर्थानें बांधलेलें मिस्पे नगर होतें.[१] मिस्पे याचा अर्थ 'एबन एजर' म्हणजे 'देव सहाय्य' असा आहे. आतां हीं दोन नांवें आपल्या मुलाला देण्याची वहिवाट जगभर आहे. याच मिस्पेजवळ क्रुसेडचे वेळीं, आपणाला मुसलमानांच्या हातांतून यरूशलेम घेतां येईना यामुळें खट्टू होऊन इंग्लंडचा राजा रिचर्ड कर दे लिआ यानें यरूशलमेकडे पहायाचें वर्जिलें होतें. याच मिस्पे नगरीनें व्यापलेल्या प्रदेशांत आतां, इंग्रजांनीं आपला विमानें उतरविण्याचा एरोड्रोम-विमान अड्डा-केला आहे.



यरुशलेम (प्रथमदर्शन)

यानंतर ६ व्या किलोमिटर अनाथोत्त हा यिर्माया संदेष्ट्यांचें व गिबा ही

[१] शमुवेल ७:१२

एस्राएल लोकांच्या पहिल्या गुराखी राजाची जन्मभूमि आम्ही अवलोकन केली.

याचे पुढें स्कोपस टेंकडीवर हिब्रू विश्वविद्यालय स्थापलें आहे. त्याचे पूर्वेस जैतून नांवाचा डोंगर आहे. या डोंगरावर येशूच्या स्वर्गारोहणाच्या स्मरणार्थ बांधलेल्या गगनचुंबित मंदिराचें अवलोकन करीत किद्रोन ओढ्याच्या खोऱ्यांतून वर चढून संध्याकाळचें ६ वाजतां विद्युद्दीपांनीं प्रकाशलेल्या यरुशलेम नगरींत आम्हीं प्रवेश केला.



गालील सरोवराच्या किनाऱ्यावर

यरुशलेमेंतील पहिला दिवस

(शुक्रवार २१ मे १९३७)

यरुशलेमची हवा उत्साहवर्धक असल्यामुळें सकाळीं निजून उठल्यावर, थंड पाण्याचें स्नान केलें. स्नानगृहांतून परत येत असतां कॉरीडारच्या दोन्ही बाजूला लोक स्वस्थ घोरत असलेले दिसले. खिडकींतून बाहेर पाहिलें तों चांगलें उजाडलेलें ! परंतु घड्याळांत पाहिलें तों साडेचार वाजले होते ! १९ अक्षांश व ७३ रेखांशावर असलेल्या आपल्या समुद्र सपाटीच्या मुंबईत सकाळीं सहाला उजाडतें. परंतु ३१ अक्षांश व ३३ रेखांशावर आणि समुद्र सपाटीपासून २७०० फूट उंचीवर असलेल्या यरुशलेमेंत पहांटेचा प्रकाश लवकर पडतो. या पहांटेच्या शीघ्र प्रकाशामुळेंच येशू ख्रिस्त मेलेल्यांतून पुनः उठला त्या रविवारीं स्त्री उपासकांना व प्रेषितांना येशूच्या कबरेकडे जाणें सोपें झालें होतें हें येथें प्रथम माझ्या लक्ष्यांत आलें

सोडसाताला छोटी हजेरी होऊन प्रार्थना झाल्यावर, कोणाला गरम पाण्याची आंघोळ पाहिजे असल्यास १ शिलींग किंवा १० पीआस्टर, म्हणजे १२ आणे द्यावे लागतील, व थंड पाण्याची आंघोळ पाहिजे असल्यास ५ पिआस्टर द्यावे लागतील अशा अर्थाची नोटीस हाटेलवाल्यानें आम्हांवर बजाविली. हाटेलचा रोजचा आकार मात्र ५ शिलींग होता. धोबी शर्ट धुण्याला ६ आणे मागूं लागला ! तेव्हां या पाण्याच्या बाबतींत यरूशलेम आणि आमच्या ' नदी – पाणी – निपाणींत,' साम्य असल्याचें पाहून मला कौतुक वाटलें. या पाण्याच्या टंचाइमुळें आमच्यापैकीं कांहींनीं स्नानसंप पुकारला !

पवित्र थडग्याचें मंदिर

साडे आठाच्या सुमारास, याफे दरवाजांतून प्रवेश करून आम्हीं दाविद रस्त्यानें – The Church of Holy Sepulchre – पवित्र थडग्याचे मंदिराकडे गलो. ख्रिश्चन कमानींतून जाणारा दाविद रस्ता अरुंद आणि उंच–

सखल असून, तो जमिनींत जाणारा ओबडधोबड दगड रोवून केलेला आहे. शेंकडों वर्षांच्या वहिवाटीनें हा रस्ता अगदीं गुळगुळीत आणि निसरडा झाला आहे. त्याच्या दोन्ही बाजूला ख्रिस्ती व मुसलमान लोकांचीं दुकानें आहेत. या रस्त्यावरून जाणाऱ्यांना उन्हाचा व पावसाचा त्रास होऊं नये म्हणून त्याच्या वरच्या बाजूला दगडी छावणी बांधून रस्ता अगदीं झांकून टाकला आहे. त्यामुळें, कित्येक ठिकाणीं या रस्त्यावर, आपण माणसांनीं व दुकानांनीं गजबजलेल्या बोगद्यांतून जात आहों कीं काय असा भास होतो. शिवाय, मधून मधून या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पुष्कळ बोळ व गल्ल्या फुटल्या असून हांके हांकेच्या अंतरावर शिपाई उभे असतात. या चिकार गर्दीच्या दाविद रस्त्यांतून, आम्ही वाट चुकून भटकून जाऊं नये म्हणून आमचे वाटाडी मि. फरीदभाई हे आमची वरचेवर तपासणी करीत!

या रस्त्यावरील मनुष्यांच्या दाटींतून ओझ्यांनीं लादलेलीं गाढवें दुसऱ्यांना धक्के देत व स्वतः कोपरखळ्या खात आपला मार्ग क्रमीत असतात. बाळकासारख्या लठ्ठ, पडवळासारख्या लांब, आणि मुलांच्यां लोखंडी सळीच्या चक्रीगाडीप्रमाणें गोल आकाराच्या रोट्या हातांत घेऊन रोट्या विकणारीं पोरें विक्री करीत फिरतात. विदुषकाप्रमाणें उंच अणकुचीच्या टोप्या डोक्यावर टेऊन, ओझीं वाहण्याच्या टोपल्या हमाल लोक आपल्या पाठीवर बांधतात. अशा प्रकारच्या या चित्रविचित्र दाविद रस्त्यावर, कित्येक ठिकाणीं तर पायऱ्याहि बसविल्या आहेत त्यामुळ त्यांवरून कसलेंहि वाहन जाणें शक्य नाहीं.

पवित्र थडग्याचें मंदिर हें जगांमध्यें एक अत्यंत थोर आणि पवित्र स्थल असून, त्याच्या दर्शनाकरितां पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांच्या व सर्व वर्णांच्या ख्रिस्तभक्तांची गर्दी एकसारखी रोज लोटत असते. रोमन सम्राट कानस्टन्टैन यांची माता सेंट हेलीना या साध्वीनें चवथ्या शतकांत अलोट संपत्ति खर्च करून हें मंदीर उभारलें आहे.

यरुशलेमेंतील येशू ख्रिस्ताच्या कबरेला जगाचा मध्यबिंदु कल्पून तिच्या भोंवतीं एकापेक्षां एक सरस अशा वैभवशाली थाटाच्या अनेक भव्य इमारती

उभारल्या आहेत. यरुशलेमेंतील पवित्र थडग्याचें मंदीर हें जगांतील एक अपूर्व कौतुकच म्हणावयाचें ! या मंदिरला पूर्वी पुनरुत्थान मंदीर असें नांव होतें. त्याच्या प्रवेशद्वारासमोर एक मोठा चौक असून त्याचे डावे बाजूस घंटा टांगण्याकरितां बांधलेला एक उंच मनोरा आहे. मनोऱ्यावर ब्रिटिश निशाण फडकत असून निशाणाच्या कांठाच्या टोंकावर क्रूस झळकतो. यावरून आपलें राज्य खिरस्ताचें क्रुसाखालीं चालत आहे असें इंग्रज सरकारनें दाखविलें आहे.

दरवजांत प्रवेश करतांच, एक भली मोठीं संगमरवरी आडवी शिळा लागते. या शिळेवर येशूच्या मृतदेहाला तैलाभ्यंग केला होता असें म्हणतात. पवित्र थडग्याच्या मंदिरांत प्रवेश करणारे पुष्कळ स्त्री-पुरुष आणि मुलें गुडघे टेकून त्या शिळेचें चुंबन घेऊन पुढें जातात !

या शिळेचे उजवे बाजूस, अंधुक पायऱ्यांनीं वर चढून गेल्यास 'गलगथा' म्हणजे कवटीच्या आकाराच्या जागेच्या स्मरणार्थ बांधलेलें मंदिर लागतें.[१]

या मंदिराचे मध्यभागीं क्रूस खांब उभा असून त्याचे टोंकांवर हिब्रू, ग्रिक आणि लॅटिन या तिन्ही भाषेंत " येशू यहूद्यांचा राजा आहे " ही अक्षरें कोरलेली चांदीची पाटी लावली आहे. क्रूस खांब रोंवलेलें खडकांतलें भोंक आम्हीं हात घालून पाहिलें. मेणबत्त्यांच्या प्रकाशांत या मंदिरांत भक्तजन गुडघे टेंकून प्रार्थना करीत होते लुकाचा २३ वा अध्याय वाचून आम्हीं हिंदी ख्रिस्ती लोकहि त्यांच्या प्रार्थनेंत सामिल झालों. तेथून खालीं उतरून, उत्तरेकडे असलेल्या मंदिराकडे आम्ही गेलों. पवित्र थडग्याचें मंदिर म्हणजे एका भल्या मोठ्या शोभिवंत घुमटाच्या मध्यभागीं उठविलेली ही एक रत्नखचित त्रिंदिच म्हणावयाची ! या मंदिरांत एकेवेळीं तीन अगर चार लोकांना जातां येतें. मंदिराच्या आंतील भाग सोन्याच्या व चांदीच्या दिव्यांनीं व मेणबत्त्यांनीं निरंतरचा सुशोभित केलेला असतो.

---

१ योहान १९:१७

त्यांत उत्तरेच्या बाजूला ठेवलेल्या संगमरवरी पेटीला धरून अगर स्पर्श करून भक्तजन प्रार्थना करीत असतात.

या पवित्र थडग्याच्या मंदिराची लांबी २६ फूट व रुंदी १८ फूट आहे.

या मंदिराच्या भिंतींत एक गोल भोंक असून त्यांतून पुनरुत्थानाच्या आदल्या रात्रीं म्हणजे शनिवारीं मोठ्या समारंभानें अग्नि बाहेर पडतो.

आपल्या इकडे सीमोल्लंघनाचें सोनें लुटावयाला ज्याप्रमाणें लोक टपलेले असतात. त्याप्रमाणें हा अग्नि जगभर पोंचता करण्याकरतां भक्तजनांची तुफान गर्दी लोटलेली असते. आतां सर्वत्र रुढ होत चाललेली मेणबत्त्यांची उपासना या पवित्र अग्निचाच एक प्रकार असावा असें वाटतें. पवित्र थडग्याचें मंदिरापुढें ग्रीक चर्चचें जगन्मध्य मंदीर आहे. त्यांत रशियाच्या झारनें अर्पण केलेला एक ६ फूट घेराचा सोन्याचा दिवा आहे. कागदावर नखानें कोरून दाखविलेल्या नक्षीकामाप्रमाणें. एथें ग्रीक शिल्पशास्त्रांत आयकॉन नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीनें सोन्याच्या पत्र्यावर प्रेषितांचीं आणि साक्षीजनांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. हीं आयकॉन चित्रें, सोन्याचीं धुपाटणीं, मठाधिपतीचें उच्चासन, निरंतर शास्त्र, वाचनाची वेदी, आणि गायन मंडळाचें पीठ वगैरेंची शोभा तेथें जाऊनच पहाणें बरें!

पवित्र थडग्याच्या मंदिरापासून आम्हीं गब्बाथा या नांवानें प्रसिद्ध असलेल्या फरसबंदी न्यायासनाकडे गेलों.[१] या ठिकाणीं, ख्रिस्तकालीन रोमन शिपायांनीं सोंगट्या खेळण्याकरितां दगडावर कोरलेलीं कांहीं घरें अगदीं स्पष्ट दिसतात!

ज्या जागेवरून पिलातस प्रांताधिकाऱ्यानें, देहांत शिक्षा करविण्याच्या उद्देशानें संतापलेल्या यहूद्यांनीं आणलेल्या निरपराधी येशूकडे पाहून Ecce

---

[१]योहान १९:१३

Homo- ' पहा हा माणूस ' हें लॅटिन भाषेंतील शब्द उच्चारलेले होते त्या जागेवर रशियन ख्रिस्ती लोकांनीं ' एक्से हामो ' नांवांची जयकमान उभारली आहे. येशू ख्रिस्ताला चपडाका मारून त्याच्या डोक्यावर काट्यांचा मुकूट ठेवलेल्या जागेपासून तें थेट पवित्र थडग्याच्या मंदिरापर्यंतच्या रस्त्याला, म्हणजे ज्या रस्त्यानें येशू ख्रिस्तानें क्रूस वाहून नेला त्या रस्त्याला Via Dolorosa शोक रस्ता हें नांव दिलेलें आहे. या शोक रस्त्याला १४ टप्पे केलेले असून त्या प्रत्येकाला स्टेशन हें नांव आहे. आणि प्रत्येक टप्प्याचा कांहींतरीं विशेष इतिहास आणि महिमा वर्णन करण्यांत येतो या दिवशीं दुपारचें जेवण झाल्यावर


शोक रस्त्यावरील जयकमान

आम्हीं बेथेसदा नांवाचें तळें पाहिलें या तळ्याच्या आकार मोठ्या खोल विहिरीसारखा असून तिच्यावर चार कमानीं बांधल्या आहेत. विहिरींत उतरायाला १५० पायऱ्या असल्यामुळें येशूचे पाय तेथें लागेपर्यंत तेथें पडलेल्या १८ वर्षाच्या दुखणेकऱ्याला त्या विहिरींत उतरणें शक्य झालें नसतें

या ठिकाणी येशूनें केलेल्या चमत्कारांचें वर्णन १३४ भाषामध्यें लिहून विहिरीवर बांधलेल्या मठांत ठेवलेलें आहे. त्यांत 'अंजील सेंट जॉन अध्ययन ५ श्लोक १ या मथळ्याखालीं आमच्या मराठी भाषेचा मजकूर छापला आहे.

येथून आम्ही पूर्वेकडच्या किद्रोन खोऱ्यांतून वर चढून गेथसेमने बागेकडे गेलो. वाटेंत, स्तेफन दरवाजाजवळ पावलीच्या आकाराच्या सोन्याच्या टिकल्या आपल्या केशकलापांत घालून शिरोभूषण धारण केलेली एक सुंदर युवती आम्हांला दिसली. तिच्याकडे पाहून आम्हांला हरवलेल्या पावलीची गोष्ट आठवली.[१]

किद्रोन खोऱ्याच्या उजव्या दरडीला मुसलमानांच्या कबरा व डाव्या दरडीला यहुद्यांच्या कबरा आहेत.

गेथसेमाने बागेंत प्रवेश करतांना डावे बाजूस सेंट मेरीची व उजवे बाजूस अबशोलोमची कबर आहे. या बागेंत येशूनें आपल्या आयुष्यांतील शेवटच्या दिवशीं ज्या खडकावर प्रार्थना केली होती त्या खडकावर १४ ख्रिस्ती राष्ट्रांनीं जगांत कोठेंहि पहावयास मिळणार नाहीं अशी भव्य व सुंदर इमारत अगदीं अलिकडे म्हणजे १९२५ सालांत बांधून पुरी केली आहे.

या इमारतीच्या छतांत १२ घुमटांचा समावेश केला असून त्यावर जगांतल्या प्रख्यांत कलावंतांनी द्रव-रंगाच्या -Frescoe-पद्धतीनें ख्रिस्तचरित्रांत घडलेल्या प्रमुख प्रसंगाचे देखावे हुबेहूब चित्रीत केले आहेत.

इमारतीच्या उत्तरेला बागेमध्यें ख्रिस्त प्रभूच्या वेळेपासून राखून ठेवलेली जुनी ८ जाईताचीं झाडें आहेत. या झाडांची व त्यांच्या खोडांची जोपासना मठवासी रोमन कॅथलिक साधुपुरूष मोठ्या काळजीनें आणि जिवापाड श्रम घेऊन करतात. आम्ही त्या वृक्षाच्या छायेखालीं बसून, मार्क १४:३२–५२ ह्यांत वर्णन केलेल्या प्रसंगांशीं तादात्म्य पावलों.

---

[१] लूक १५:८:९

मठवासी एक साधुपुरूषहि आमच्यांत येऊन बसले होते. शेवटीं, त्या वृक्षाखालीं पडलेलीं सोनेरी रंगाची पानें उचलून व त्यांचा जपून संग्रह करून आम्हीं गेथसेमाने बागेंतून बाहेर पडलों. समोर पश्चिमेकडे, मुसलमानांनीं बंद केलेला सोनेरी दरवाजा सहस्त्र रश्मीच्या प्रकाशांत उठावदार दिसत होता.



गेथसेमानें बागेंतील जाईनाचें एक जुनें झाड

यरूशलेम दुसरा दिवस

सकाळीं प्रार्थना झाल्यावर ८॥ वाजतां आम्ही यहूद्यांची शोकाची भिंत Wailing Wall पहावयास गेलों. खिस्तापूर्वी ६५९ सालीं शलमोन



शोकाची भिंत.

राजानें बांधलेल्या देवळाच्या पश्चिम भिंतीचा हा एक अवशेष असून तो आतां मुसलमानांच्या ताब्यांत आहे. ही भिंत १६॥ फूट लांब व १३ फुट रुंद अशा अवजड आकाराच्या दगडांनीं उभारलेली असून तिची लांबी १८० फूट व उंची ३० फूट आहे. या भिंतीजवळ जमून, गेल्या दीडशें वर्षांपासून यहूदा लोक आपल्या गत वैभवाबद्दल शोक करीत असतात. या ठिकाणीं शुक्रवारी व सणाचे दिवशीं जास्त गर्दी जमते.

गालावर लांब कल्ले वाढलेले, डोक्यावर गोल काळी चक्री टोपी घातलेले आणि मोशाच्या काळची शाल अंगावर पांघरलेले सनातनी रब्बी लोक व वृद्ध स्त्रिया या भिंतीच्या दगडांना दोन्हीं हातांनीं कंवटाळून धरणें धरून उभीं असतात. नुकत्याच मरण पावलेल्या जिवलग आप्ताचा एकादा प्रेमळ गुण आठवून सुतकी माणूस ज्य प्रमाणें ओक्साबोक्सी रडत सुटतो त्याप्रमाणें दगडांना कंवटाळून राहिलेले हे यहूदी पुढारी दुःखाचे हुंदके देऊन, छाती, मान व डोकें हीं एका बाजूनें दुसऱ्या बाजूला झुलवीत कपाळ दगडावर आपटीत मोठ्यानें रडूं लागले म्हणजे त्यांच्यापाठीमागचा सर्व यहूदी समुदाय पुढाऱ्यांचें अनुकरण करीत दुःखसागरांत मग्न होऊन जातो.

अशाप्रकारें हें यचावत यहुदी राष्ट्र मोठ्या न रडत असल्याचा देखावा मोठा हृदयस्पर्शी असतो. या रडणाऱ्या सनातनी यहुद्यांपैकीं एकजण चित्रांत दाखविलेल्या येशू ख्रिस्ताच्या पुतळ्याप्रमाणें हुबेहूब दिसत होता.

येशूचें प्रेम त्याला कळविण्याकरितां मी अगदीं थेट त्याच्याजवळ गेलो. त्यानें मजकडे पाठीमागें वळून पाहिलें; पण तो लगेच आपल्या शोकसागरांत बुडून गेला. तेव्हां मागे उभें असलेल्या इंग्रजी बोलणाऱ्या यहुद्यांना आम्हीं हिंदी लोकांनीं येशूवर विश्वास ठेवण्याचा उपदेश केला. यरुशलेमेंत यहुद्यांचीं आणि मुसलमानांची नेहमीं मारामारी होत असल्यामुळें बंदोबस्तासाठीं या भिंतीच्या दोन्ही टोकांना एकेक लष्करी शिपाई उभा असतो.

या दिवशीं दुपारीं आम्हीं मोटारीनें बेथलेहेमास गेलों. गांवाजवळ उजवे हाताला याकोबाची सत् पत्नि राहेल इची कबर असून तिच्यावर एक लहानसा जुनाट घुमट आहे. ही कबर हल्लीं यहुदी लोकांच्या ताब्यांत आहे. येशू ख्रिस्ताचें गुहेंतील गोठ्यातलें जन्मठिकाण बेथलेहेम गांवच्या पूर्वेस असून त्यावर क्रुसाच्या आकाराचें The Church of Nativity जन्मस्थळ मंदीर उभारलें आहे. या मंदीरांत प्रवेश करणाऱ्या सर्वांनीं नमावें या हेतूनेंच कीं काय कोण जाणें प्रवेशद्वार अतिशय ठेंगणें केलें आहे.

जन्म ठिकाणाच्या गुहेवरची उतार शाळा आतां नाहींशी झालेली आहे. ख्रिस्त जन्माचे वेळी योसेफ व मार्या तेथें गेलें असतांना उतार शाळेच्या मालकांनी त्यांना सन्मानाची जागा दिली होती परंतु ऐन प्रसूताच्या वेळेत मार्या आड पडण्याकरितां घरांखालच्या गुहेंतील गोठ्यांत गेली असावी.



बेथलेहेम गांव

याच जागेंत ख्रिस्त जन्म झालें, हें दाखविण्याकरितां मुळांत या जागेवर उभारलेल्या इमारतीची मोझाइक पद्धतीची शोभिवंत जमीन मंदीराच्या गाभाऱ्यांत मोठ्या बंदोबस्तानें राखून ठेवली आहे. या मोझाइक पद्धतीच्या जमिनीवर लांकडी फळ्यांची उंच तक्तपोशी केली असून मूळ जमिनीचे अवशेष प्रवाशी भक्तजनांना दाखविण्याकरतां तक्त पोशींत मधून मधून कुलपें लावून फडताळें केलीं आहेत.

या भव्य जन्मस्थान मंदिराच्या उजव्या बाजूला, मागील कोपऱ्यांत गुहेंतील गोठ्यांत उतरण्याला पायऱ्या आहेत. त्या पायऱ्या उतरून आम्हीं ख्रिस्त जन्म झालेल्या जागेकडे गेलों. ही ख्रिस्तजन्म झालेली गुंफा भक्तांनीं सोनें, रुपें, आणि इतर जड जवाहिर वापरून व कला कुसरीचे

उभारल्या आहेत. यरुशलेमेंतील पवित्र थडग्याचें मंदीर हें जगांतील एक अपूर्व कौतुकच म्हणावयाचें ! या मंदिरला पूर्वी पुनरुत्थान मंदीर असें नांव होतें. त्याच्या प्रवेशद्वारासमोर एक मोठा चौक असून त्याचे डावे बाजूस घंटा टांगण्याकरितां बांधलेला एक उंच मनोरा आहे. मनोऱ्यावर ब्रिटिश निशाण फडकत असून निशाणाच्या कांठाच्या टोंकावर क्रूस झळकतो. यावरून आपलें राज्य खिस्ताचें क्रुसाखालीं चालत आहे असें इंग्रज सरकारनें दाखविलें आहे.

दरवजांत प्रवेश करतांच, एक भली मोठीं संगमरवरी आडवी शिळा लागते. या शिळेवर येशूच्या मृतदेहाला तैलाभ्यंग केला होता असें म्हणतात. पवित्र थडग्याच्या मंदिरांत प्रवेश करणारे पुष्कळ स्त्री-पुरुष आणि मुलें गुडघे टेकून त्या शिळेचें चुंबन घेऊन पुढें जातात !

या शिळेचे उजवे बाजूस, अंधुक पायऱ्यांनीं वर चढून गेल्यास 'गलगथा' म्हणजे कवटीच्या आकाराच्या जागेच्या स्मरणार्थ बांधलेलें मंदिर लागतें.[१]

या मंदिराचे मध्यभागीं क्रूस खांब उभा असून त्याचे टोंकांवर हिब्रू, ग्रिक आणि लॅटिन या तिन्ही भाषेंत "येशू यहूद्यांचा राजा आहे" ही अक्षरें कोरलेली चांदीची पाटी लावली आहे. क्रूस खांब रोंवलेलें खडकांतलें भोंक आम्हीं हात घालून पाहिलें. मेणबत्त्यांच्या प्रकाशांत या मंदिरांत भक्तजन गुडघे टेंकून प्रार्थना करीत होते लुकाचा २३ वा अध्याय वाचून आम्हीं हिंदी खिस्ती लोकहि त्यांच्या प्रार्थनेंत सामिल झालों. तेथून खालीं उतरून, उत्तरेकडे असलेल्या मंदिराकडे आम्ही गेलों. पवित्र थडग्याचें मंदिर म्हणजे एका भल्या मोठ्या शोभिवंत घुमटाच्या मध्यभागीं उठविलेली ही एक रत्नखचित बिंदिच म्हणावयाची ! या मंदिरांत एकेवेळीं तीन अगर चार लोकांना जातां येतें. मंदिराच्या आंतील भाग सोन्याच्या व चांदीच्या दिव्यांनीं व मेणबत्त्यांनीं निरंतरचा सुशोभित केलेला असतो.

---

[१] योहान १९:१७

त्यांत उत्तरेच्या बाजूला ठेवलेल्या संगमरवरी पेटीला धरून अगर स्पर्श करून भक्तजन प्रार्थना करीत असतात.

या पवित्र थडग्याच्या मंदिराची लांबी २६ फूट व रुंदी १८ फूट आहे.

या मंदिराच्या भिंतींत एक गोल भोंक असून त्यांतून पुनरुत्थानाच्या आदल्या रात्रीं म्हणजे शनिवारीं मोठ्या समारंभानें अग्नि बाहेर पडतो.

आपल्या इकडे सीमोल्लंघनाचें सोनें लुटावयाला ज्याप्रमाणें लोक टपलेले असतात. त्याप्रमाणें हा अग्नि जगभर पेंचना करण्याकरतां भक्तजनांची तुफान गर्दी लोटलेली असते. आतां सर्वत्र रुढ होत चाललेली मेणबत्त्यांची उपासना या पवित्र अग्निचाच एक प्रकार असावा असें वाटतें. पवित्र थडग्याचें मंदिरापुढें ग्रीक चर्वचें जगन्मध्य मंदीर आहे. त्यांत रशियाच्या झारनें अर्पण केलेला एक ६ फूट घेराचा सोन्याचा दिवा आहे. कागदावर नखानें कोरून दाखविलेल्या नक्षीकामाप्रमाणें एथें ग्रीक शिल्पशास्त्रांत आयकॉन नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीनें सोन्याच्या पत्र्यावर प्रेषितांचीं आणि साक्षीजनांची चित्रें कोरलेलीं आहेत. हीं आयकॉन चित्रें, सोन्याचीं धुपाटणीं, मठाधिपतीचें उच्चासन, निरंतर शास्त्र, वाचनाची वेदी, आणि गायन मंडळाचें पीठ वगैरेंची शोभा तेथें जाऊनच पहाणें बरें !

पवित्र थडग्याच्या मंदिरापासून आम्हीं गब्बाथा या नांवानें प्रसिद्ध असलेल्या फरसबंदी न्यायासनाकडे गेलों.[१] या ठिकाणीं, ख्रिस्तकालीन रोमन शिपायांनीं सोंगट्या खेळण्याकरितां दगडावर कोरलेलीं कांहीं घरें अगदीं स्पष्ट दिसतात !

ज्या जागेवरून पिलातस प्रांताधिकाऱ्यानें, देहांत शिक्षा करविण्याच्या उद्देशानें संतापलेल्या यहूद्यांनीं आणलेल्या निरपराधी येशूकडे पाहून Ecce

---

[१]योहान १९:१३

Homo- ‘ पहा हा माणूस ’ हें लॅटिन भाषेंतील शब्द उच्चारलेले होते त्या जागेवर रशियन ख्रिस्ती लोकांनीं ‘ एक्से होमो ’ नांवाची जयकमान उभारली आहे. येशू ख्रिस्ताला चपडाका मारून त्याच्या डोक्यावर काट्यांचा मुकूट ठेवलेल्या जागेपासून तें थेट पवित्र थडग्याच्या मंदिरापर्यंतच्या रस्त्याला, म्हणजे ज्या रस्त्यानें येशू ख्रिस्तानें क्रूस वाहून नेला त्या रस्त्याला Via Dolorosa शोक रस्ता हें नांव दिलेलें आहे. या शोक रस्त्याला १४ टप्पे केलेले असून त्या प्रत्येकाला स्टेशन हें नांव आहे. आणि प्रत्येक टप्प्याचा कांहींतरी विशेष इतिहास आणि महिमा वर्णन करण्यांत येतो



शोक रस्त्यावरील जयकमान

या दिवशीं दुपारचें जेवण झाल्यावर आम्हीं बेथेसदा नांवाचें तळें पाहिलें या तळ्याच्या आकार मोठ्या खोल विहिरीसारखा असून तिच्यावर चार कमानीं बांधल्या आहेत. विहिरींत उतरायाला १५० पायऱ्या असल्यामुळें येशूचे पाय तेथें लागेपर्यंत तेथें पडलेल्या १८ वर्षांच्या दुखणेकऱ्याला त्या विहिरींत उतरणें शक्य झालें नसतें

या ठिकाणी येशूनें केलेल्या चमत्कारांचें वर्णन १३४ भाषामध्यें लिहून विहिरीवर बांधलेल्या मठांत ठेवलेलें आहे. त्यांत 'अंजील सेंट जॉन अध्ययन ५ श्लोक १ या मथळ्याखालीं आमच्या मराठी भाषेचा मजकूर छापला आहे.

येथून आम्ही पूर्वेकडच्या किद्रोन खोऱ्यांतून वर चढून गेथसेमनें बागेकडे गेला. वाटेंत, स्तेफन दरवाजाजवळ पावलीच्या आकाराच्या सोन्याच्या टिकल्या आपल्या केशकलापांत घालून शिरोभूषण धारण केलेली एक सुंदर युवती आम्हांला दिसली. तिच्याकडे पाहून आम्हांला हरवलेल्या पावलीची गोष्ट आठवली.[१]

किद्रोन खोऱ्याच्या उजव्या दरडीला मुसलमानांच्या कबरा व डाव्या दरडीला यहुद्यांच्या कबरा आहेत.

गेथसेमाने बागेंत प्रवेश करतांना डावे बाजूस सेंट मेरीची व उजवे बाजूस अबशोलेमची कबर आहे. या बागेंत येशूनें आपल्या आयुष्यांतील शेवटच्या दिवशीं ज्या खडकावर प्रार्थना केली होती त्या खडकावर १४ ख्रिस्ती राष्ट्रांनीं जगांत कोठेंहि पहावयास मिळणार नाहीं अशी भव्य व सुंदर इमारत अगदीं अलिकडे म्हणजे १९२५ सालांत बांधून पुरी केली आहे.

या इमारतीच्या छतांत १२ घुमटांचा समावेश केला असून त्यावर जगांतल्या प्रख्यांत कलावंतांना द्रव-रंगाच्या -Frescoe-पद्धतीनें ख्रिस्तचरित्रांत घडलेल्या प्रमुख प्रसंगाचे देखावे हुबेहूब चित्रीत केले आहेत.

इमारतीच्या उत्तरेला बागेमध्यें ख्रिस्त प्रभूच्या वेळेपासून राखून ठेवलेलीं जुनी ८ जाईतांचीं झाडें आहेत. या झाडांची व त्यांच्या खोडांची जोपासना मठवासी रोमन कॅथलिक साधुपुरूष मोठ्या काळजीनें आणि जिवापाड श्रम घेऊन करतात. आम्ही त्या वृक्षाच्या छायेखालीं बसून, मार्क १४:३२–५२ ह्यांत वर्णन केलेल्या प्रसंगांशीं तादात्म्य पावलों.

---

[१] लूक १५:८:९


मठवासी एक साधुपुरूषहि आमच्यांत येऊन बसले होते. शेवटीं, त्या वृक्षाखालीं पडलेलीं सोनेरी रंगाची पानें उचलून व त्यांचा जपून संग्रह करून आम्हीं गेथसेमाने बागेंतून बाहेर पडलों. समोर पश्चिमेकडे, मुसलमानांनीं बंद केलेला सोनेरी दरवाजा सहस्र रश्मीच्या प्रकाशांत उठावदार दिसत होता.



गेथसेमानें बागेंतील जाईनाचें एक जुनें झाड

यरूशलेम दुसरा दिवस

सकाळीं प्रार्थना झाल्यावर ८॥ वाजतां आम्ही यहूद्यांची शोकाची भिंत Wailing Wall पहावयास गेलों. ख्रिस्तापूर्वी ६५९ सालीं शलमोन



शोकाची भिंत.

राजानें बांधलेल्या देवळाच्या पश्चिम भिंतीचा हा एक अवशेष असून तो आतां मुसलमानांच्या ताब्यांत आहे. ही भिंत १६॥ फूट लांब व १३ फुट रुंद अशा अवजड आकाराच्या दगडांनीं उभारलेली असून तिची लांबी १८० फूट व उंची ३० फूट आहे. या भिंतीजवळ जमून, गेल्या दीडशें वर्षांपासून यहूदा लोक आपल्या गत वैभवाबद्दल शोक करीत असतात. या ठिकाणीं शुक्रवारी व सणाचे दिवशीं जास्त गर्दी जमते.


गालावर लांब कल्ले वाढलेले, डोक्यावर गोल काळी चक्री टोपी घातलेले आणि मोशाच्या काळची शाल अंगांवर पांघरलेले सनातनी रब्बी लोक व वृद्ध स्त्रिया या भिंतीच्या दगडांना दोन्हीं हातांनीं कंवटाळून धरणें धरून उभीं असतात. नुकत्याच मरण पावलेल्या जिवलग आप्ताचा एकादा प्रेमळ गुण आठवून सुतकी माणूस ज्य प्रमाणें ओक्साबोक्सी रडत सुटतो त्याप्रमाणें दगडांना कंवटाळून राहिलेले हे यहुदी पुढारी दुःखाचे हुंदके देऊन, छाती, मान व डोकें हीं एका बाजूनें दुसऱ्या बाजूला झुलवीत कपाळ दगडावर आपटीत मोठ्यानें रडूं लागले म्हणजे त्यांच्यापाठीमागचा सर्व यहूदी समुदाय पुढाऱ्यांचें अनुकरण करीत दुःखसागरांत मग्न होऊन जातो.

अशाप्रकारें हें यच्चावत यहुदी राष्ट्र मोठ्यानें रडत असल्याचा देखावा मोठा हृदयस्पर्शी असतो. या रडणाऱ्या सनातनी यहुद्यांपैकीं एकजण चित्रांत दाखविलेल्या येशू ख्रिस्ताच्या पुतळ्याप्रमाणें हुबेहूब दिसत होता.

येशूचें प्रेम त्याला कळविण्याकरितां मी अगदीं थेट त्याच्याजवळ गेलो. त्यानें मजकडे पाठीमागें वळून पाहिलें; पण तो लगेच आपल्या शोकसागरांत बुडून गेला. तेव्हां मागे उभे असलेल्या इंग्रजी बोलणाऱ्या यहुद्यांना आम्हीं हिंदी लोकांनीं येशूवर विश्वास ठेवण्याचा उपदेश केला. यरुशलेमेंत यहुद्यांचीं आणि मुसलमानांची नेहमीं मारामारी होत असल्यामुळें बंदोबस्तासाठीं या भिंतीच्या दोन्ही टोकांना एकेक लष्करी शिपाई उभा असतो.

या दिवशीं दुपारीं आम्हीं मोटारीनें बेथलेहेमास गेलों. गांवाजवळ उजवे हाताला याकोबाची सत्पत्नि राहेल इची कबर असून तिच्यावर एक लहानसा जुनाट घुमट आहे. ही कबर हल्लीं यहुदी लोकांच्या ताब्यांत आहे. येशू ख्रिस्ताचें गुहेंतील गोठ्यातलें जन्मठिकाण बेथलेहेम गांवच्या पूर्वेस असून त्यावर क्रूसाच्या आकाराचें The Church of Nativity जन्मस्थळ मंदीर उभारलें आहे. या मंदीरांत प्रवेश करणाऱ्या सर्वांनीं नमावें या हेतूनेंच कीं काय कोण जाणें प्रवेशद्वार अतिशय ठेंगणें केलें आहे.

जन्म ठिकाणाच्या गुहेवरची उतार शाळा आतां नाहींशी झालेली आहे. खिस्त जन्माचे वेळी योसेफ व मार्या तेथें गेलें असतांना उतार शाळेच्या मालकांनी त्यांना सन्मानाची जागा दिली होती परंतु ऐन प्रसूतीच्या वेळेस मार्या आड पडण्याकरितां घरांखालच्या गुहेंतील गोठ्यांत गेली असावी.



बेथलेहेम गांव

याच जागेंत खिस्त जन्म झालें, हें दाखविण्याकरितां मुळांत या जागेवर उभारलेल्या इमारतीची मोझाइक पद्धतीची शोभिवंत जमीन मंदीराच्या गाभाऱ्यांत मोठ्या बंदोबस्तानें राखून ठेवली आहे. या मोझाइक पद्धतीच्या जमिनीवर लांकडी फळ्यांची उंच तक्तपोशी केली असून मूळ जमिनीचे अवशेष प्रवाशी भक्तजनांना दाखविण्याकरतां तक्त पोशींत मधून मधून कुलपें लावून फडताळें केलीं आहेत.

या भव्य जन्मस्थान मंदिराच्या उजव्या बाजूला, मागील कोपऱ्यांत गुहेंतील गोठ्यांत उतरण्याला पायऱ्या आहेत. त्या पायऱ्या उतरून आम्हीं खिस्त जन्म झालेल्या जागेकडे गेलों. ही खिस्तजन्म झालेली गुंफा भक्तांनीं सोनें, रुपें, आणि इतर जड जवाहिर वापरून व कला कुसरीचे

या पाताळनगरींतील लोकांना पवित्र थडग्याच्या अधिकाऱ्याकडून आठवड्यांतून दोनदां अन्न पुरविलें जातें असें म्हणतात.

उत्तरेकडच्या अष्टांग वनामधून पूर्वीच्या रोमन लोकांनीं बांधलेला एक सुंदर पाण्याचा पाट वहात येऊन या दरींत उतरतो. याच दरींत किंवा त्याचें आसपास एलिया करींथ ओहोळ होता.[१]

यहोशवाच्या वेळच्या सर्वांत जुन्या लहानशा यरीहो गांवचे आतां, प्रोफेसर गॅरस्टँग यांनीं उत्खनन केलें आहे. अद्भुत रीतीनें बाहेर कोसळून पडलेल्या या गांवच्या तटाच्या विटावरून इस्राएल लोक आंत शिरले, असा ताज्या संशोधनाचा निष्कर्ष लागतो.[२]

हेरोद राजानें बांधलेले, येशूच्या वेळचें दुसरें यरीहोहि आतां नामशेष झालें आहे.[३]

या दोन पडक्या यरीहोंच्या मध्यभागीं अलीशाचा गोड पाण्याचा झरा जमिनींतून जोरानें वर उसळून नदीप्रमाणें वहात आहे.[४]

या झऱ्याचें तोंड पश्चिमेकडे असलेल्या उंच मोहगिरीकडे वळलेलें आहे असें दिसतें! — Mount of Temptation –

इ० स० १२ व्या शतकांत धर्मयोध्यांनीं – क्रुसेडर – लोकांनीं वसविलेलें तिसरें यरीहो मात्र चांगल्या स्थितींत आहे. त्यामध्यें १००० मुसलमान, १०० ख्रिस्ती, व १० यहूदी आहेत.

या अर्वाचीन यरीहोच्या पूर्वेस, यार्देन नदीवर अलेन्बी नांवाचा पूल

---

[१] १ राजे १७ : १ – ५, [२] यहोशवा ६ : २०, [३] लूक १९ : १ – १०,
[४] २ राजे २ : १९ – २२

बांधला असून, त्यावरून यार्देन नदीच्या अलीकडील आमनच्या राज्यांत येतां येतें.



यार्देन नदींत नौका विहार

या आमनच्या आरबी मुलखांत खिस्तकालीन पिरीया प्रांत व दकापलसि नांवाचीं ग्रीक संस्कृतीचीं दहा गांवें होतीं.

यरीहोच्या दक्षिणेस चार पांच मैलावर जेथें इस्राएल लोकांनीं यार्देन नदी ओलांडली व जेथें येशूचा बाप्तिस्मा झाला त्या ठिकाणीं दुपारी भर उन्हांत एक वाजतां आम्ही जाऊन पाहोंचलो.

येथें यार्देन नदीचें पात्र अरुंद असून खोल आहे.

यरुशलेम तें यरीहोपर्यंतचा ओसाड आणि रुक्ष प्रदेश संपल्यावर यार्देन कांठची रम्य वनश्री पाहून आम्हांला मोठा आनंद झाला.

यार्देन नदी ही हार्मोन पर्वताच्या पोटांत उगम पावून १२८ मैल लांबीच्या प्रदेशांत अनंत प्रकारचे नागमोडी वळसे घेत खालीं दक्षिणेकडे जाते. तिच्या उगमाला व मुखाला धरून कोणीं ओढल्यास तिची खरी लांबी २०० मैल भरेल !

अशी ही स्वर्गीय स्रोतस्विनी जेरामच्या तळ्यांत उडी मारून गालील सरोवरांत पोहून मृत समुद्राला जाऊन मिळते.

आम्हीं यार्देन नदींत आंघोळ केली ! पोहलों ! व उलट सुलट प्रवाहांत नौकाविहार केला ! आणि भोजन झाल्यावर दक्षिण दिशेनें पृथ्वीच्या पोटांत खालीं खोल उतरत असल्याप्रमाणें आम्हीं मृत समुद्राकडें जावयास निघालों. या ठिकाणच्या उष्णतेमुळें मनुष्य भाजूनच निघतो ! वाटेंत आम्हांला अबिसिनियाच्या बादशहाचा राजवाडा आणि त्याचें ख्रिस्त मंदीर लागलें.

मृत समुद्राची लांबी ५० मैल, रुंदी ११ मैल व खोली १२२० फूट असून त्याची सपाटी भूमध्य समुद्राच्या सपाटी खालीं १३०० फूट आहे.

या समुद्राचे दक्षिणेस सदोम व उत्तरेस गमोरा हीं दोन गांवें लैंगिक सुखाच्या अतिरेकानें कल्पनातीत भ्रष्ट झालेलीं होतीं.[१]

आतां यहुदी संशोधक गमोरा या गांवाचें उत्खनन करीत आहेत.

समुद्राच्या पश्चिमेस एनगेदीचे रान होतें. तेथें दाविदाला त्याचा कट्टा शत्रु शौल अचानक गुहेंत निजलेला सांपडला, तरीहि त्यानें त्याच्यावर तरवार उपसली नाहीं.

समुद्राचें पूर्व किनाऱ्यावर मिठाचे डोंगर आहेत. त्यामध्यें मिठाचा खांब झालेली लोटाची बायको समाविष्ट झालेली आहे.[२]

---

[१] उत्पत्ती १९:२४; [२] उत्पत्ती १९:२६

याच डोंगराच्या माथ्यावरून मोशानें पालेस्ताईन देश पाहून डोळ्यांचीं पारणीं फेडलीं.[१]

याच डोंगरावर, मखिरस नांवाच्या किल्ल्यांत, बाप्तिस्मा करणाऱ्या योहानला स्पष्टवक्तेपणाबद्दल प्राणाचें मोल द्यावें लागलें.[२]

मृत समुद्राला, आतां क्षारसागर म्हटलेलें बरें ! कारण समुद्राचें पाणी किनाऱ्यावरील मोठमोठ्या वाफ्यांमध्यें सुकवून त्यांत द्रवरूपानें मिसळलेले पोट्याश, ब्रोमिन, आणि तत्सम इतर क्षार बाहेर काढण्याचें अवाढव्य कार-खानें सुरू आहेत. पोट्याश हें उत्तम खत आणि ब्रोमिन हें उत्तम मेंदुशामक औषध आहे.

सर्व जगाला कैक वर्षें पुरेल इतका या क्षारांचा विपुल पुरवठा मृत-समुद्रांत आहे.

या क्षार समुद्राच्या पाण्यांत अंघोळ केल्यानें कांहीं व्याधीं बरे होतात.

मृत समुद्राचे कडवट आणि खारट पाणी चुकून डोळ्याला अगर ओठा-लागलें तर ते फार झोंबतें. या समुद्राच्या खारट पाण्यांत स्नान केलें तर तटतटून तेलकटपणा येतो. हा तेलकटपणा साफ धुऊन काढण्याकरतां किनाऱ्यावरील स्नानगृहांत गोड्या पाण्याच्या फवाऱ्यांनीं आंघोळ करण्याची उत्कृष्ट सोय केलेली आहे. यामुळें समुद्रांत स्नान करण्याची ये, जा, सारखी सुरु असतें.

स्नानगृहाच्या यहुदी मालकांनीं आपल्या हॉटेलमध्यें विजेचे दिवे, पंखे, रेडिओ, टेलिफोन वगैरे आधुनिक सुखसोयी व नाना तऱ्हेच्या खाद्यपेयांचीं रेलचेल केलेली असते. त्याच प्रमाणें हौशी व रंगेल लोकांकरतां नृत्य गायन जलसे वगैरेंचीही सोय केलेली आहे.

---

[१]अनुवाद ३४:१–५; [२]मार्क ६

मृत समुद्राच्या पाण्याचें घनमाप एकांशापेक्षां जास्त म्हणजे १·२५० असल्यानें त्यांत कोणीहि जिवंत प्राणी बुडणें शक्य नाहीं. त्यामुळें या समुद्रावर हातपाय ताणून निजलेले पुष्कळ लोक रात्रंदिवस केव्हांहि नजरेस पडतात.

आमच्या पैकीं एका भगिनीला या पाण्यावर बळेंच तरंगविण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला परंतु तिला पोहण्याची संवय नसल्यामुळें पाणी अंगाला लागतांच ती मोठ्यानें किंकाळे! त्यामुळें इतर लोकांना ही गमंत पाहून मोठ्यानें हसूं लोटे. या हास्याचे मजलेच्या मजले चढून सर्व समुद्रकिनारा दुमदुमून गेला.

मी या मृत समूद्रांत पोहण्याचा प्रयत्न केला, परंतु तसें करणें जड जाटल्यावरून मऊ पिसांच्या गादीवर लोळावें त्याप्रमाणें हातपाय लांब करून मीहि या समुद्ररुपी बिछान्यावर खुशाल निजून राहिलों.



यरुशलमेंतील पांचवा दिवस

(मंगळवार २५-५-३७)

या दिवशीं, सकाळीं, आम्हीं जैतून नांवाच्या डोंगरावर गेलों. यशया ६१:४ व यिर्मया ३१;३८ च्या आश्चर्यकारक भविष्यवाणीप्रमाणें यारे दरवाज्यापासून ते जैतून डोंगरापर्यंत सर्व प्रदेश इमारतींनीं गजबजून जाऊन त्यामध्यें सर्व राष्ट्राचे लोक वस्ती करून राहिले आहेत. महायुध्दांत इंग्रजी साम्राज्याचे ३००० सैनिक पालेस्ताईनमध्यें कामास आले. त्यांचें स्मारक स्मशानहि याच टांपूत बांधलेलें आहे.

जैतून डोंगराच्या माथ्यावर मुसलमानांचें एक लहानसें खेडें असून मध्यभागीं स्वर्गारोहण मंदिर आहे.

या स्वर्गारोहण मंदीराचा आकार शिखर विरहित घुमटासारखा असून त्याच्या सभोंवार निरनिराळया ख्रिस्ती राष्ट्रांच्या उत्सवाकरितां खुलीं दालनें राखून ठेवलीं आहेत.

या शिवाय सर्व जैतून पर्वतावर पुष्कळ गगनचुंबित स्वर्गारोहण शिखरें आणि देवळें बांधलेलीं असून त्यांतून भाविक स्त्री पुरुषांचें हिब्रू बायबलचें निरंतर वाचन चाललेलें असतें.

या पर्वतावरील मंदिराच्या शिखरावरून पूर्वेस यार्देन नदी व गिलादचे पर्वत, दक्षिणेस बेथलेहेम, पश्चिमेस भुमध्य समुद्र व शोमरोनचे पहाडी प्रदेश दिसतात.

शिवाय, या पर्वतावरून विहंगम दृष्टीनें सर्व यरुशलमेची शोभा पहातां येतें. या जैतून पर्वतावर ख्रिस्त प्रभूचें नेहमीं जाणें येणें असे आणि येथूनच

त्यानें जयहोसान्ना मिरवणूक काढली होती. आणि याच ठिकाणावरून त्यानें येरुशलेम नगरीकडे पाहून तिच्या घातकी वर्तनाबद्दल शोक केला होता.[१]

या दिवशीं, दुपारीं दोनच्या सुमारास, आम्हीं हिंदीं यात्रेकरू गाढवावर बसून, शिलोह नांवाच्या तळयाकडे गेलों.

आस्मादिकांना एक शुभ्र गर्दभ मिळालें होतें! आमच्या गर्दभारूढ स्वाऱ्या पाहून येरूशलेमकरांना मोठी मौज वाटली! कोणीं आमची हबशी व इंदियन या नांवानें संभावना केली, तर कोणीं गांधीं नेहरू आणि शौकत-अली या नांवानें ओरडून आमचा सन्मान केला. गाढवावर बसण्याची संवय आम्हाला नसल्यामुळें आम्हांपैकीं कित्येकांना मागेंपुढें भालदार चोप-दारांची गरज भासली.

आमचे वाटाडी मि. फरीद सालमन व सत्तर वर्षे वयाचे वृद्ध श्री. गोरखनाथ, राजा हरनामसिंग याचे एक नातेवाईक हे दोघे बरीक गाढवावर ऐटीनें बसून चालले होते. आमच्या टोळीपैकीं लांब टांग्या डॉ. गिनेरूचे पाय गाढवावर बसल्यावर जमिनीला घांसू लागले तेव्हां त्यांनीं मात्र लंब-कर्णाची स्वारी केव्हांच वर्ज्य केली होती.

यापे दरवाजापासून शियोन दरवाजा व ओफेल[२] नावाच्या टेंकडीवर बांधलेला दाविद राजाचा कोट यांना वळसा देत आम्हीं दक्षिणेकडील हिन्नोम नांवाच्या खोऱ्यांत उतरलों[३]

तेथें "इकडे पर्वत इकडे (नदी)" याची आम्हाला पदोंपदीं प्रचिति येऊं लागली, समोर किद्रोन खोऱ्याच्या बाजूनें एक सात आठ वर्षांचें पोर गाढवावरून खालीं येत होतें. त्याची आई त्याच्यामागून पायीं चालली होती.

---

[१] लूक १९:३७-४४ [२] २ इतिहास २७:३ [३] यिर्मया १९:१-१५

रस्त्याच्या उजव्या बाजुला हाकलदमा, म्हणजे रक्ताचें शेत, या नांवाचें स्मशान आहे. तें येशूला धरून देण्याकरतां यहुदा इस्कार्योत नांवाच्या शिष्याला लांच म्हणून दिलेल्या पैशांतून विकत घेतलें होतें.[१]

आजपर्यंत आम्हीं उंट, घोडे, हत्ती, यांवर बसलों होतों पण या वेळेस टायरोपिअान दरीच्या तोंडावर असलेल्या शिलोह तळ्यांवर जाऊन जेव्हां आम्हीं गाडवाच्या रिकेबीमधून पाय काडले, तेव्हां आम्हांला कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें.

शिलोह तळ्याच्या शेजारीं डोंगरमाथ्यावर शिलवान म्हणून गांव होतें. त्यावरून या तळ्याला शिलोह हें नांव मिळालें असावें.[२]

या तळ्याच्या उत्तरेस सुमारें पाव मैलांवर ' कुमारिकेचा झरा ' नांवाची विहीर आहे. पोखरून केलेल्या बोगद्यामधून कुमारिकेच्या विहिरीचें पाणी शिलोह बावडींत ' पाठविलें ' आहे. यावरून शिलोह तळ्याला 'पाठविलेला' तलाव असेंहि एक नांव आहे.[३]

शिलोह तळ्याच्या चौफेर दगडाच्या भिंती असून आम्हीं गेलों त्यावेळीं तेथें कांहीं बाया आपले कपडे धूत होत्या. वर निर्दिष्ट केलेल्या शिलोह तळ्यांपासून कुमारिकेच्या झऱ्यापर्यंत असलेल्या बोगद्यांतून आम्हीं कांहीं ठिकाणीं उभें राहून तर कांहीं ठिकाणीं गुडघ्या एवढ्या पाण्यांतून प्रवास केला !

या बोगद्यांतहि कांहीं लोक स्नान करीत होते !

दाविद राजाच्या काळांत कुमारिकेच्या झऱ्याला, गीहोन व शिलोह तळ्याला एन—रोगेन हीं नांवें होतीं; असें दिसतें.

या दोन्ही पाणवठ्यावर दाविद राजाच्या उतारवयांत, शलमोन व अदोनिया या दोन परस्पर विरोधी राजकुमारांचा एकाच वेळीं राज्याभिषेक

---

[१] मत्तय २७ : १-१० [२] लूक १३ : ४ [३] योहान ९ : ७

झाला होता ![1] शिलोह तळ्यांत डोळे धुण्यास सांगून येशूनें एका जन्मांधास दृष्टी दिली होती.[2]

शिलोह तळ्यापासून, फिरून आमच्या गर्धभारूड स्वाऱ्यांनीं किद्रोन ओढ्याच्या यहोशाफाट खोऱ्यांतून कचरा आणि सोनेरीं दरवाजा वगैरेंना वळसा घालून यरूशलेमची प्रदक्षिणा पुरी केली !

या नगर प्रदक्षिणेंत, हेरोद आणि दमास्कस वेस यांच्यामध्यें असलेली शलमोनाचा खाण आम्हीं पाहिली. या गुप्त खाणीची लांबी ७०० फूट, रुंदी ३०० फूट व खोली ३० फूट आहे. जमिनीच्या खालीं एकाद्या भुयाराप्रमाणें ही खाण दूरवर पसरली असली, तरी तिचें तोंड एकदोन माणसांना आंत जातां येईल इतकेंच रुंद आहे.

या खाणीचें संशोधन फारच मजेदार रीतीनें झालेलें आहे ! ९० वर्षांपूर्वी बार्कले नांवाचा एक गृहस्थ दमास्कस वेशीजवळून जात असतां त्याचें कुत्रें कोठें तरी चुकलें, म्हणून त्या कुत्र्याचा शोध करतां तें या खाणींतून बाहेर पडल्याचें आढळून आलें. तेव्हां खाणींत उतरून, मशाली वगैरे लावून लोकांनीं या खाणीचा शोध लावला !

सुमारें ३ हजार वर्षांपूर्वी शलमोनाच्या मंदिराला वापरलेले दगड याच गुप्त खाणींतून काढलेले होत.

या खाणींतील दुधासारखे पांढरे दगड चाकूनें अगर करवतीनें सहज कापतां येतात. त्यांना बाहेरची हवा लागल्यावर ते घट्ट होतात.

प्रवाशांच्या सोईकरतां अरब लोक या दगडाचे लहानसे ठोकळे, हातोडे आणि हत्यारें वगैरे तयार करून तीं विकतात.

विजेच्या छुप्या दिव्यांच्या प्रकाशांत, आम्ही या गुप्त खाणींतून चहूंकडे

---

[1] १ राजे १:५-५३ [2] योहान ९:१-७

फिरलों. कोठें, कोठें, त्यांत आम्हांला स्वच्छ पाण्याचे झरे झिरपत असलेले दिसले.

हिंदुस्तानांतील मद्यपान निरोधन संस्थेंत काम केलेल्या मिस् मेरी कँबेल या बाईंनीं या दिवशीं संध्याकाळीं आपल्या यरूशलेमेंतील टेम्परन्स हॉल-मध्यें सर व लेडी महाराजसिंग यांचे आगमनाप्रीत्यर्थ सभा बोलावून सुमारें २०० लोकांना अल्पाहार दिला. या सभेस जाणेचें आम्हां यात्रेकरूंनाहि आमंत्रण होतें.

सभेला यहुदी लोक हजर होते. आणि मुसलमान त्याचप्रमाणें युरोप, आणि अमेरिका वगैरे देशाचे लोक हजर होते.

मद्यपान निरोधन संघाचे पुरस्कर्ते मि० नजीब मुजाज यांनीं पवित्र भूमिला भेट दिल्याबद्दल आनंद व्यक्त करून कुमार रणबिरसिंगचा ऑक्सफोर्ड शिक्षणक्रम यशस्वी होवो अशी इच्छा प्रदर्शित केली.

सर व लेडी महाराजसिंग यांनीं कळकळीचें भाषण करून, जगाला शांति, सुख, आणि समाधान पाहिजे असल्यास, गालील सरोवर कांठीं टेंकडीवर, येशूनें केलेल्या उपदेशाचें सर्वांनीं अवलंबन केलें पाहिजे असें सांगितलें.

शेवटीं, आमचे पुढारी, श्री. संबाया यांनीं हिंदुस्तानांत चाललेलें ख्रिस्ती मंडळ्याचें ऐक्य, अस्पृश्यांचीं चळवळ, आणि ग्रामोन्नतीची धडपड, या संबंधानें जोरदार भाषण करून अशा चळवळीपासून हिंदुस्तानांतून जगाच्या कल्याणाकरतां कांहीं तरी चांगलें निघेल असें मत प्रतिपादन केलें.

आतांपर्यंत, यरूशलेमेंत अनेक राष्ट्रांच्या लोकांनीं आश्रम आणि देवळें बांधलीं असलीं, तरी या प्रसंगीं आमच्या हिंदी पुढाऱ्यांनीं गाजवलेला हा ख्रिस्तसंदेश आम्हांला बहुमोलाचा वाटला!

येरूशलमेंतील सहावा दिवस

(बुधवार २६ मे १९३७)

मंदिराचें अंगण

मुळांत यरूशलेमचें नांव यबूश असें होतें. तें गांव चार उंच टेंकड्या-वर वसलें आहे. अग्नियेस मोरिया, पश्चिमेस शियोन, वायव्येला आकरा व उत्तरेला बेझेथा. अशीं ह्या टेंकड्यांचीं नांवें होतीं.

कालांतरानें या टेंकड्यांमधील सर्व दऱ्या बुजून गेल्या. मोरिया पर्वतावर होम यज्ञ व बलिदान होत असत.

याच पर्वतावर, अब्राहामानें आपल्या एकुलत्या एक इझहाक नांवाच्या पुत्राला अर्पण करण्याकरतां नेलें होतें.[1]

दाविद राजाच्या वेळेस आरावना यबूशी या नांवाचा एक शेतकरी मोरीया टेंकडीच्या खडकावर आपलें धान्य झोडपीत असे. यावरून त्या सर्व खडकाला आरावनाचें खळें असेंहि एक नांव आहे.

परमेश्वराचें मंदिर बांधण्याकरतां दाविद राजानें हा मोरया डोंगर विकत घेतला.[2]

त्या जागेवर त्याचा पुत्र शलमोन यानें ख्रिस्ताब्दापूर्वी ९६६ सालीं मंदिर बांधलें.[3]

पुढें ३७८ वर्षानीं, म्हणजे ख्रिस्ताब्दापूर्वी ५८८ सालीं नबूखदनेझर राजानें हें शलमोनाचें मंदीर जाळून टाकलें आणि यहूद्यांना कैद करून नेलें.[4]

---

[1] उत्पत्ति २२:२; [2] २ शमुवेल २४:१८-२५ [3] इतिहास अ.३:९ [4] २ राजे २५:८-११

पुढें, अर्धशतकानंतर पारशी लोकांनीं बाबेलोनचें राज्य जिंकलें. त्यांनीं मात्र यहुद्यांना सवलती दिल्या.

खिस्ताब्दापूर्वी ५३६ सालीं कोरेश राजाच्या कारकिर्दीत जरुब्बाबेल नांवाच्या यहुदी गव्हर्नरनें शलमोनाच्या मंदीराचा जीर्णोद्धार केला. परंतु ज्यांनीं शलमोनाचें मंदीर पाहिलें होते अशा वृध्द लोकांनीं जरुब्बाबेलांचें मंदीर इतकें आवडलें नाहीं.[१]

पुढें खिस्तकालांत हेरोद राजानें ३५ एकराच्या अंगणांत १०।१२ हजार लोक ८।१० वर्षे कामावर लावून मोरया पर्वतावरील परमेश्वराचें मंदीर बांघलें. याच हरोदाच्या मंदीरांत व त्याच्या अंगणांत खिस्त चारित्रांतील महत्वाच्या गोष्टी घडल्या.

इ० स० ७० सालीं रोमी लोकांनीं यरुशलेम नगरीला वेढा दिला. त्या वेळेस निकराच्या प्रसंगीं, कांहीं घर्मवेड्या यहुद्यांनीं अगर रोमी शिपायांनीं हेरोदाचें मंदीर अग्नीच्या भक्ष्यस्थानीं दिलें.

अशाप्रकारें सर्वस्वी ओस पडलेल्या जागेवर-मोरिया खडकावर-मुसलमानांनीं ६९१ सालीं ओरमची मशीद बांधली !

ती मशीद अजून त्यांच्याच ताब्यांत आहे. मोरिया खडकावरून महमद पयगंबर स्वर्गाला गेला असें त्यांचें म्हणणें !

या मशिदींत २५० मिल्स अथवा ५ शिलींग, म्हणजे ३ रु. १२ आणे फी भरून अनवाणी प्रवेश करावा लागतो. नाहींतर कॅनव्हासच्या बुटाकरतां वेगळा आकार द्यावा लागतो. शिवाय स्त्रियांनीं आपले बाहू झाकल्याशिवाय त्यांना आंत जाऊ देत नाहींत.

---

[१] एज्रा ३:८--११

कसेंहि करून आम्हाला मोरिया खडकाजवळ जाऊं दिलें याबदल आम्हीं मुसलमान बंधूचें मनांत आभारच मानले. यहुद्यांच्या काळांत या ठिकाणापर्यंत जाणाऱ्या विदेशांना देहांत शासनच मिळालें असतें.

ओमरच्या मशिदीमधील मोरिया खडकाचा आकार खळ्यासारखा असून त्याच्या सभोंवार लोख ंडी सळ्यांनीं रिंगण आहे. या खडकाच्या खालीं पोखरून तयार केलेलें एक भलें मोठें तळघर आहे.

या तळघरांत गेलें म्हणजे यज्ञपशूचें रक्त वाहून जाण्याकरतां मोरियाच्या मध्यभागीं ठेवलेलें भोंक दिसतें. या तळघराच्या एका कोपऱ्यात एक गुळगुळींत चौकोनी दगड आहे. त्याला थोपटले म्हणजे त्याच्याखालीं आणखी एक तळघर असावें असा आवाज येतो. त्या अदृश्य तळघरांत कराराचा कोश ठेवलेला आहे अशी समजूत आहे.

मोरिया खडकाचे दक्षिणेस ज्या ठिकाणीं शलमोनाचा राजवाडा होता त्या ठिकाणीं इ. स. ५५० सालीं रोमच्या जस्टिनिअन नांवाच्या बादशहानें संत मेरीच्या स्मरणार्थ बांधलेलें क्रुसाच्या आकाराचें मंदिर आहे. त्याचेंहि ' अल अक्सा ' या नांवाच्या मशिदींत रूपान्तर झालें आहे.

मंदिराच्या अंगणाभोंवतीं पुष्कळ ओवऱ्या असून त्यांतील एका ओवरींत आपल्या हिंदुस्थानांतील महमदअल्लीचें थडगें आहे.

अंगणाच्या अग्नियेकडील कोपऱ्यांत डोंगर पोखरून तयार केलेली शलमोनांची पागा आहे.

वायव्येकडील कोपऱ्यांत अंतोनियोचा बुरूज आहे. पूर्वेकडच्या तटबंदींत सुप्रसिद्ध सुवर्ण दरवाजा असून तो आतां चिरेबंदी दगडांनीं बुजवून टाकला आहे. या दरवाज्यानें कोणी मुसलमानेत्तर राजा आंत गेल्यास इस्लाम धर्म बुडेल असें म्हणतात.

आपला मशीहा म्हणजे येशू ख्रिस्त अजून यावयाचा आहे अशी यहु-द्यांची समजूत आहे आणि तो आला म्हणजे याच दरवाजानें आंत येईल असें ते म्हणतात.

या सोनेरी दरवाज्यावर चढून आम्हीं त्याची आंतील रचना पाहिली,

या दरवाज्यावरून पूर्वेकडे असलेली गेथसेमाने बाग स्पष्ट दिसते.

शेवटीं मंदिराच्या चौकांतून निघून आम्ही यहुद्यांच्या एका सिन्यागॉग –प्रार्थना मंदिराकडे गेलों. तेथें डोक्यावर पदर अगर टोपी घातल्यावांचून स्त्रियांना आंत जाऊं देत नाहींत!

तिकडून परत येत असतांना यहुद्यांच्या एका बोळांत दोघांची मारामारी चालली होती. ती एका गोऱ्या शिपायानें सोडविली आणि जसें कांहीं, कांहीं झालेंच नाहीं असें दाखवून तो गोरा शिपाई खऱ्या इस्राएली प्रमाणें बाजूला उभा राहिला. त्या दोघांना चौकीवर नेण्याचा त्यानें दम वगैरे कांहीं भरला नाहीं.

या दिवशीं दुपारीं आम्हीं भूमध्य समुद्रावरील यपि गांवाच्या तेल अविव नामक नगराकडे गेलों.

या सफरींत आमचे बरोबर वयोवृध्द मिस मेरी कॅम्बेल या आपला शुभ्र खादीचा पोशाख घालून आल्या होत्या 'रब खुदावंद बादशहा है' हें पद त्यांनीं आपल्या खड्या आवाजांत गाऊन आमचें सफरींतलें काव्यगान बहारीचें केलें.

वाटेंत आम्हाला ४० हुतात्म्यांचें स्मारक लागलें. या स्मारकाचे आसपास एमाऊस नांवाचें गांव होतें.[१]

---

[१] लूक २४ : १३ -- ३१

याचे पुढें लोद गांव लागतें. तेथें ऐन्या नांवाच्या अर्धांग वायु झालेल्या मनुष्यास पेत्रानें येशूच्या नांवानें बरें केलें होतें.[१] या लोद गांवांत इंग्लंडचा पुरस्कर्ता साधु सेन्ट जॉर्ज जन्मला.

लोद गांवाच्या पश्चिमेस रामले नांवाच्या गांवाजवळ वाळुकामय समुद्र-किनाऱ्यावर चार विमानें घारीप्रमाणें खालीं उतरतांना दिसलीं.

तेथून पुढें जग प्रसिद्ध जाफा नारिंगाच्या बागा लागल्या. तथील नारिंगें नारळाएवढीं मोठीं आहेत. या नारिंगांकडे पाहून म. गांधींनीं आपल्या पुण्यांतील उपवासाचें पारणें फेडलें असें म्हणतात. यापे गांवांत पेत्रानें टबीथा अथवा दर्कस या नांवाच्या परोपकारी बाईस मरणांतून उठविलें होतें. त्या वेळेस पेत्रस रहात असलेलें शिमोन चांभाराचें घर आतां समुद्र किनाऱ्यावर असलेल्या दीपगृहाजवळ दाखवितात[२]

युरोप खंडांतून परत येणाऱ्या यहुद्यांनीं १९०९ सालीं 'तेल अविव' हें एक अगदीं नवीनांतलें नवीन शहर वसविलें आहे. १९२२ सालीं या शहराची लोक संख्या १५००० होती ती आतां दीड लाखावर गेली आहे.

या गांवांत हिब्रू भाषेशिवाय दुसरी भाषा ऐकूं येत नाहीं. सर्व पालेस्ताईन देशांत सुमारें ५७ वृत्तपत्रें आहेत त्या पैकीं एकट्या तेल अविवांत ४७ प्रसिद्ध होतात.

तेल अविवांतील दुकानांच्या पाट्या, ट्रामचीं तिकीटें, जाहीराती, मोटारींचे नंबर वगैरे सर्व कांहीं हिब्रू भाषेंत लिहिलेलें असतें. रात्रीची गस्त देखील हिब्रू भाषेंतच होते.

तेथील स्त्री पुरुष युरोपिअन पोशाख वापरतात. त्यामुळें तेल अविव

[१] प्रे. कृ. ९:३२ [२] प्रे. कृ. ९:३६-४३

हें युरोपांतलें गांव आशियांत आणून ठेवलें आहे कीं काय असा भास होतो. एके काळीं, यहुदी लोक, युफ्रातीस नदीच्या कांठीं तेल अविव नांवाच्या वसाहतींत गुलाम होते. त्या वसाहतीचें स्मारक म्हणून या गांवाचे तेल अविव हें नांव ठेवलें आहे.

तेल अविवांत यहुद्यांच्या एका हॉटेलमध्यें, मिस कॅंबेल बाईनीं आम्हांला चहा पार्टी दिली. हाटेल जवळ, उसळत असलेल्या भूमध्य समुद्राच्या लाटां-मधून यहुद्यांचीं गोजिरवाणीं मुलें जलक्रीडा करीत होतीं.

इकडील सर्व साधारण यहुद्यांचो रहाणी हिंदी ख्रिस्ती लोकांप्रमाणें स्वच्छ, साधी नीटनेटकी आणि उच्च विचारसरणीची असली तरी ते मारवा-ड्याप्रमाणें कंजुष आणि ब्राम्हणांप्रमाणें आपल्या गोत्राचा तोरा मिरविणारे आहेत. आपल्या शिवाय देवाचें ज्ञान जगांमध्यें दुसऱ्या कोणालाहि झालेलें नाहीं असें मानून ते इतर ख्रिस्तीजगांपासून फटकून राहतात. आणि अस-ल्याच कांहीं फाजील, कर्मठ व सनातनी गुणांमुळें त्यांनीं स्वतःलाच इतर ख्रिस्ती जगाचें अस्पृश्य करून घेतलें आहे. येशूची गोष्ट तें मन लावून ऐकतात.

पाश्चात्यांप्रमाणें त्यांचा ओढा आधिभौतिक सुखाकडे फार!



येरुशलेमेंतील सातवा दिवस

या दिवशीं सकाळीं आम्हीं येरुशलेमची वाय. एम्. सी. ए. इमारत पाहिली. तिचा दर्शनीभाग ताजमहाल–गोल घुमटाप्रमाणें आहे. या इमारतीमध्यें शास्त्राभ्यास, ध्यान मनन, आणि प्रार्थना करण्याच्या प्रशस्त आणि मनप्रसन्न अशा खोल्या असून त्यांतलि बोलपट गृहाचा नगर पलिके-प्रमाणें उपयोग होतो. या वाय. एम्. सी. ए. त एका वेळेस शंभर उतारूंची सोय होत असून त्यांतील एका खोलींत हिंदी पद्धतींचे लोड आणि तक्के ठेवलेले आहेत!

जलक्रिडा भुवनांत पोहण्याची, उडया मारण्याची आणि नौकाविहार करण्याचीहि सोय आहे.

या इमारतीच्या खालीं खडक पोखरून केलेली 'बेथलेहेम स्टार' नांवाच्या एकांतच्या प्रार्थनेची खोली ही येरुशलेमेतील ख्रिस्ती संस्थेचा कळस होय असें म्हटल्यास वावगे होणार नाही. या खोलींत जाऊन विजेचें बटन दाबलें म्हणजे वरच्या दगडी छतांत बेथलेहेम ताऱ्याच्या आकाराचा उजेड पडतो. या मोकाट जगांत खडतर खिस्ती जिण्याचा आरंभ करण्यापूर्वी मुमुक्षुलेक या एकांतीच्या प्रार्थनेच्या खोलींत ईशचिंतनांत कांहीं वेळ घालवितात.

वाय. एय. सी. ए. जवळ यहुद्यांचें एक प्रसिद्ध खातें आहे. त्यांतून यहुदी राष्ट्राबद्दलचें अद्यावत वाङ्मय, आणि यहुद्यांनीं चालविलेला लोकोपयोगी परिचयं सर्व प्रवाशांना विनामूल्य मिळण्याची सोय केलेली आहे.

वाय. एम. सी. ए. पासून ५।६ मैलांवर दूर असलेल्या ऐनक्यारेम या नांवाच्या गांवाकडे आम्हीं गेलों

हें गांव येशूचा पुरोगामी शिष्य योहान याचें जन्म ठिकाण आहे असें मानतात. ऐनक्यारम हें अत्यंत नयनमनोहर ठिकाण असून वीरवृत्तीच्या वाढीला अत्यंत पोषक असें आहे.

येशूची आई मरीया ही योहनाची आई एलिझाबेथ इला भेटलेल्या टेंकडीवर व योहान जन्मलेल्या गुहेवर सुंदर व रमणीय देवळें बांधीलीं आहेत.

या दोन्ही मंदिरामधल्या खोऱ्यांतून 'मेरी निर्झरिणी' नांवाचा गोड पाण्याचा झरा जोरानें वहात असून त्यावर बांधलेल्या फरशविर रूपवान अरबी स्त्रिया, आपले कपडे लाकडी धोपटण्यांनीं बडवून धूत असलेल्या दिसल्या.

या दिवशीं दुपारीं आम्ही हेब्रोन गांवाकडे गेलों. हेब्रोन हें जगांतलें एक प्राचीनांतलें प्राचीन गांव आहे. तें येरुशलेमच्या दक्षिणेस ३६॥ किलोमीटरवर आहे.

दरमहा २ पौंड पगार मिळविणारा आमचा आर्मेनियन ड्रायव्हर तासीं ५० मैलांच्या वेगानें जात होता.

वाटेंत आम्हांला शलमोनाचें तळें लागलें या तळ्याचें पाणी दगडी नळांतून आणून येरुशलेमेंतील मंदिराच्या अंगणांत सोडलेलें आहे.

यरुशलेमेच्या ग्रँड मुफ्तीकडून आम्हांला परवाना वेळेवर न मिळाल्यामुळें हेब्रोनच्या मुसलमानांनीं आम्हांला आब्राहामाच्या मकपेला गुहेवर असलेल्या इमारतींत जाऊं दिलें नाहीं. प्रवेश द्वारापासून सातव्या पायरीपर्यंत फक्त त्यांनीं आम्हांला वर चढूं दिलें. या पायरी पर्यंत यहुदी लोकांनाहि जाऊं देतात. सातव्या पायरीजवळ इमारतीच्या दगडांत एक भोंक आहे. त्यांत हात घालून यहूदी लोक तेथेंहि शोक करतात !

हेब्रोनचे मुसलमान आपल्या कडील खेडवळ मुसलमानाप्रमाणें दिसतात. प्रवासी लोकांपासून बक्षिस उपटण्याच्या त्यांच्या मनोरंजक युक्त्या आहेत.

हेब्रोनांत कांच तयार करण्याचा एक जुना कारखाना आहे. तो आपल्या इकडील लोहार शाळेप्रमाणें दिसतो. तो पाहण्याकरतां आम्हीं कांहीं जण तिकडे गेलों, आमच्या पैकीं दोघेजण मखपेला गुहेच्या आसपास घुटमळत मागें राहिलें होते. त्यांना या कांचेच्या कारखान्याची वाट दाखविण्याकरतां आलेल्या मुसलमान बंधूंनीं प्रत्येकीं एकेक शिलिंग बक्षिसाची मागणी केली.

एरव्ही आपल्या धर्म गुरूची आज्ञा मानण्यांत हेब्रोनचे मुसलमान कमालीचे करारी आहेत. मखपेला गुहेंत आम्हीं माणशी पांच पांच रुपये देतो म्हटलें तरी त्यांनीं आम्हांला सात पायऱ्यांच्या पलिकडे फिरकूं दिलें नाहीं!

मखपेला गुहेंत सारा, अब्राहाम, याकोब, एसाव, वगैरे यहुद्यांच्या आद्य पूर्वजांची प्रेतें आणि अस्थि ठेवलेल्या आहेत.


शलमोनानें या गुहेवर मोठमोठे दगड रचून बांधलेली इमारत अजून चांगल्या स्थितींत असून मुसलमान लोक तिचा आतां मशिदीप्रमाणें उपयोग करतात. हेब्रोन गांवांत अद्याप यहूदी अगर खिस्ती लोकांची वस्ती नाहीं. अकराव्या शतकांत, पवित्र भूमिंतून, मुसलमानांनीं हाकलून लावण्याकरितां आपल्या क्रुसेडर्स धर्मयोद्ध्यांनीं या गुहेंतील सर्व अस्थि स्वच्छ करून, फिरून बंदोबस्तानें पूर्व स्थळीं ठेवलेल्या आहेत.

त्या वेळेपासून आजपावेतों हीं हाडें ठेवलेल्या खोल ठिकाणपर्यंत कोणीहि गेला नाहीं, असें म्हणतात. गुहेवरच्या इमारतीवरून, शास्त्रांतल्या ओव्या चिठ्यावर लिहून लोक त्या गुहेंत सोडतात. असल्या चिठ्या आब्राहामाच्या कबरेवर जाऊन पडतात असें वाटतें.

हेब्रोन गांव सोडून परत येतांना आम्हीं अब्राहामाच्या मम्रेवनांत गेलों.

तेथें रशियन ख्रिस्ती साधुंनीं आमचें प्रेमानें स्वागत केलें अब्राहामाच्या एला वृक्षाची ते स्वतः जोपासना करीत होते. त्यांनीं ह्या वृक्षांचीं पानें, फळें आणि सालीचे तुकडे ही आम्हाला दिली. एका झाडाच्या वाळून गेलेल्या फांद्यांना लोखंडी तुळईचा टेंकू दिलेला आहे.

दुसऱ्या एका झाडाच्या बुंध्यावर आब्राहाम तीन देवपुरुषांबरोबर बोलत असून त्यांची पत्नी सारा ही त्यांचें बोलणें आडून ऐकत आहे असें चित्र काढलें आहे. हा सर्व देखावा आम्ही पहात असतांना उत्पत्तीच्या २३ व्या अध्यायाचे रम्यात्मक वाङमय वर्णन आमच्या अंतःचक्षुंपुढें हातें.



मम्रे वनांतील एला वृक्ष

मिसर देशाकडे प्रयाण

शुक्रवार ता. २८-४-३७ रोजीं सकाळीं ९ वाजतां आम्हीं इजिप्त म्हणजे मिसर देशाला जाण्याकरितां यरुशलेमच्या स्टेशनवर गेलों. तेथें आम्हांला निरोप देण्याकरितां मिस् कँबल व मि फरीद सालमन यांचे वडील हे आपल्या परिवारासह हजर होते. शिवाय, आमच्या टोळीपैकीं श्री. तोबीत हेहि हजर होते. ते यरूशलेमेंत मागें राहाणार होते. डॉ. गिनेस व मिसेस व मिस फ्रॉस्ट हे हैफा बंदरावरून परस्पर विलायतेला गेले होते. गाडी सुरूं झाल्यावर श्री. तोबीत हे प्लॅटफार्म वरून हळूं हळूं गाडीबरोबर मजेनें चालूं लागले, आणि मग पाय झप झप उचलून वेगानें चालूं लागले, गाडी वेगांत आल्यावर ते तिच्या बरोबर पळूं लागले! परंतु गाडी बरोबर ते कितीसे पळणार? शेवटीं यरूश-लेमेच्या आगगाडी पुढें आपलें कांहीं चालत नाहीं हें दाखवून त्यांनीं मोठ्या गमतीनें माघार घेतलेली पाहून गाडीतील लोकांची हसून हसून मुरकुंडी वळली.

आगगाडींत बोडक्या डोक्यांनी यसलेल्या स्त्री पुरुष यहुदी उता-रूंत लाल टोप्या घातलेले अरब लोक इतस्ततः विखुरले होते. यहुदी लोक हिब्रु अक्षरांनीं लिहिलेलीं पुस्तकें वाचीत होते आणि अरब लोक कुराण पढत होते. आगगाडीचा रस्ता नानाविध उंच, वाढोळया, आणि मोठ्या टेकड्यांनीं व्यापलेल्या लहान मोठ्या दऱ्यांतून उंच सखल नागमोडी वळणें घेत घेत लोद नांवाच्या स्टेशनाकडे चालला होता.

वाटेंत आम्हांला बायबलांत वर्णिलेली पालिष्टी लोकांचीं गांवें लागलीं त्यांपैकीं, आर्तुफ नांवाच्या स्टेशनाजवळ उजवे बाजूला टेंकडीवर, सरा ही शमशोनाची व त्याचे पुढें सोरेक ही त्याच्या दलीला पत्नीची

जन्मभूमि होती [१]

वादी-एस-सरार नांवाच्या स्टेशनाजवळ एला नांवाच्या खोऱ्यांत छोट्याशा दाविदानें भल्या मोठ्या गल्याथाला गोफणीनें ठार केलें होतें. [२] याच पलिष्टयांच्या प्रांतांत इंग्रजांनीं नोव्हेंबर ४·१९१७ ला तुर्की जर्मनांच्या जोड सैन्यावर जय मिळविला.

त्यावेळेस इंग्रजांच्या बाजूनें लढलेले आमचे एक मित्र कर्णगल्याचे सुभेदार जोती पाटील-११० मराठा लाईट इन्फन्ट्री-हे मला कधीं कधीं भेट देऊन तुर्की लोकांच्या गनिमी काव्याचें चटकदार वर्णन करून सांगत असतात.

हल्लीं या टापूंत रमला नांवाच्या गांव जवळ इंग्रजांचें वैमानिक ठाणें आहे.

लड, लद्दा, अथवा लोद या जंकशनवरून रेल्वेचा एक फाटा भूमध्य समुद्राच्या कांठानें उत्तरेकडील यांपे गांवावरून तेल अविव या बंदराकडे जातो. दुसरा एक फाटा शखेम-नाबलूस या गांवांवरून कर्मेल पर्वताच्या बाजूनें इस्त्रेलच्या खोऱ्यांतून हायफा बंदराकडे जतो.

दक्षिणेकडील रेल्वेच्या फाट्यानें आम्ही मिसर देशाला गेलों. तेथून पुढें रेल्वेच्या दोन्ही बाजूला जरदाळूच्या आणि नारिंगाच्या बागा लागतात.

प्रत्येक स्टेशनवर एका पियास्टरला करंडीभर ताजे जरदाळू आम्हांला खायाला मिळाले.

मेजदेलास्टेशन समोर डाव्रे बाजूला पलिष्ट्यांचें प्रसिद्ध अष्कलोन शहर होतें. तेथें एकट्या शमशोनानें तीस पालिष्टा ठार केले होते. [३]

अष्कलोनच्या पुढें रेल्वेच्या उजव्या बाजूला गाजा गांव आहे. त्याचे

१ शास्ते १३: व शास्ते १६:४. [२] १ शमुवेल १७: [३] शास्ते १४:१९

आसपास कांहीं ठिकाणीं गरीब अरबांच्या गलिच्छ झोपड्या तर कांहीं ठिकाणीं श्रीमंत यहुद्यांच्या लाल कौली टुमदार बंगल्या आमोर समोर उभ्या होत्या.

गाजा येथे पॅलेस्ताईनचा सुपीक प्रदेश संपून भूमध्य समुद्राच्या कांठानें लागणारा वाळवंटाचा रुक्ष प्रदेश सुरू होतो!

गाजा गांवीं तिसरा थटमोस, दुसरा रामसेस, यहोशवा, दाविद तिगलथ-पिलेसर, नेबुखदनेसर, शिकंदर, पॉम्पे, ओमर, सलादिन, रिचर्ड करदालिओ, नेपोलियन आणि जनरल अलेन्बी वगैरे महायोद्धे लढलेले आहेत.

गाजा स्टेशनापासून पुढें इजिप्त सरकारची हद्द लागते. तेथें आगगाडींत उतारूंचे पासपोर्ट तपासतात. तेथून पुढें सुमारें शें दिडशें मैल गेल्यावर उन्हाच्या तिरपींत सिनाय डोंगराच्या रांगा दिसूं लागल्या. या सिनाय डोंगरावरून देवानें मोशाचिद्वारें जगाला दहा आज्ञा दिलेल्या आहेत.[१]

दोनप्रहरच्या सुमारास रेतीचें वादळ सुरू झाल्यामुळें आम्हांला आगगाडीच्या सर्व खिडक्या व दारें बंद करावीं लागलीं.

पुढें सुएझ कालव्यावरच कंतारा नांवाचें स्टेशन लागलें, तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र यांच्यामधील संयोगी भूमीला कंतारा, म्हणजें सेतू, हें नांव आहे.

या सेतुवरून अब्राहाम, योसेफ, याकोब व पवित्र कुटुंब म्हणजे बालयेशू व मरीया मिसर देशांत गेले होते.[२]

हा १०५ मैलांचा निसर्गसिद्ध सेतू चिरून आगबोटीची ने आण कर-

[१]निर्गम २०; [२]उत्पत्ती १२:१०

रण्याकरतां युरोपांतील व्यापाऱ्यांनीं १८६९ सालीं त्याचा एक जंगी कालवा बनविला आहे. या कालव्याची खोली ४० फूट असून कांहीं ठिकाणीं त्याची रुंदी १९६ फूट तर कांहीं ठिकाणीं ३२८ फूट आहे.

या कंतारा स्टेशनवर इजिप्शियन सरकारचे पासपोर्ट अधिकारी प्रवाशाची प्रत्येक वस्तू बारकाईनें तपासतात. हातोपे, खिसे, पायमोजे, चष्म्याच्या पेट्या आणि कधीं कधीं तर बुटाचे तळ देखील फाडून तपासतात.

मोशाच्या आणि येशूच्या वेळेस ही पासपोर्ट तपासण्याची ब्याद अमलांत असती तर त्यांचे काय हाल झाले असते कोण जाणें, कंतारा सेतूच्या दक्षिण बाजूनें आश्चर्यकारक रीतिनें तांबडा समुद्र ओलांडून इस्राएल लोक सिनाय नांवाच्या रानांत आले.[१] कंतारा स्टेशनवरच एक पासपोर्ट अधिकारी ख्रिस्ती होते. तिकडे इजिप्तमध्यें सरकारी नोकरी मिळणें लायकीवर अवलंबून आहे. जातीवर नाहीं असें आम्हांला आढळून आलें. कंतारा स्टेशनवर बुट प्यांट घातलेले मिसरी मजूर आम्हांला भेटले. त्यांच्या टोपीच्या कपाळपटीवर टामसकुक ही अक्षरें होतीं.

आमचे आगगाडींतील सामान नावेंतून, सुएज कालव्यापार नेऊन कायरोकडे जाणाऱ्या आगगाडींत ठेवायला हे साहेबी हमाल डागा पाठीमागें दोन पियास्टर म्हणजे जवळ जवळ पांच पांच आणे मागूं लागले. तेव्हां आम्हीं आपले सामान स्वतःच वाहून नेऊन आफ्रिका खंडांत प्रवेश केला.

बसरा व बगदाद प्रमाणें कायरोचे लोकहि युरोपियन पोशाख घालून डोक्यावर लाल तुर्की टोप्या ठेवतात. सर्व साधारण स्त्रियाहि युरोपियनच पोषाख वापरतात. जुन्या संस्कृतीच्या स्त्रिया नाकावर भारुसा म्हणजे बोटाएवढा उभा दांडा ठेवून त्याच्या योगानें तोंडावर बुरखा बांधतात.

---

[१] निर्गम १४:२१-३०



कायरोची बुरखेवाली

संध्याकाळीं सवा साताला उत्तरेकडील पोर्ट सय्यद बंदरावरून कायरो-कडे जणूंकाय इडा पिडा टळो या वृत्तीनें आगगाडीची सर्व दारें व खिडक्या बंद करून तिच्यांत हिमज्वर जंतूनाशक औषधाच्या पिचकारीनें धूर मारल्यावर प्राचीन इस्राएल लोकांच्या गोशेन प्रान्तांतून आमची गाडी सुरूं झाली ! येथून पुढचा प्रवास नाईल नदीच्या कांहीं कालव्यावरील काळ्याभोर पिकाऊ जमीनींतून कायरो शहराकडे जातो.

इजिप्त देशाच्या या भागाला इस्राएल लोकांनीं आश्चर्यानें 'मिसर' म्हणजे काळा हें नांव दिलें. तें नांव त्या देशाला अद्याप चालूं आहे. याच गोशेन प्रान्तांत प्रथम इस्राएल लोकांची ईश्वरी सूत्रानें हालअपेष्टेंत जो-पासना होऊन त्यांचें एक मोठें राष्ट्र बनलें.[१]

कायरो शहर.

या दिवशीं यरूशलेमपासून ४० मैलांच्या वेगानें १३॥ तासांत ५०० मैल आगगाडीचा प्रवास करून रात्रीचे १०॥ ला आम्ही कायरो शहर गांठलें ! ओव्हरसीज एक्सप्रेस-Over seas express-कंपनीच्या मालकांनीं आम्हापासून दोन दिवसांकरतां प्रत्येकीं एक पौंड सात शिलींग, म्हणजे २० रुपये ४ आणे घेऊन, लुना पार्क होटेलमध्यें आमची उतरण्याची, जेवणाची व आसपासची प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याची सोय केली होती. या मिसरच्या सफरीला आम्हांला जादा १०० रुपये खर्च आला हें येथें सांगितलेलें बरें.

असल्या स्त्रिया साधारणपणें आपल्या इकडील मारवाडी बायां प्रमाणें दिसतात.

यरूशलेमेंत आम्हाला पाण्याची टंचाई भासली होती. तेव्हां मिसरा-मधील कायरो शहराच्या होटेलांत गरम आणि थंड पाण्याच्या चाव्या खुल्या

---

[१] उत्पत्ती ४५:१० , ४७:१

करून मी यथेच्छ स्नान केलें. आणि माझे कपडे धुऊन पलंगाच्या दांडीवर वाळावयाला टाकले !

कायरो शहरांतले गिझे नांवाचें पुराण वस्तु संग्रहालय ऐतिहासिक आणि जग प्रसिद्ध आहे. त्यांच्या प्रवेशद्वारासमोर जणूं काय प्रेक्षकांचें स्वागत करण्याकरतां, प्राचीन फारो राजाचे दोन धिप्पाड दगडी पुतळे उभे ठेवलेले आहेत !

कायरोच्या दक्षिणेस, ५०० मैलांवर, नुबियन पर्वतांत नाईल नदीच्या कांठीं, थीब्ज व लक्षार या नांवांचीं दोन पुरातन प्रसिद्ध गांवें आहेत, या गांवाचे आसपास डोंगर पोखरून केलेल्या गुहांमध्यें प्राचीन मिसरी राजांची औषधांत खारवलेलीं प्रेतें ठेवण्याची सोय केलेली होती.

१८७९ सालापर्यंत या गुप्त गुहांचा कोणालाहि मागमूस लागला नव्हता. दुसरा सार्वभौम फारो राजा रामसेस याच्या प्रेत भांडारांत सांपडणाऱ्या बहुमोल वस्तु बाजारांत विकून त्यांच्यावर चार अरब लोक अल्पावधींत गर्भश्रीमंत झाले होते. त्यांच्या हाल चालींवर पाळत ठेवणाऱ्यांना या अत्यंत प्रेत भांडारांचा शोध लागला !

या प्रेत भांडारांत सांपडलेल्या ३९ प्रेतांचा कायरोच्या म्यूझीयममध्यें संग्रह करून ठेवला आहे प्रेतें ठेवायाच्या ' सारको फेगस ' नामक दगडी पेटाऱ्यांत इस्राएल लोकांना छळणाऱ्या ' दुसऱ्या रामसेस ' या नांवाच्या राजाचें शव – शरिर – आहे. हा फारो बादशाहा भयंकर क्रूर होता हें अजूनहि त्याच्या सुरकुतलेल्या मुद्रेवरून दिसत आहे. त्याला त्याच्या पट्टराण्यांपासून १११ पुत्र व ७७ कन्या झाल्या होत्या. इतर राण्यांपासून झालेल्या संततीची गणती नाहीं !

खिस्ता पूर्वी, १७०० शतकांत होऊन गेलेल्या तुतानखामुन नामक १४ वे घराण्यांतील एका अल्पायुषी फारो राजाचें प्रेत भांडार, अगदीं अलिकडे,

म्हणजे १९२२ या सालांत सांपडलें आहे. या प्रेत भांडारांतील राजवस्तूंची संख्या ९५४ असून, त्यांतील सारकोफेगस - प्रेत पेटी, राजासन, रथ, पलंग, खुर्च्या वगैरे सर्व कांहीं भरीव सोन्याच आहे! त्यांतील बाजाच्या पेटीचा आकार, हल्लीच्या पोर्टेबल ग्रामोफोन प्रमाणें हुबेहूब आहे! तुतान खामुनच्या काळांतील संग्रह करून ठवलेले स्त्रियांचे केस अजून जशाचे तसे दिसतात! त्यांचे हातमोजे हल्लींच्या सुधारलेल्या ग्लव्हजना हार जाणार नाहींत! एवढेंच केवळ नव्हे, तर, त्यावेळच्या स्त्रियांची केस कांपण्याची कला, आणि डोक्याला फीत बांधण्याची तऱ्हा ही आतांच्या बाबकट व रिबन फॅशन प्रमाणें आहे!

तुतान खामुनच्या वेळेस मिसर देश सुधारणेच्या कळसाला पोंहचला होता असें दिसतें. त्यानंतर तो देश अधोगतीला लागला.

सेती, रामसेस, ताई, सितामुन तुतानखामुन वगैरे प्राचीन मिसरी लोकांच्या नांवावरून, त्यांच्या कांहीं चालीरितीच्या सारखेपणावरून, आणि प्राचीन हिंदुस्थानचे आफ्रिका खंडाबरोबर दळणवळण होतें, वगैरे गोष्टीवरून मुळचे मिसरी लोक, हे हिंदुस्थानांतून तिकडे गेले होते, असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे.

राम राजे हे हिंदुस्तानचे नव्हते, ते मिसरचे होते, हें दाखविण्याकरितां श्री भास्करराव जाधव यांनीं लिहीलेलें लिखाण महाराष्ट्राच्या परिचयाचें आहेच. एखादा रामसेस म्हणजेच तर राम राजा नसेल ना?

कायरोचे प्राणी संग्रहालयांतील पाण सिंहांच्या, सापाच्या, आणि पोपटाच्या जाती वगैरे पाहाण्यासारख्या आहेत. या संग्रहलयांत माणसाप्रमाणें दिसणाऱ्या एका माकडाची पाहाणी करण्यांत, आम्ही काळे लोक, गुंतलों, असतांना तिकडच्या प्रेक्षक लोकांचें, आमचें निरीक्षण करण्यांत भान हरपलें होतें!

पवित्र कुटुंबाचा अज्ञातवास

कायरोच्या उत्तरेस, ६ मैलांवर मतारेय्या म्हणजे उंबराचें झाड या नांवानें प्रसिद्धी पावलेले एक स्थळ आहे. तेथें पवित्र कुटुंब राहात होते, असें म्हणतात. [१]

या मतारेय्याच्या सभोंवार, सर्वत्र खारें पाणी असलें तरी उंबराच्या झाडाजवळ मात्र गोड पाण्याचा झरा आहे. तो झरा येशूच्या वस्त्रस्पर्शानें गोड झालेला आहे असें म्हणतात. या ठिकाणीं जेजुइट पंथाच्या मठवासी-यांनीं पवित्र कुटुंबाच्या स्मरणार्थ एक मंदिर उभारलें आहे.

योसेफाची सासुरवाडी

मतारेय्याच्या उत्तरेला, ६ मैलांवर, 'ओन,' म्हणजे हेलिओपोलीस अथवा सूर्य नगर या नांवाचें एक फार प्राचीन शहर होतें. तें योसेफाच्या आसनथ नामक पत्नीचें माहेर होय. [२] या ओन शहराच्या आसपास पुढें मोशेचा जन्म झाला. मोशे बाळाला लव्हाळ्याच्या पेटींत घालून नदींत ठेव-लेलें ठिकाण कायरोच्या आसपास असलेलें दाखवितात. ओन शहराला ग्रीक लोकांनीं हेलिओपोलिस हें नांव दिलें. [३]

आतां, हें ओन अथवा हेलिओपोलिस शहर नाहींसें झालें असले तरी, तेथील 'ऑबिलिस्क' नांवाचा, एकाच दगडाचा कोरीव खांब ख्रि. पू. २२०० सालापासून तेथें उभा आहे. हा जयस्तंभ जमिनीचे वर ८७ फूट व जमिनीचे खालीं ३० फूट आहे. या खांबावर, पहिला ओसिर्तसेन या नांवाच्या फारो राजानें, हायरोग्लिफिक नामक चित्रांनीं विचार व्यक्त करणाऱ्या लिपींत कोरलेला, झरळाच्या आकाराचा एक राजशाही कारतुष — शिलालेख आहे. या अवशेष हेलिओपोलिस जवळ आतां एक टुमदार नवीन हेलिओपोलिस गांव वसलेलें आहे. ह्या गांवांत आमची मोटार पंक्चर व्हावी का?

---

[१] मत्तय २:१४, १५ [२] उत्पत्ति ४१: ४५ [३]निर्गम २:१-१०

मेलेल्या लोकांचें गांव!

कायरो शहरांतील राजे लोकांच्या कबरा, म्हणजे, सोन्यानें मढविलेलें तावुतच म्हणावयाचें! राजघराण्यातील कांहीं वयोवृद्ध माणसांनीं आपल्या कबरा आपणच आपल्या मर्जीनुरूप बांधवून त्यावर कुराणांतील ओव्या सुवर्ण अक्षरांनीं कोरल्या आहेत.

कायरो जवळ आम्हीं एक अर्वाचीन धर्तीचें टुमदार गांव पाहिलें. त्यांतील घरांना माड्या, कठडे, वऱ्हांडे आणि बागबागेचे वगैरे सर्व कांहीं यथास्थित होतें. पण त्या गांवांत कोणीच मनुष्य दिसत नव्हता. फक्त मेलेलीं माणसें पुरण्याकरतांच हे गांव वसविलें आहे असें आम्हांला नंतर कळलें!

जुन्या कायरो शहरांतील यहुद्यांच्या एका प्रार्थना मंदिरांत, यिर्मया संदेष्ट्यानें हिब्रू भाषेंत लिहिलेलें एक चर्म पत्र आहे. त्याची सुरळी करून ते चांदीच्या लांब करंड्यांत घालून ठेवलें आहे. तें यिर्मयाचें हस्त लिखित आम्हीं हातांत घेऊन पाहिलें!

आपल्या हिंदु पूर्वजांच्या श्राद्ध संस्थेप्रमाणें मिसरी लोकांच्याहि कांहीं ठाम कल्पना होत्या.

मरण पावलेले लोक फिरून उठणार असून, त्यांचें पुनरुत्थान होईपावेतों मृतात्म्यांना दुग्धपान करण्याकरतां देवाच्या वनचर गायी मृतांच्या कबरेंत वरचेवर अवतीर्ण होतात असा प्राचीन मिसरी लोकांचा समज होता. आणि अशा तऱ्हेनें मेलेले लोक केव्हां तरी फिरून जिवंत झाले म्हणजे त्यांना कशाचीहि वाण पडूं नये म्हणून, मृतांच्या कबरेंत भरपूर अन्न वस्त्र, बीं — बियाणें, खारे मासे, आरसा, फणी आणि सोंगट्या, बाजाच्या पेट्या, हिरे, माणकें, सोन्या रूप्याचे दागिने, रथ, घोडे, चाकर नोकर आणि इडा पिडा यांपासून रक्षण करणारीं झुरळ दैवतें इत्यादि अनेक साधनांचा प्रेत

भौडारांत भरपूर संग्रह करून ठेवण्याचा मिसरी लोकांचा परिपाठ होता, असें प्रेत मंदिरांत अलीकड सांपडणाऱ्या असंख्य वस्तूंवरून सिद्ध होत आहे.

मिसरची पिऱ्यामिड

मिसरी लोकांची पिऱ्यामिड ही जगांतील एक अजब कलाकृति होय. तिच्यासारखी दुसरी कला, अद्याप, जगांत कोठेंहि झालेली नाहीं, व होणारहि नाही! जगांतील नऊ नवलांपैकीं हें एक पहिल्या प्रतीचें नवल होय. सर्व मिसर देशांत पाऊणशें पिऱ्यामिड आहेत. त्या पैकीं, कायरोच्या दक्षिणेस, खिस्ताब्दा पूर्वीं, २८०० शतकांत, बांधलेल्या गिझे नांवाच्या तीन पिऱ्यामिड असून त्यांनीं १३ एकर जागा व्यापलेली आहे. कोणत्याहि दिशेनें पाहणाऱ्याला ही पिऱ्यामिड त्रयी बाशिंगाचीं बेमर्डीं पानें जमिनींत रोवून ठेवावीं त्याप्रमाणें दिसतें. परंतु जवळ जाऊन पहाणाऱ्याला, पिऱ्यामिडचें निमुळतें टोंक पाहणें झाल्यास आपल्या मानेचा कांटा मोडून, वर मान करून तें पहावें लागतें, इतकें तें उंच आहे.



पिऱ्यामिड समोर कराचीचे मि. कॉडन

या गिझे पिऱ्यामिड पैकीं उत्तरेच्या बाजूची पिऱ्यामिड कियॉप्स नांवाच्या फारो सम्राटानें बांधलेली आहे. तिला साडेतीन फूट लांबी रुंदीचे २३ लाख दगड वापरलेले असून, एक लक्ष लोकं, ३० वर्षें हें पिऱ्यामिड बांधण्याचें काम करीत होते! पहिल्या १० वर्षांत खाणींतून दगड काढले; दुसऱ्या १० वर्षांत ते दगड वाहून नेले; तिसऱ्या १० वर्षांत त्या दगडांचे चौकोनी

पायावर त्रिकोणी पिऱ्यामिड रचलें!

पिऱ्यामिडची लांबी, रुंदी, आणि उंची प्रत्येकी ४५१ फूट असून, पिऱ्यामिडच्या गर्भांत राजाराणींचीं प्रेतें ठेवण्याकरतां दोन प्रशस्त खोल्या केलल्या आहेत. या खोल्यांना अलबास्तर नांवाचे तांबडे, मऊ कुरुंद दगड वापरले आहेत. राजाराणीच्या मृतात्म्यांना, प्रसंगोपात, एकमेकांना भेटतां यावें म्हणून, या दोन खोल्यांच्या मधल्या भींतींत एक आडवें भोंक ठेवलेलें आहे. त्याचप्रमाणें मृतात्म्यांना स्वच्छ हवा मिळावी म्हणून खोल्यांच्या वरच्या बाजूला साणी वजा भोंकें ठेवलेलीं आहेत. या गर्भगुडींत प्रेत मंदिराकडे जाण्याकरतां, पिऱ्यामिडच्या उत्तर दिशेनें आंत येणारा, चढ उतार पायऱ्यांचा एक भुयारा सारखा रस्ता असून तो आतां विजेच्या बत्यांनीं चकचकीत केला आहे. या रस्त्यावर, कित्येक ठिकाणीं आम्हीं वांकून, तर कित्येक ठिकाणीं रांगत, वटाड्याच्या मागें मैलांचें मैल जावें त्याप्रमाणें गेलों!

हें पिऱ्यामिड बांधून झाल्याकर, त्यामध्यें जाणाऱ्या रस्त्याचें तोंड कोणाला न कळेल अशा तऱ्हेनें झांकून बंद केलें होतें. परंतु पिऱ्यामिड बांधणाऱ्या कियॉप्स राजानें मजुरांना कांहीं वेतन न दिल्यामुळें ते लोक त्रासले; आणि त्यांनीं पिऱ्यामिडमध्यें घुसून, प्रेत संपत्ती लुटली; आणि राजा राणीचीं प्रेतें नाईल नदींत टाकून दिलीं! आतां या कियॉप्स राजाच्या देहाचें स्मारक म्हटलें म्हणजे कायरोच्या म्युझियममध्यें ठेवलेल्या एका धातूच्या पुतळ्याचें प्रदर्शनच आहे.

कांहीं स्थानिक अरब लोकांनीं, मजेखातर म्हणा, अगर प्रवाशाकडून बक्षीस मिळविण्याच्या हेतूनें म्हणा, १६ मिनिटांत, या पिऱ्यामिडवर दौडत पळत जाऊन खालीं येण्याचा सराव केला आहे.

आमच्यांपैकीं दोघांनीं या पिऱ्यामिडच्या एका दगडावरून दुसऱ्या दगडावर पाय ठेवींत वर जाण्याचा प्रयत्न केला. परंतु वाऱ्याच्या झोतापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं! या वेळेस, वीस वर्षामागें मी एकदां १६ मिनिटांत प्रतापगड चढून वर गेलों होतों, याचें मला स्मरण झालें!

स्फींक्स

गिझे पिऱ्यामिडचे दक्षिणेस एका मैलावर, खोलगट पठारांत, स्फींक्स नांवाची एक विराट पाषाण मूर्ती आहे. तिकडे आम्ही उंटावर बसून गेलों.



स्फिंक्स– राक्षस

वाटेंत प्रयोगा दाखल बांधलेल्या अगर छोट्या मोठ्यांच्या लहान पिऱ्यामिड लागल्या. पिऱ्यामिड बांधण्याकरतां, या खाणींतून दगड काढीत असतांना, पाषाणाचा एक भला मोठा नैसर्गिक कडा नरसिंह राक्षसारखा पूर्वेकडे पवित्रा करून बसलेला दिसला. त्याला मिसरी कलावंतांनीं टांकींचे घाव देऊन त्याचा जगप्रसिद्ध स्फींक्स पुतळा बनविला ! या पुतळ्याचें मुख माणसाचें व शरीर सिंहाचें आहे !

या स्फींक्स पुतळ्याची उंची ६० फूट व लांबी १७० फूट आहे. या पुतळ्या जवळ प्रेतांचे अंत्यविधि करण्या करतां बांधलेल्या देवळाचे खांब तीन चार फूट लांबी रुंदीचे असून त्यांच्यां वरचे दगडी वासेहि तसेच जाडजूड आहेत. या अंत्यविधि मंदिरापासून ते थेट पिऱ्यामिडपर्यंत स्फींक्स राक्षसाच्या नजरेखालीं हजारों वर्षांपूर्वी खोल जमिनींत पुरून ठेवलेलीं, व आपल्या उंची अलंकारासह वाळून दामटी झालेलीं प्रेतें आतां वरचेवर सांपडत आहेत !

कधीं कधीं, अशा प्रकारें सुकून भस्म झालेल्या प्रेतांचा, त्यांना पुरलेल्या जागीं, जमिनीवर, त्यांचा नुसता छाप उमटलेला असतो. या छापांच्या छाया चित्रावरून, कलावंतांनीं बनविलेल्या या प्लॅस्टरपुतळे फारो राजांची, कायरोच्या म्युझियममध्यें, कालानुक्रमानुसार एक वर्गवारी लावलेली आहे. शिवाय, अशा प्रकारें, केव्हां केव्हां, जमिनीच्या पोटांत, चुकून सांपडणाऱ्या प्रेतांना व त्यांच्यांत सांपडणाऱ्या अमोल अलंकारांना सभाळण्याकरतां तो नरसिंह स्फींक्स अवतार अपुरा पडल्यामुळें, त्याच्याभोंवतीं, आतां, नागव्या तरवारीचा पहारा ठेवलेला आहे !

मिसरांतले इस्राएली

ज्याप्रमाणें, एके काळीं, आफ्रीकेंतून धरून आणलेले शिद्दी गुलाम आपल्या अंगच्या गुणांनीं हिंदुस्थानांत नांवलौकिकास चढले, त्याप्रमाणें पालेस्ताईन मधून धरून नेलेले यहुदी गुलाम आफ्रिकेंतल्या मिसर देशांत तेथल्या फारो राजाच्या दरबारांत मोठ्या मानमान्यतेस चढले !

ख्रिस्तापूर्वीं १८०० शतकांत योसेफ नांवाचा यहुदी गुलाम मिसर देशाचा मुख्य प्रधान झाला. [१]

त्यावेळपासून, योसेफाचे इस्राएली जातभाई मिसर देशांत जाऊन राहिले. त्यांना राजाश्रय मिळाल्यानें त्यांचें सामर्थ्य आणि संख्याबल वाढत गेले. [२]

योसेफानंतर सुमारें ६५ वर्षांनीं जसा आतां युरोपांत यहुद्यांचा छळ होत आहे त्याप्रमाणें त्यावेळच्या मिसऱ्यांनीं तेव्हांच्या हिब्रू लोकांचा छळ केला. त्यांना वेठीला धरून, त्यांच्याकडून पिथोम व रामसेस या नांवाचीं दोन कोठाराची गांवें बांधण्याकरितां विटा तयार करवून घेतल्या. या दोन

---

[१] उत्पत्ती ४१:३९-४४ : [२] निर्गम १:७

गांवांचे १८८३ साली पूर्ण संशोधन झालें असून, हिब्रू लोकांनीं तयार केलेल्या त्या गांवच्या विटा आतां आपणाला हातांत घेऊन पाहतां येतात.[१]

आणि, आतां जसें इंग्रजांच्या राज्यांत यहुद्यांना आपल्या मायभूमीला मोकळीक मिळत आहे, त्याप्रमाणें ख्रिस्तापूर्वी १३ व्या शतकांत १३२४ ते १२५८ या वर्षांच्या दरम्यान, दुसरा आमेन होतेप नामक फारो याच्या कारकार्दीत, ४०० वर्षांच्या गुलामगिरीनंतर यहूद्यांची सुटका होऊन, ते आपल्या मायभूमीला परतले. आतांच्याप्रमाणें त्या वेळेसहि पालेस्ताईन देश यहुदीतर लोकांनीं व्यापून टाकला होता.[२]

इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात तें हेंच !.

कायरोहून परत

आम्हीं कायरो शहर सोडण्यापूर्वी संबाया हे जागतिक ख्रिस्ती मंडळ्यांच्या ऐक्या बाबत युरोप आणि एडिन्बरो येथें भरणाऱ्या जागतिक परिषदांना हजर राहण्या करतां अलेक्झांद्रा बंदरावरून विलायतेस गेले. आम्हीं ता. ३१ मे १९३७ इसवी गेल्या वाटेनें परत यरूशलेमला आलों आणि कार्मेल डोंगराजवळच्या हैफा बंदरावर असलेल्या इराकच्या वकीलाकडून व्हिजे परवाने मिळविण्या करतां मोटार सर्व्हिसनें तिकडे गेलों. आमच्या मोटारीमध्यें स्पेनहून आलेले बरेच स्त्री पुरुष प्रवासी होते त्यांनीं श्री तोबीतच्या हिंदी गाण्यांनी तोडीला तोड म्हणून आपली स्पॅनिश गाणीं म्हणून दाखविलीं.

यरुशलेम पासून, नाजरेथ पर्यंतच्या ८७॥ मैलांच्या रस्त्यांत, या वेळेस आम्हांला गिबे. अनाथोत, रामा, मिस्पे, आय, बेथेल, शिलो वगैरे प्राचीन यहुदा प्रांताचीं बायबलमधील गांवें फिरून पाहायाला मिळालीं !

---

१ निर्गम १:८-१५; २ प्रे. कृ. ७:६ गणना १३ यांतील हेरवृत्त पाहा.

नंतर शोमरोन प्रांतांतील याकोबाच्या विहिरीवरून पुढें गेल्यावर रस्त्याचे डाव्या बाजूला शारोनचें खोरें संपल्यावर, [१] कार्मेल पर्वतांची चिंचोळी रांग सुरूं होते.

८२॥ किलोमिटरवर समोरच्या इस्रेल खोऱ्यांतील ताबोर टेंकडीच्या माथ्यावरून, नाजारेथ पलिकडे, ९० मैल उत्तरेला असलेला, हिमाच्छादित हर्मोनपर्वत पाहून मनाला परम संतोष जाहला! [२]

नाजरेथपासून कारमेल पर्वतापर्यंतचा २२ मैलांचा आडवा रस्ता इस्रेल खोऱ्याच्या उत्तर बाजूनें जातो.

कार्मेलच्या पायथ्याला एलीयानें बाल देवाच्या पुजाऱ्यांना वधिलें होतें. [३]

किशोन नदीचा पूल ओलांडल्यावर डावे बाजूला सिमेंटाची खाण लागते. त्यांत यहुदी लोक काम करीत होते. उजव्या बाजूला, भूमध्य समुद्राच्या कांठावर, अक्को, एकर, अक्का अथवा इतिहास प्रसिद्ध तालोमे गांव आहे! [४] या गांवांत प्रेषित पौलानें एक दिवस घालविला होता. [५]

कार्मेल पर्वताच्या उत्तर टोंकाची समुद्र सपाटी केवळ ९९० फूट असून त्यावर हैफा बंदर वसलें आहे.

स्त्रियांच्या केसांत घालावयाच्या हेअरपिन-काट्यासारख्या वांकड्या तिकड्या रस्त्यानें हैफा गांवांतून आमची मोटार थेट कार्मेल पर्वताच्या माथ्यावर गेली!

तेथें विजेच्या लखलखाटांत आम्हीं कार्मेल मिशन होम नांवाच्या मठांत रात्रींचें भोजन केलें.

---

[१] इतिहास २७:२९ ; यशाया ६५:१० ; [२] स्तोत्र ८९:१२ ; १३३:३
[३] १ राजे १८:४० [४] शास्ते १:३१; [५] प्रेषि. कृ. २१:७

भूमध्य समुद्राच्या कांठानें कार्मेल पर्वताची लांबी १५ मैल असून त्याची रुंदी अवघी ३ ते ५ मैल आहे. आणि त्याची जास्तींत जास्त उंची १७८२ फूट आहे. इतका लहान जरी हा डोंगर असला तरी एलीया संदेष्ट्याच्या अद्‌भुत चमत्कारांनीं, यहुद्यांच्या आणि ख्रिस्ती लोकांच्या जीवनांत या पर्वताला इहलोकच्या स्वर्गाचें स्वरूप प्राप्त झालें आहे.[१]

कार्मेल पर्वता जवळचें हैफाबंदर यहुद्यांच्या दीर्घोद्योगामुळें भरभराटीला आलें असून, तेथें आतां सर्व जगाच्या व्यापारी नौका नांगर टाकतात.

रात्रींचें वेळेस, कर्मेल पर्वतावरून दिसणारी हैफा बंदराची शोभा दिवाळी-सारखी भासते.

पायथ्यागोरस, दारयावेश वगैरे मूर्तिपूजकांनीं देखील या पर्वतावर ध्यान मनन केलेलें आहे.

इ. स. १७९९ मध्यें नेपोलिअनबोनापार्टनें, कार्मेल पर्वतावर ठाणें देऊन इंग्रजाच्या आरमाराला शह दिला होता.

आतां या पर्वतावर ख्रिस्ती लोकांचे १५।२० मठ असून, बिदुइन व ड्रूस या लोकांमध्यें देव राज्याच्या घोषणेचें काम चांगलें चालतें.

हैफांतील यहुदी स्त्रिया इंग्लंडांतील सोसायटी गर्लस - प्रमाणें आपले ओंठ रंगवितात.

हैफाचे कांहीं यहुदी लोक नव्या कराराचा अभ्यास करणारे आहेत. एक होतकरू ख्रिस्तानुयायी यहुदी गृहस्थ नव्या कराराचे हिब्रू ग्रंथ प्रत्येक यहुदी हॉटेलांत स्वखर्चानें वाटीत फिरतात.

---

[१] १ राजे १८ वा अध्याय पाहा

आम्ही हैफाला जाण्याचे आदले दिवशींच इराकचे वकील हे फ्रेंचाच्या सीरियामध्यें ९२ मैल उत्तरेला असलेल्या बेरूट शहराकडे गेले होते. त्यामुळें रातोंरात त्यांच्या मागें बेरूटकडे जाणें आम्हांला भाग पडलें.

आणि या वेळेपासून आमच्या संकट परंपरेला थोडीशी सुरवात झाली !

तरी या संकटाचा मोबदला म्हणून आम्हांला गेल्या वाटेनें परत यावयाला न मिळतां सोर व सिदोन यांच्या मधला फिनिकीया प्रांत पाहायाला मिळून लेबानन पर्वताला प्रदक्षिणा घालतां आली !

रात्री आठ वाजतां आम्ही बेरूटकडे चाललों असतांना, किशॉन नदीच्या खोऱ्यांतून एकाएकी माझी नजर हैफा बंदराकडे गेली. तों काय ? विमानांतून कोणीतरी नानातऱ्हेच्या विजेच्या वस्रांनीं पेटविलेल्या जाहिराती खालीं फेंकाव्यात त्याप्रमाणें, सर्व हैफा बंदराचा देखावा दिसत होता.

एथून, थोडेंसें पुढें गेल्यावर मागें पाहिलें तों, कर्मेल पर्वतावर उमटलेला हैफा बंदराचा विद्युतप्रकाश आकाश गंगेप्रमाणें दिसत होता, सुमारें मध्य रात्रीनंतर, पालेस्ताईन व सीरिया यांच्यामधलें ' रास - एन -नकूरा ' नांवाचें पासपोर्ट नाकें ओलांडल्यावर आम्ही सूरफैनिकेच्या प्रांतांत येऊन पोहोंचलों. तेथें सोर व सिदोन यांच्या मधल्या सारफथ गांवाजवळ लेबानन पर्वत उशाला व भूमध्य समुद्र पायथ्याला घेऊन आम्ही झोंपीं गेलों.

या सारफथ गांवाचा ख्रिस्त प्रभुनें स्वतः उल्लेख केलेला असून कदाचित याच गांवांत त्यानें एका सूरफैनिके बाईच्या मुलीच्या अंगांतून भूत काढलें होतें.[१]

सकाळीं निजून उठल्यावर, तेथें मला कोणाच्या तरी कमरेचा एक सुंदर

---

[१] लूक ४:२४-३०. मार्क ७:२४-३०

पट्टा सांपडला. तपासांतीं या पट्ट्याचा मालक न मिळाल्यानें अस्मादीकानें हा थोर सिदोन मधला पट्टा आपल्या कमरेला लटकावला.

या ठिकाणीं, आम्हांला पासोडी सारख्या लांब रुंद भाकरीच्या घड्या व दह्याचा चक्का न्याहारीला मिळाला !

तेथून आम्ही भूमध्य समुद्राच्या कांठानें सीदोन शहराला पोहंचलों-तेथें समुद्राचा लाटांत जुल्या सीदोन शहराचा एक मोडका बुरुज मच्छेमारा पडावामध्यें समरुप झालेला आम्हांला दिसला !

अर्वाचीन सीदोन शहर सुधारलेलें असून त्याला आतां सैदा हें नांव आहे. या ठिकाणी फळफळावळीच्या मोठा व्यापार चालतो. सीदोन नारिंगें लहान असलीं तरी तीं जॅफा नारिंगापेक्षां आम्हांला फार गोड लागलीं.

सीदोन हें जगांतील एक अत्यंत जुनें शहर आहे.[१] तारवांत बसून, कैसरियाहून रोमला चाललेल्या पौलसाचें सीदोनकरांनीं स्वागत केलें होतें.[२]

डावे बाजूला भूमध्य समुद्र व उजवे बाजूला लेबानन पर्वत या मधून सीदोन पासून बेरुट पर्यंत जाणारा ३० मैलांचा रस्ता अतिशय मममोहक आहे.

भूमध्य समुद्रामध्यें, सेंट जॉर्जच्या आखाताभोंवतीं पसरलेल्या लेबानन पर्वताच्या पायथ्यावर पसरलेल्या पाअन्यावर बेरूट हें निसर्ग सुंदर शहर वसलेलें आहे याची शोभा कांहीं अंशीं आपल्या नैनीताल प्रमाणें आहे.

बेरूटची लोकसंख्या सुमारें एक लाख असून त्यांत ख्रिस्ती व मुसलमान

---

[१] उत्पति १०:१५-१९   [२] प्रे. कृ. २७:३

यांची संख्या सारखीच आहे. गांवामध्यें शैक्षणिक, वैद्यक, आणि आरोग्य विषयक अशा वीस एक ख्रिस्ती संस्था असून त्यांत आमच्या अमेरिकन प्रेसबिटीरियन मिशननें चालविलेलें विश्वविद्यालय प्रमुख होय. या बेरूटच्या विश्वविद्यालयांत कोल्हापूरच्या रे० डॉ० इ. न्याप यांनीं कांहीं वर्षे प्राध्यापकाचें काम केलें असल्यामुळें त्यांना आमच्या मराठी प्रमाणेंच हिब्रू व अरबी भाषाहि चांगल्या बोलतां येतात.

या बेरुट शहराजवळ, निकोमेटिया नांवाचें गांवीं, एप्रिल ता. २३, इ. स. ३०३ रोजी सेंट जार्ज हा ख्रिस्ताकरतां आत्म प्रमाण देत असतांना अकाली हुतात्मा बनला. आक्टोबर ता. ८, १९१८ रोजी हिंदी आणि इंग्लिश या जोड सैनिकांनी बेरुट हें तुर्की लोकांपासून जिंकून घेतलें.

बेरुट मध्यें, आम्हांला इराक देशांत परतण्याचे पास मिळाल्यावर आम्ही दमास्कसचा रस्ता सुधारला. लेबानन पर्वताच्या धुक्यांत धूर मिसळीत बेरुटची आगगाडीहि आमच्या मोटारीशी स्पर्धा करीत होती ! समुद्रसपाटीपासून आठ दहा हजार फूट उंचीवर असलेलीं बर्फाच्छादित शिखरें कोठें कोठें या पर्वतावर आम्हाला दिसलीं.

यरुशलेमांत परमेश्वराच्या मंदिराला वापरलेलीं गंधसरु- सीडारचीं- लांकडें शलमोन राजानें याच पर्वतावरून, जलमार्गानें नेलीं होतीं. [१]

सन्हेरिब, तिगलथपलेसर वगैरे अशुराच्या बलाढ्य सम्राटांचे वंशज आतां राष्ट्र संघाच्या संरक्षणाखालीं सीरिया देशांत कालक्रमणा करीत आहेत. वारुळासारखीं त्यांचीं मातीचीं घरें या प्रांतांत अधून मधून कोठें कोठें दृष्टिस पडतात. भयंकर ऊन व कडाक्याचा थंडी यापासून बचाव करण्या करतां या अशूर अवशेष वंशजांच्या प्रत्येक घरांत फक्त एकच दार असतें.

---

[१] १ राजे ५:८

लेबानन पर्वताच्या माथ्यावरील उत्तरेकडचा रस्ता बालबेक या जग-प्रसिद्ध स्थळावरून प्रेषित पौलाच्या तारसस नामक जन्म भूमीकडे जातो. बालबेक येथें सीरिया देशाचा बालदेव, ग्रीक लोकांचा हेलिऑस, आणि रोमचा ज्युपिटर या त्रेक देवांना वाहिलेलें वाई बनारसप्रमाणें देवळांनीं गजबजून गेलेलें एक गांव आहे. या गांवांतील देवळांना वापरलेले कित्येक दगड ६४ फूट लांब, १४ फूट रुंद, आणि १३ फूट जाडीचे आहेत! बाल-बेकचे जवळ, एक मैलावर, खाणींत एक दगड अद्याप पडलेला आहे, त्याची लांबी ६८। फूट, रुंदी १७ फूट, व जाडी १४ फूट ७ इंच आहे. या दगडाचें वजन आजमासें ११०० टन होईल असें म्हणतात!

लेबानन पर्वताच्या माथ्यावरून पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यानें आम्हीं एका खोऱ्यांत उतरलों, हें खोरें सपाट आणि सुपीक असून मगिदोच्या मैदाना-प्रमाणें दिसतें, आश्चर्याची गोष्ट ही कीं, दाविद राजाच्या काळांत दमासकसा-पर्यंत यहुद्यांचें राज्य पसरलें असतांना या खोऱ्याचा उल्लेख आलेला नाहीं![1]

या खोऱ्यांतून वर आल्यावर, आम्हीं हिमाच्छादित हरमोन पर्वताला उत्तरेच्या बाजूनें वळसा दिला. त्यानंतर बागबगिच्यांनीं खुललेल्या अबाना नदीच्या अनंत कालव्यावरून प्रवास करीत, मंगळवार ता. १ जून रोजीं संध्याकाळीं, बेरूट पासून सुमारें ६७ मैलांचें अंतर तोडून आम्हीं दमास्कस शहराला येऊन पोहंचलों.

परंतु अरबी वाळवंटाच्या अरण्यांतून मंगळवारीं बगदादला जाणारी मोटार लॉरी त्या दिवशीं, नेहमीं प्रमाणें, सकाळींच निघून गेली होती. तिचें भाडें आम्हीं आगाऊच दिलें होतें. शुक्रवार पर्यंत दुसरी मोटार सुटणार नव्हती. आम्हांला तर दमास्कसापासून बसऱ्यापर्यंतचा हजार मैलांचा प्रवास करून शनवारीं सुटणारी व्हिटा बोट गाठावयाची होती, त्या बोटीचें भाडेंहि आम्हीं अगाऊच दिलें होतें. अशा स्थितींत काय करावें, या विचा-रांत आम्हीं पडलों!

---

[1] २ शमुवेल ८:५, ६


त्या रात्रीं दमास्कसचे खिस्ती भाऊ मि. सआदे यांनीं आम्हांला आपल्या घरीं नेलें.

मिसेस सआदे यांनीं आपली व्हायोलीन वाजवून आमच्या मनाला हुशारी आणली. आम्हींहि त्यांना 'बहु असोत सुंदर,' हें पद म्हणून दाखविलें!

मि. सआदे हे आतां खिस्ती यात्रेकरूंकरतां एक पथिकाश्रम उभारण्यासाठीं वर्गणी गोळा करीत आहेत.

दुसरे दिवशीं, ता. २ जूनला माणशीं १ पौंड १० शिलिंग, म्हणजे २२ रुपये ८ आणे निराळा आकार - दंडच म्हणा ना - भरून स्पेशल मोटारीनें आम्हीं तें धन्य दमास्कस सोडलें!

आणि एक दिवस आणि एक रात्र, फिरून, त्या सीरियन - अरब वाळवंटाचा तापदायक प्रवास करून गुरूवारीं रात्रीं बगदाद शहर गांठलें. तेथून बबिलोन शहराच्या पडक्या अवशेषांचें आगगाडींतून दुरून दर्शन घेत, शुक्रवार सकाळीं अब्राहाच्या ऊर गांवाला पोहंचलों.



ऊर गांवचा जुना - झिगुरात

आगगाडींत श्री. तोबीत यांनीं 'मैं बन की चिडिया बन के बन-बन बोलूं रे,' या सारखीं गाणीं म्हणून इराकी शिपायांना व प्रवाशांना तालावर डोलवून, टिकले बुवा प्रमाणें त्यांना टाळ्या पिटावयाला लावलें!

अब्राहामाच्या ऊर गांवचा जुना - झिगुरात - उंच चोका मनोरा आगगाडींतून आम्हांला लांबवर दिसत होता. तो तसाच अजूनहि माझ्या नजरे पुढें उभा आहे!

समुद्रावरील गमती !

शुक्रवार ता. ४ माहे जून १९३७ रोजी संध्याकाळीं आम्हीं बसऱ्याला पोहंचल्यावर व्हिटा बोटीच्या मॅनेजरनीं आम्हांला वरून दुसऱ्या गोदीवर जागा दिली, तेथें आम्हीं रात्र घालविली.

दुसरें दिवशीं सकाळीं बोट धुण्याचे वेळेस, आम्हीं आमचें सामान उचलून सभोंवतालच्या पेटाऱ्यावर ठेवलें. बोट धुवून संपतें न संपतें तोंच बोहरी लोकांनीं आपल्या चटया व उंची पथाऱ्या भिजून चिंब झालेल्या लांकडी फळ्यांच्या जमिनीवर, पाण्यांतच पसरल्या, आणि आमच्या जागेवर आपला हक्क सांगून ते बसले ! या बोहरी लोकांच्या वागणूकीवरून आम्हांला प्रस्तुत पालेस्ताइनची चांगलीच कल्पना आली. त्या जागेवरील आमची एक दिवसाची वस्ती व आमची तक्रार यांचा कांहीं उपयोग न होतां आम्हीं मुकाट्यानें उठून वरच्या उघड्या डेकवर गेलों !

आमची बोट सकाळीं साडे दहाला सुटली. त्या वेळेस आमच्या डोक्यावरून एकामागून एक अशी नऊ विमानें हवेंतील एकाच पातळींतून – इराक – वरून हिंदुस्तानाकडे आलीं.

दुसरे दिवशीं आदितवारीं सायंकाळीं आम्हीं बहराइन बेटाला पोहंचलों. तेथें या वेळेस डॉ. डी. सत्राळकर हे आम्हांला बोटीवर येऊन भेटले.

शिवाय अरबस्तानमध्यें पेट्रोल कंपनीच्या वैद्यकीय खात्यांत कामावर असलेले मिरजेचे श्री.लुथर थोरात आमच्या बरोबर बोटीनें मुंबईला आले.

या सुमारास मृगनक्षत्राचा वारा सुरू झाल्यामुळें अरबी समुद्र खवळूं लागला होता. बोट भयंकर हालत होती. बोट जोराच्या वाऱ्यानें एका बाजूनें दुसऱ्या बाजूला कलाटली म्हणजे तिच्या मध्यभागीं असलेल्या खाटा व खुर्च्या बोटीच्या कडेच्या लोखंडी कठड्यावर जोरानें घसरत जाऊन, आपटून, मोडून, चकाचूर होत असत !

परत येणाऱ्या ११ यात्रेकरूंमध्यें शनवार मिशनच्या यात्रेकरूंनीं बायबल मधील कांहीं वादग्रस्त प्रश्नांना तोंड फोडलें ! येशू ख्रिस्त, देहानें पुनः पृथ्वीवर येई पावेतों मृत लोकांना कसलीच स्मृति नसते अशा प्रकारचें त्यांचें शास्त्राधार म्हणणें, श्री थोरात हे शास्त्राधारानेंच खोडून काढीत होते. यावरून मिरजेच्या मेडिकल स्कूल मध्यें, श्री. थोरातप्रमाणें बायबलचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचें आणि फादर रिचर्डसन सारख्या शिक्षण देणाऱ्या त्यांच्या प्रोफेसरांचें कौतुक करावेसें वाटलें !

बहराइन व मसकत यांच्या दरम्यान सुकाणूवर चालणाऱ्या दोन होड्या वाट चुकून तीन दिवस भटकत होत्या ! त्यांतील उघडे बोडके अरब नावाडी शरण आल्यासारखे हात वर करून मदतीची याचना करीत असलेले पाहून आमच्या कप्तनांनीं बोट उभी केली, आणि त्यांचे रिकामे डबे गोड पाण्यानें भरून दिले. कांहीं उतारूंनीं त्यांच्या मचव्यांत धान्य आणि रोट्या फेंकल्या.

त्या बिचाऱ्यांचें या खवळलेल्या समुद्रांत काय झालें देव जाणें !

समुद्र प्रवासाचे तज्ञ म्हणविणारे आमचे यात्रेकरू बंधु डॉ. मुकर्जी यांनीं आपल्या अमेरिकन पत्नी बरोबर पुष्कळदा समुद्र पर्यटण केलें होतें. परंतु त्यांनाहि अरबी समुद्राची ही तुफानी लाट आतां असह्य वाटली. कराचीला पोहंचल्यावर, बोट सोडून, रेल्वेनें त्यांनीं बंगलोर गांठलें !

कराचीकरांनीं याहि वेळेस आमचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. या ठिकाणीं आमची अर्धी अधिक व्हिटा आगबोट लहान मोठ्या ताज्या माशांच्या सात मोठ्या पारसलींनीं भरून गेली, बर्फाच्या खोक्यांतून असले मासे दर आठवड्याला कराचीहून मुंबईला येतात ! माशांच्या पारसलीचा एकेक खोका औरस चौरस चार पांच फुटांचा असतो.

कराची सोडल्यावर दुसरे दिवशीं हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावरील

ओखा, द्वारका, पोरबंदर, वेरावळ वगैरे गांवें आमच्या दृष्टीपथांत येऊं लागलीं ! द्वारकेच्या समोर एक हत्ती एवढा देवमासा आम्हांला दिसला !

बोटीला भिऊन गजगतीनें तो तिच्या उजव्या बाजूला सरकला. बरेंच दूर गेल्यावर, आपण बोटीच्या तडाख्यातून कसें वाचलों हें दाखविण्याकरतां त्यानें आपल्या सोंडेंतून समुद्राचें पाणी कारंजाच्या रूपानें वर गगनांत, मजेदार, सोडून दिलें !

मला स्वतःला बोटीचा त्रास होत नव्हता असें नाहीं ; पण मी त्याला जुमानीत नव्हतों, बोटीवरून दिसणारे सुर्यास्त आणि सुर्योदय यांचे आनिर्वाच्य देखावे पाहण्यांत मला मोठी मौज वाटत असे. रात्रीं आकाशांत चमकणारे ग्रह, चंद्र, तारे, आणि बोटीच्या मुसंडीनें समुद्र कापून बनलेल्या पाण्याच्या राशीवर उमटलेल्या बोटीच्या दिव्याचें प्रतिबिंब पहाण्यांत माझा वेळ जात असे. शिवाय अधून मधून प्रवास टिपण ठेवण्याचें माझें काम चाललेंच होतें!

भाताच्या पिकावरील पांखरें, दिवसा, कधीं कधीं, गोफणीच्या माराला भिऊन, पिकावरून लांबवर भरारी मारतात त्याप्रमाणें अरबी समुद्रांतील लहान माशांचें कळप बोटीला भिऊन समुद्राच्यावर, थेट हवेमध्यें, उड्डाण करीत ! माणसाएवढ्या मोठ्या माशांची तारांबळ मोटारीला भिऊन पळणाऱ्या भितऱ्या मेंढरांप्रमाणें असते. बाणासारखे हे मासे समुद्राच्यावर पुरुषभर वर उसळून, बोटीला पहात, अहमहमकिनें, सैरावैरा धावत सुटतात !

प्रणयाचा बिनतारी संदेश !

येरूशलेमला जात असतांना, आमच्या व्हेरेला बोटीवर, अरबस्तानांत नोकरीवर चाललेला एक तरूण हिंदी खिस्ती इंजनेर होता. त्याचें आमच्या यात्रेकरूपैकीं एका युवतीवर प्रेम बसलें. आतां परत येतांना बहराइनला त्यानें तिची भेट घेण्याचा प्रयत्न केला. पण भर समुद्रांत उभ्या राहिलेल्या आमच्या बोटीकडे येणाऱ्या त्याच्या चिमुकल्या स्टीम लॉचनें त्याला किंचित्


दगा दिला. त्यामुळें निराश होऊन त्यानें तिला बिनतारी मारकोनी – संदेश पाठविला तो रात्रीं आमचे भोजन चाललेल्या मेजावर, अचानक, त्या युवतीचे हातांत येऊन पडला !

प्रेमानें तळमळणाऱ्या त्याला तिनें उलट बिनतारी संदेश पाठवावा म्हणून आमच्यापैकीं कांहीं व्यक्तींनीं आग्रह चालविला. पण, हा प्रश्न तिचा आहे तिनें सोडवावा, या पोक्त विचारानें शेवटीं सर्व शांत झाले !

दुसऱ्या एकाचें यरुशलेम कन्ये वरचें प्रेम, याच्या उलट, होतें. आमचा एक यात्रेकरू बोट लागल्यामुळें, अन्न पाण्याविना, घायाळ होऊन पडला होता. तरी, यरुशलेमेंतील एका सुंदर तरुणीच्या लावण्याचा मुखानें तो सारखा जप करीत होता.

या प्राणयी जनांचें पुढें काय झालें, न कळे !

माझे ध्यानीं मनीं मात्र यरुशलेम आणि त्याचे बुरुज आणि त्याचा क्रूस हीं खिळून राहिलीं आहेत !



ख्रिस्त शिष्यांचें गृह

ख्रिस्त शिष्याचिया गेहीं
विश्रांतीच्या सन्निधीं
तारणारा तेथें राही
तो मनीषा संपादी
त्या पवित्रीं रम्यीं देशीं
त्या सुखाच्या माहेरी
वास नाहीं क्षणध्वंसी
अक्षयत्वाम।झारी
मृत्युलाही मृत्यु आला
हीनशक्ति तद्बाहू
गीत मुक्तांनो ख्रिस्ताला
बाल सूर्याला गाऊं !

उपासना संगीत ३४५

Printed by D. N. Tilak at his Nagarik Printing Press
Shanti Sadan Agra Road Nasik
Publishad by Dr. A. L. Jadhav at Lafayette Hospital Nipani

किंमत १० आणे